
आज अंगारकी



चंद्रोदय ०९.१३ वा.

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३१। अंक : ९। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८+ ४ = १२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

## विचारपुष्प



नि आजूबाजूला लक्ष विचलित करणाऱ्या हजारो गोष्टींपासून स्वत:ला वेगळं ठेवून केवळ पवित्र उद्देशासाठी कार्य करीत राहायला हवे. स्वत: समुद्रात दीपस्तंभासारखे उभे राहून कोट्यवधी समाजबांधवांना मार्ग दाखवावा. असे अनेक संघ कार्यकर्ते देशाचे चित्र बदलवू शकतात.

**प्रा. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# पाकिस्तानच्या धमक्यांना मोजत नाही

### भारताने जनरल आसिम मुनीर, ट्रम्प यांना सुनावले ● पहिल्यांदाच मित्रदेशाच्या भूमीवरून धमक्या

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

पाकिस्तानी लष्करप्रमुख आसिम मुनीरने अमेरिकेच्या भूमीवरून दिलेल्या अण्वस्त्रांच्या धमकीवर भारताने अतिशय कठोर प्रतिक्रिया व्यक्त केली. धमक्या देणे पाकिस्तानची नेहमीचीच सवय आहे. आम्ही अशा धमक्यांना काडीचीही किंमत देत नाही. जेव्हा जेव्हा अमेरिकेची मदत मिळते तेव्हा पाकिस्तान उड्या मारत असतो, अशा शब्दात जनरल मुनीर आणि डोनाल्ड ट्रम्प यांना खडसावले. तसेच पहिल्यांदाच मित्रदेशाच्या भूमीवरून धमक्या देण्यात आल्या, असा आरसा भारताने अमेरिकेला दाखवला.

अमेरिकेत दिलेल्या भाषणादरम्यान पाकिस्तानचे लष्करप्रमुख आसिम मुनीर यांनी भारताला दिलेल्या अण्वस्त्रांच्या धमकीवर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने कठोर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. मुनीर यांचे वक्तव्य बेजबाबदार असून, पाकिस्तान प्रादेशिक आणि जागतिक सुरक्षा कशाप्रकारे धोक्यात टाकत आहे, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. अमेरिकेचा पाठिंबा मिळताच पाकिस्तानी लष्कर खरे रंग दाखवते, अशी टीका भारताने केली.

मुनीर सध्या अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. भारताकडून कोणताही धोका निर्माण झाल्यास पाकिस्तान अर्धे जग खाली खेचेल. आम्ही अण्वस्त्रधारी आहोत. बुडत असल्याचे लक्षात आल्यास, आम्ही आपल्यासोबत अर्धे जग घेऊ, असे मुनीर यांनी रविवारी झालेल्या रात्रीभोज कार्यक्रमात म्हटले होते.

मुनीर यांना उत्तर देताना परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, पाकिस्तानी लष्करप्रमुखांनी पुन्हा एकदा अण्वस्त्रांच्या संदर्भात अत्यंत बेजबाबदार वक्तव्य केले आहे. पाकिस्तान केवळ प्रादेशिकच नव्हे, तर जागतिक सुरक्षाही कशाप्रकारे धक्यात आणत आहे, हे जगाला पाहायचे आहे. पाकिस्तानकडील अण्वस्त्रांबाबत चिंता करण्याचे कारण लोकांकडे आहे, असे मंत्रालयाने सांगितले.

### अमेरिकेच्या मदतीमुळेच चिथावणीखोर वक्तव्ये



शेजारील देशाच्या कृती केवळ प्रादेशिकच नव्हे, तर जागतिक सुरक्षेसाठीही धोका निर्माण करणाऱ्या आहेत, ज्यामुळे जगाला पाकिस्तानच्या अणुक्षमतेबद्दल चिंता करण्याचे कारण मिळाले आहे.

### अण्वस्त्रे चुकीच्या हाती पडण्याचा धोका

पाकिस्तानी लष्कराला अमेरिकेचा पाठिंबा मिळतो, त्यावेळी पाकिस्तानी लष्कर नेहमी त्यांचे खरे रंग दाखवते आणि हीच त्यांची नेहमीची पद्धत आहे. पाकिस्तानात लोकशाही अस्तित्वात नसल्याचा हा सर्वांत मोठा संकेत आहे. त्याऐवजी या देशावर लष्कराचे नियंत्रण आहे. त्यामुळे पाकिस्तानी अण्वस्त्रे चुकीच्या हाती पडण्याचा खरा धोका असल्याचे मंत्रालयाने सांगितले. ■

# झेलेन्स्कींनी केली मोदींसोबत चर्चा

### लवकरच भारत दौऱ्यावर येण्याची शक्यता

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत दूरध्वनीवर चर्चा केली. याबाबतची माहिती त्यांनी 'एक्स'वर पोस्ट करीत दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत दीर्घ आणि महत्त्वपूर्ण चर्चा झाली. यात द्विपक्षीय सहकार्य, भूराजकीय परिस्थितीवर तपशीलवार चर्चा केली, असे झेलेन्स्की यांनी एक्सवर म्हटले आहे.



युक्रेनच्या नागरिकांना दिलेल्या पाठिंब्याबाबत झेलेन्स्की यांनी मोदींचे आभार व्यक्त केले. रशियाने अलीकडे केलेल्या हल्ल्यांबाबतची माहिती मोदींना दिली. विशेषतः जापोरिझिया येथील बस स्थानकावर झालेल्या हल्ल्याची माहिती देण्यात आली. यात कित्येक लोक जखमी झाले होते. युद्ध संपुष्टात येण्याची शक्यता दिसत असताना रशियाला आक्रमकपणा तसेच हत्यासत्र कायम ठेवण्याची इच्छा असल्याचा आरोप झेलेन्स्की यांनी केला.

**नरेंद्र मोदी यांना युक्रेनला येण्याचे निमंत्रण**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सप्टेंबरमध्ये होणाऱ्या आमसभेला हजर राहण्याची तयारी दोन्ही देशांच्या नेत्यांना दर्शवली आहे. युक्रेनला येण्याबाबत नरेंद्र मोदी यांनी निमंत्रण दिले. त्यांनीही भारत भेटीचे निमंत्रण दिले. दोन्ही नेत्यांनी यावर सहमती दर्शवली.

## महत्त्वाचे

### निर्देशांकाची ७४६ अंकांची उसळी

**मुंबई :** परतलेली विदेशी गुंतवणूक तसेच तेल, वाहन आणि बँकिंग क्षेत्रात झालेल्या दमदार खरेदीच्या बळावर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सोमवारी ७४६ अंकांनी उसळून ८०,६०४ या पातळीवर बंद झाला.



सेन्सेक्समधील ३० पैकी २६ कंपन्यांना आज फायदा झाला. दिवसभराच्या सत्रादरम्यान तो ७७८ अंकांनी उसळला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २२१ अंकांनी वधारून २४,५८५ या पातळीवर बंद झाला. तीन महिन्यांच्या नीचांकी पातळीनंतर बाजाराला दिलासादायक तेजी दिसून आली. सकारात्मक जागतिक संकेत आणि एफआयआयच्या हळूहळू परताव्याने या भावनेला पाठिंबा दिला. या आठवड्यात होणाऱ्या अमेरिका-रशिया शिखर परिषदेचे गुंतवणूकदार सकारात्मक मूल्यांकन करीत आहेत. त्यामुळे भू-राजकीय तणाव कमी होण्याची शक्यता आहे. ■

### सरपंच सुनीता मिटकरी यांना स्वातंत्र्य दिन सोहळ्याचे आमंत्रण



**वाशीम :** जिल्ह्यातील आदर्श ग्रामपंचायत म्हणून नावाजलेल्या ढोरखेडाच्या सरपंच सुनीता दत्तात्रेय मिटकरी यांना यंदाच्या १५ ऑगस्ट रोजी दिल्लीतील लाल किल्ल्यावर होणाऱ्या ऐतिहासिक स्वातंत्र्य दिन सोहळ्यास जोडीदारासह उपस्थित राहण्यासाठी ग्रामविकास व पंचायतराज विभागाकडून विशेष आमंत्रण मिळाले आहे. राज्यातील फक्त १७ जिल्ह्यातील निवडक सरपंचांना हा सन्मान लाभला असून वाशीम जिल्ह्यातून एकमेव ढोरखेडाची निवड झाली आहे. गेल्या १० वर्षांपासून सरपंच पदावर कार्यरत असलेल्या सुनीता मिटकरी यांनी गावात गोदरी मुक्ती, स्वच्छता मोहीम, सौर दिवे आदी सोयी उपलब्ध केल्या आहेत. ■

# निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर विरोधकांचा मोर्चाचा प्रयत्न

### राहुल गांधी, प्रियांका वढेरांसह विरोधी खासदारांना अटक

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

मतदार यादीतील कथित घोटाळ्याच्या मुद्यावरुन विरोधी पक्षांनी आज संसद भवनातून निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्यांचा हा प्रयत्न हाणून पाडला. मोर्चा काढणाऱ्या विरोधी पक्षांच्या खासदारांना पोलिसांनी नंतर अटक केली.

काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचे सदस्य आज नवीन संसदभवनातील मकरद्वारासमोर एकत्र आले, आणि तेथून घोषणा देत ते मोर्चाने निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे निघाले. मोर्चाचे नेतृत्व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, काँग्रेस खासदार प्रियांका वढेरा, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार आणि समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव आणि अन्य नेते करत होते. या मोर्चात विरोधी पक्षांचे संसदेच्या दोन्ही सभागृहातील खासदार सहभागी झाले होते.

विरोधी पक्षांच्या सदस्यांच्या हातात विशेष मतदार यादी पुनरीक्षणाच्या (सर) विरोधात घोषणांचे पोस्टर्स होते.या मोर्चासाठी पोलिसांची परवानगी न घेतल्यामुळे संसदभवन मार्गावर पोलिसांनी मोर्चा अडवला, त्यामुळे मोर्चेकऱ्यांनी तेथेच धरणे आंदोलन सुरू केले.



### अखिलेश यादव चढले कठड्यावर

मोर्चा अडवचल्यानंतर पोलिस आणि मोर्चेकऱ्यांमध्ये बाचाबाचीही झाली. समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी पोलिसांच्या कठड्यावरुन उडी मारुन पुढे जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी विरोधी पक्षांच्या सर्व खासदारांना आणि नेत्यांना ताब्यात घेतले आणि बसमध्ये भरुन संसदमार्ग पोलिस ठाण्यात नेले. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या नेत्यांमध्ये राहुल गांधी, प्रियांका वढेरा, पी. चिदंबरम, रेणुका चौधरी, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे आणि शिवसेना उबाठाचे संजय राऊत यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांचा समावेश होता. ■

**मिताली बाग यांना आली चक्कर तर महुआ मोईत्रा बेहोश**

खासदारांची निदर्शने सुरु असतांना तृणमूल काँग्रेसच्या मिताली बाग यांना चक्कर आली. पोलिस अटक करत असतांना तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोईत्रा या बेहोष झाल्या, तोंडावर पाणी मारल्यानंतर त्या शुध्दीवर आल्या.

आमची लढाई राजकीय नाही तर संविधान बचावची आहे, असे राहुल गांधी म्हणाले. आम्ही एक व्यक्ती एक मत ची लढाई लढत आहे, आम्हाला परिपूर्ण मतदार यादी हवी आहे, असे ते म्हणाले. तर सरकार विरोधी पक्षांच्या या मोर्चाला घाबरल्याचा आरोप काँग्रेसच्या प्रियांका वढेरा यांनी केला.

# उशिरा रिटर्न भरल्यानंतरही कराचा परतावा

### सुधारित आयकर विधेयक २०२५ लोकसभेत पारित ● करदात्यांना मोठे फायदे मिळणार

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

सुधारित आयकर विधेयक २०२५ आज लोकसभेत सादर करण्यात आले आणि लगेच ते आवाजी मतदानाने पारितही झाले. या विधेयकात करदात्यांच्या फायद्याच्या दृष्टीने अनेक सुधारणा सूचवण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे आयकराच्या काही नियमातही सुधारणा करण्यात आल्या आहेत.

दुपारी २ वाजता लोकसभेचे कामकाज सुरु झाल्यानंतर विरोधकांच्या गदारोळात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सुधारित आयकर विधेयक सादर केले आणि ते चर्चेशिवाय पारितही करण्यात आले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात १३ फेब्रुवारी २०२५ ला निर्मला सीतारामन यांनी नवीन आयकर विधेयक संसदेत सादर केले होते. मात्र या विधेयकातील काही तरतुदींवर विरोधकांनी आक्षेप घेतल्यामुळे ते भाजपाचे बैजयंत पांडा यांच्या अध्यक्षतेखालील सांसदीय स्थायी समितीकडे पाठवण्यात आले होते.

या समितीने सूचवलेल्या २८५ दुरुस्त्यांचा सुधारित आयकर विधेयकात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे मागील शुक्रवारी सरकारने आधी सादर केलेले नवीन आयकर विधेयक मागे घेत आज सुधारित आयकर विधेयक सादर केले.





### आयटीआरची अपरिहार्यता रद्द

नवीन विधेयकातून आयटीआरची अपरिहार्यता रद्द करण्यात आली आहे. आता टीडीएस परत घेण्यासाठी पूर्ण इन्कमटॅक्स रिटर्न दाखल करण्याची गरज नाही, तर एक साधा फॉर्म भरुनही हे काम करता येणार आहे. आतापर्यंत निर्धारित मुदतीनंतर रिटर्न दाखल केल्यानंतर रिफंड परत मिळत मिळत नव्हता, आता उशीरा रिटर्न भरल्यावरही रिफंड परत मिळू शकेल. ■

### शून्य टीडीएस सर्टिफिकेट मिळणार

आता कर कापला जाण्याच्या आधीच करदात्याला शून्य टीडीएस सर्टिफिकेट मिळू शकेल, त्यामुळे त्याच्या उत्पन्नातून कर कापला जाणार नाही. ■

आज पारित झालेले सुधारित विधेयक १९६१ च्या आयकर विधेयकाची जागा घेणार आहे.

**जामनेरात बेटावद खुर्दच्या तरुणाचा मारहाणीत मृत्यू**
वृत्त पान ७ वर

# पुण्यात भीषण अपघात; नऊ भाविक ठार

### ३५ जखमी ● कुंडेश्वरला दर्शनासाठी जाताना वाहन दरीत कोसळले

**पुणे, ११ ऑगस्ट**

श्रावणी सोमवारनिमित्त श्री क्षेत्र कुंडेश्वर येथे दर्शनासाठी जात असलेल्या महिला भाविकांच्या पिकअप गाडीला भीषण अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन सुमारे २५ ते ३० फूट खोल दरीत कोसळले. या अपघातात नऊ महिलांचा मृत्यू झाला असून ३५ प्रवासी जखमी झाले आहेत.

पाईट येथील सुमारे २० ते २५ महिला भाविक श्रावणी सोमवारानिमित्त दर्शनासाठी पिकअप गाडीने श्री क्षेत्र कुंडेश्वरकडे निघाल्या होत्या. कुंडेश्वरकडे जात असताना घाटात चालकाचे वाहनावरील नियंत्रण अचानक सुटले आणि गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या डोंगरावरून थेट दरीत कोसळली.



चालकाचे नियंत्रण सुटल्याने दरीत कोसळलेले वाहन

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेऊन मदतकार्याला सुरुवात केली. अपघातातील जखमी महिलांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सकाळी ११ च्या सुमारास महिलांनी खच्चून भरलेली पिकअप वाहन रस्त्यावर तब्बल पाच ते सहा वेळा उलटले. रस्त्यावर रहदारी असल्याने तातडीने स्थानिक लोकांनी खाजगी वाहनाने व १० पेक्षा अधिक रुग्णवाहिकांमधून अपघातग्रस्त महिलांना रुग्णालयात दाखल केले. उपचारापूर्वीच नऊ महिलांचा मृत्यू झाला व ३५ पेक्षा जास्त गंभीर जखमी आहेत. अपघाताची तीव्रता पाहता मृतांची संख्या वाढू शकते, असे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.

*श्री क्षुधाशांती सेवा संस्था*
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६
*शुध्द व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था*
सकाळी १० ते ९ (जेवण पार्सल उपलब्ध)
मंगळवार, दि. १२ ऑगस्ट २०२५
लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, वेफर्स, उपवास चिवडा, उपलब्ध
वरण, भात, बट्टी, गंगाफळाची भाजी ५० रू.
वरण, बट्टी ३० रू.
सँडविच भाकरी २० रू. नग
पोळी भाजी १५ रु. प्लेट
मेथी पराठा व चटणी १० रू.
मसाला पुरी २० रू
पार्सल मिळेल
सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे
ऑर्डर- एम.एम.पाटील मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.
*केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम*
सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.

# रघुजी भोसल्यांची फिरंग तलवार राज्य सरकारच्या ताब्यात

### १८ ऑगस्टला तलवार मुंबईत होणार दाखल ● महाराष्ट्रासाठी गौरवाचा क्षण



राज्य सरकारच्या ताब्यात आलेली भोसला तलवार दाखविताना ॲड. आशिष शेलार आणि लंडन येथील भारती दूतावासाचे अधिकारी

**मुंबई/नागपूर, ११ ऑगस्ट**

नागपूरकर भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्त्वाचे सरदार रघुजी भोसले यांची सोन्याने मढवलेली फिरंग तलवार सोथेबीज या ब्रिटिश कंपनीने लिलावात काढली होती. ती महाराष्ट्र सरकारने सर्वाधिक बोली लावून मिळविली होती. सोमवारी(११ ऑगस्ट) लंडन येथे जाऊन सांस्कृतिक कर्या मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी ती ताब्यात घेतली. सोमवारी १८ ऑगस्टला ही तलवार मुंबईत दाखल होणार आहे.

महाराष्ट्रासह देशाचे ऐतिहासिक दस्तऐवज असलेली ही तलवार लिलावात निघाल्याचे वृत्त २८ एप्रिल २०२५ रोजी अचानक धडकले होते. ॲड शेलारांना हे वृत्त कळताच तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून सदर तलवार शासनाला मिळावी या दृष्टीने नियोजन केले. सोमवारी लंडन येथे प्रत्यक्ष भेटून कायदेशीर बाबी पूर्ण करुन ॲड. शेलार यांनी ही तलवार ताब्यात घेतली.

### तलवार वाजतगाजत येणार पु. ल. देशपांडे अकादमीत

सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून ही तलवार सोमवार १८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय मुंबई विमानतळावर दाखल होणार आहे. स्वतः सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलारांच्या उपस्थितीत बाईक रॅली काढून वाजतगाजत ही तलवार दादरच्या पु. ल. देशपांडे कला अकदमीमध्ये आणण्यात येणार आहे. हा महाराष्ट्रासाठी अतिशय आनंदाचा क्षण आहे. तलवारीचा लिलाव जिंकण्यापासून ती ताब्यात घेण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेमध्ये महत्वाचे मार्गदर्शन आणि भूमिका असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी, लंडन येथील भारतीय दूतावासाचे अधिकारी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचा मी आभारी आहे.

**ॲड. आशिष शेलार,** सांस्कृतिक कार्य मंत्री, महाराष्ट्र

रघुजी राजे भोसले यांनी वापरलेली व इतिहास घडविणारी तलवार मिळविल्याबद्दल राज्यशासनाचे मनापासून आभार. हा अतिश आनंदाचा क्षण आहे. ही ऐतिहासिक तलवार नागपुरात यावी आणि नागपूरच्या मध्यवर्ती संग्रहालयात ठेवण्यात यावी किंवा भोसले घराण्याच्या स्वाधीन करावी. तलवार राज्यात येणार याचा जल्लोष सरकार तर करेलच पण भोसले राज घराण्याकडून सुद्धा मोठा जल्लोष आम्ही करणार आहोत.

**राजे मुधोजी भोसले,** नागपूर

### फिरंग तलवारीचे ऐतिहासिक महत्त्व

रघुजी भोसले प्रथम (१६९५ ते १४ फेब्रुवारी १७५५) हे नागपूरकर भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्वाचे सरदार होते. रघुजी भोसले यांचे शौर्य आणि युद्धनीती यांवर प्रसन्न होवून छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना 'सेनासाहिबसुभा' ही पदवी दिली होती. रघुजी भोसले ंची ही तलवार मराठा शैलीच्या 'फिरंग' पद्धतीच्या तलवारीचा उत्कृष्ट नमुना आहे. युरोपीय बनावटीची पाती ही मध्ययुगीन भारतातल्या उच्च वर्गामध्ये प्रसिद्ध होती. पात्याच्या पाठीवर तळाशी 'श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहिबसुभा फिरंग' हा देवनागरी लेख सोन्याच्या पाण्याने लिहिलेला आहे. पात्यावरील लेख ही तलवार रघुजी भोसले यांच्यासाठी बनवली गेली होती किंवा त्यांच्या वापरातील होती याकडे निर्देश करतो. नागपूरकर भोसल्यांची १८१७ मध्ये सीताबर्डी येथे ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध लढाई झाली. या लढाईमध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा विजय झाल्यावर कंपनीने नागपूरकर भोसल्यांच्या खजिन्याची लूट केली. ही तलवार युद्धानंतरच्या लुटीमध्ये अथवा ब्रिटिशांना दिलेल्या भेटींमध्ये देशाबाहेर गेली असण्याची शक्यता जाणकार व्यक्त करतात. ■

# युद्धनौका उदयगिरी-हिमगिरीचे २६ ऑगस्टला जलावतरण



**विशाखापट्टणम्, ११ ऑगस्ट**

उदयगिरी (एफ-३५) आणि हिमगिरी (एफ-३४) या दोन प्रगत युद्धनौकांचे जलावतरण भारतीय नौदल २६ ऑगस्ट रोजी करणार असल्याची माहिती ईस्टर्न नेव्हल कमांडच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली.

दोन प्रमुख शिपयार्ड कंपन्यांनी बांधलेल्या दोन प्रतिष्ठित युद्धनौकांचे जलावतरण विशाखापट्टणम् येथे एकाच वेळी होण्याची ही पहिलीच वेळ आहे. उदयगिरी आणि हिमगिरीचे २६ ऑगस्टला एकाचवेळी जलावतरण करण्याची तयारी सुरू आहे, असे नौदलाने निवेदनात म्हटले आहे. उदयगिरी ही प्रोजेक्ट १७-ए अंतर्गत बांधलेली दुसरी स्टेल्थ युद्धनौका आहे. माझगाव डॉक शिपबिल्डर्स लि. मुंबईने ही बांधली आहे. हिमगिरी प्रोजेक्ट १७-एमधीलच असलीत तरी तिची बाधणी कोलकात्यातील गार्डन रीच शिपबिल्डर्स ॲण्ड इंजिनीअर्सने केली आहे.

दोन्ही युद्धनौका पूर्वीच्या संरचनांच्या तुलनेत आधुनिक आहेत. सुमारे ६,७०० टन वजनाच्या पी-१७ वर्गातील युद्धनौका त्यांच्या पूर्ववर्ती शिवालिक वर्गातील युधनौकांच्या तुलनेत आकाराने जवळपास पाच टक्के मोठ्या आहेत. यात कमी रडार क्रॉस सेक्शनसह अधिक आकर्षक स्वरूप आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### धुळे जिल्हा असोसिएशनचा महिला फुटबॉल संघ रवाना


**शिरपूर :** राज्यस्तरीय आंतरजिल्हा फुटबॉल स्पर्धेसाठी ९ ऑगस्टला धुळे जिल्हा फुटबॉल असोसिएशनचा वरिष्ठ महिला फुटबॉल संघ पालघर (मुंबई) येथे रवाना झाला. संघाला असोसिएशनचे अध्यक्ष तथा उद्योगपती चिंतनभाई अमरिशभाई पटेल, उपाध्यक्ष संजय अग्रवाल, सेक्रेटरी संजय चौधरी, सदस्य दीपक पाटील, शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालक विजय भंडारी, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. उमेश शर्मा, किरण अंचन, प्रा. डॉ. विनय पवार, प्रशिक्षक शफिक मोहम्मद (शिरपूर), व्यवस्थापक पूजा कपाटे (शिरपूर) यांनी तांडे (ता. शिरपूर) येथील मुकेश आर. पटेल सीबीएसई निवासी स्कूलच्या भव्य मैदानावर संघाचा गौरव केला. संघात शिरपूर येथील बिसवस साठी, मुग्धा पाटील, लावण्या पाटील, रश्मी सोनार, तेजल सोनार, जान्हवी जमादार, रेणुका चौधरी, अनिता चौधरी, श्रेया गोराणे, निकिता मेनकर, गीतिका पावरा, गायत्री पारधी तसेच धुळे येथील रेणुका चौधरी, पूर्वा भामरे, निकिता देसले, दिव्या सोनवणे, रिद्दीशा भामरे, शिवानी बहिरम, वैष्णवी अहिरे, रूपाली बागुल यांचा समावेश झाला आहे.

### किरकोळ वादातून तरुणास मारहाण

**शहादा :** काथर्दे दिगर येथे किरकोळ वादातून तरुणाला मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी शहादा पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० ऑगस्टला शैलेश धनसिंग भिल (वय ३३) हे त्यांच्या घराशेजारील पानटपरीवर बसले होते. त्या वेळी गावातील सतीश अर्जुन भिल यांनी त्यांना ''तू मला यात्रेत मारले होते, असे लोकांना का सांगतोस?'' असे विचारून वाद घातला. या वादातून संतापलेले सतीश भिल यांनी लाकडी काठीने शैलेश भिल यांच्या डोक्याच्या मागील बाजूस आणि उजव्या गालावर मारहाण केली. या वेळी सतीश यांची मुले संग्राम सतीश भिल आणि सचिन सतीश भिल यांनीही हाताबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच संशयितांनी शैलेश यांना शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकीही दिली. घटनेनंतर शैलेश भिल यांनी शहादा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी सतीश अर्जुन भिल, संग्राम सतीश भिल आणि सचिन सतीश भिल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक नीलेश देसले यांच्या मार्गर्शनात हवालदार मेहेरसिंग वळवी तपास करीत आहेत.

### श्री द्वारकाधीश मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त कार्यक्रम

**नंदुरबार :** येथील पुरातन व प्रसिद्ध श्री द्वारकाधीश मंदिरात श्रीकृष्ण



जन्माष्टमी महोत्सव १६ ऑगस्टला होणार आहे. सकाळी काकडारती व मंगलारतीनंतर श्री द्वारकाधीशास पंचामृत अभिषेक व पूजा होईल. शृंगार व धुपारती दर्शन होईल. सायंकाळी संध्याआरती व रात्री आठ ते अकरा भजन मंडळीद्वारा भजन होईल. रात्री ११ ते १२ श्रीकृष्ण जन्माख्यानाचे प्रवचन आचार्य प्रशांत महाराज करतील. रात्री बाराला श्रीकृष्ण जन्म व देवाची आरती, पाळणा दर्शन होईल. कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री द्वारकाधीश मंदिर संस्थानने केले आहे.

### जिल्हा मन्सुरी, पिंजारी, नदाफ मंडळातर्फे आवाहन

**नंदुरबार :** जिल्हा मन्सुरी, पिंजारी, नदाफ सामाजिक आणि शैक्षणिक विकास मंडळ आणि जे. के. फाउंडेशनतर्फे शहरात जिल्हास्तरावर प्रथमच जिल्हा जमात २०२५ मध्ये दहावी, बारावी आणि पदवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव अर्थात तकरीब इनामत सोहळा होणार आहे. विद्यार्थ्यांनी त्यांची गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्र १५ ऑगस्टपर्यंत तालुका पदाधिकाऱ्यांकडे द्यावीत. जिल्हा मन्सुरी, पिंजारी, नदाफ सामाजिक आणि शैक्षणिक विकास मंडळ आणि जे. के. फाउंडेशन (नंदुरबार), नंदुरबार जिल्हा आणि लगतच्या साक्री, दोंडाईचा, खेतिया, सेलंबा, कुकरमुंडा, उधना, उनपाटिया, सुरत या शहरांच्या वतीने मन्सुरी, पिंजारी समाजाचा 'हौसला अफझाई' आणि 'गुणगौरव' कार्यक्रम लवकरच नंदुरबारमध्ये होणार आहे. या कार्यक्रमाची तारीख आणि ठिकाण लवकरच ठरविली जाईल, असे आयोजक नंदुरबार जिल्हा मन्सुरी, पिंजारी, नदाफ सामाजिक आणि शैक्षणिक विकास मंडळ (नंदुरबार) व जे. के. फाउंडेशनतर्फे कळविण्यात आले आहे.

### चांदसरला मुलाने विळा मारल्याने पित्याचा मृत्यू

**पाळधी (ता. धरणगाव) :** चांदसर येथे मुलाने दारू पिण्याच्या कारणावरून वडिलांना विळा मारून जखमी केले होते. उपचार सुरू असताना सोमवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला. चांदसर येथे ५ रोजी रात्री दहाच्या सुमारास वडील छगन यादव कोळी व मुलगा समाधान छगन कोळी यांच्यात दारू पिण्यावरून वाद झाला. या वेळी मुलाने बाजूला असलेल्या विळ्याने वडील छगन कोळी यांच्या पोटावर वार करुन त्यांना जखमी केले होते. त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. याबाबत राजू सीताराम सोनवणे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, समाधान छगन कोळीविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास स. पो. नि. प्रशांत कंडारे, योगेश सोनवणे करीत आहेत.



### पालेशा महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा

**धुळे :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, प्राध्यापक संघटना (एन-मुक्ता) (जळगाव) यांच्यातर्फे धुळे एज्युकेशन सोसायटी संचलित मा. ध. पालेशा वाणिज्य, कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० यावर कार्यशाळा घेण्यात आली. प्राचार्य डॉ. प्रभाकर महाले अध्यक्षस्थानी होते. कुसुंबा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील बाविस्कर प्रमुख पाहुणे, तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सदस्य प्रा. डॉ. नितीन बारी, अधिसभा सदस्य प्रा. डॉ. शिवाजी पाटील प्रमुख वक्ते होते. प्रा. डॉ. शिवाजी पाटील यांनी, नवीन शैक्षणिक धोरणाविषयी माहिती दिली.प्राचार्य डॉ. प्रभाकर महाले यांनी, कौशल्यप्रधान, रोजगाराभिमुख आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी विद्यार्थी निर्माण करणे हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा प्रमुख हेतू असल्याचे सांगितले. प्रा. डॉ. चंद्रशेखर वाणी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. सुषमा सबनीस यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. पल्लवी वाळके यांनी परिचय करून दिला. प्रा. डॉ. हेमंत जोशी यांनी आभार मानले.

## निधन वार्ता



### वसंत चौधरी

**फैजपूर (ता. यावल) :** ल स्वामीनारायण मंदिराजवळील लक्ष्मीनगरातील रहिवासी, सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक वसंत गिरधर चौधरी (वय ८४) यांचे १० ऑगस्ट रोजी रात्री ८.३० वा. वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मूले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते धनाजी नाना महाविद्यालयातील लिपिक हेमंत चौधरी यांचे वडील होत.

# नंदुरबारला विजय गौरव क्रीडा महोत्सवाचा थाटात प्रारंभ

## कॅरमसह रोप स्किपिंग स्पर्धेत विद्यार्थ्यांसह पालकांनी दाखवले कौशल्य



**नंदुरबार :** येथील विजय गौरव क्रीडा महोत्सव समितीतर्फे माजी मंत्री तथा आमदार डॉ. विजयकुमार गावित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित विजय गौरव क्रीडा महोत्सवाचा माजी खासदार संसदरत्न डॉ. हिना गावित आणि जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावीत यांच्या हस्ते सोमवारी (११ ऑगस्ट) थाटात प्रारंभ झाला.

सोमवारपासून (११ ऑगस्ट) विजय गौरव क्रीडा महोत्सवांतर्गत सलग चार दिवस विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला. जिल्हा निर्मितीनंतरच्या २६ वर्षांत प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात स्पर्धा घेण्यात आल्या असून, विजेत्यांना मोठ्या प्रमाणात पारितोषिके देण्यात येणार आहेत. विविध क्रीडाप्रकारांतील स्पर्धांमध्ये विजयी होणाऱ्या १५५ खेळाडूंना ट्रॉफी, प्रमाणपत्र व रोख बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. सहभागी होणाऱ्या १००० हून अधिक क्रीडापटूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. याचबरोबर शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी १३ ऑगस्टला निबंधलेखन स्पर्धा होणार आहे.

सोमवारी डॉ. हिना गावित, डॉ. सुप्रिया गावित यांच्या हस्ते जिल्हास्तरीय कॅरम व रोप स्किपिंग स्पर्धेचा प्रारंभ झाला. श्रीमती डी. आर. हायस्कूलच्या जिमखान्यात १९ वर्षांवरील तसेच वरिष्ठ नागरिक या दोन गटात कॅरम स्पर्धा घेण्यात आल्या. उपमुख्याध्यापक श्रीराम मोडक अध्यक्षस्थानी होते. डॉ. हिना गावित, डॉ. सुप्रिया गावित, भाजपचे तालुकाध्यक्ष दीपक पाटील, जितेंद्र पाटील, छत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त बळवंत निकुम, ईश्वर धामणे, डॉ. काणे प्राथमिक विद्यामंदिराच्या मुख्याध्यापिका सुलभा महिरे आदी उपस्थित होते. कॅरम स्पर्धेसाठी जिल्ह्यातून ९७ कॅरमपटूंनी सहभाग नोंदविला. पंच म्हणून दिनेश बैसाणे, जगदीश बच्छाव, विशाल मच्छले उपस्थित होते.

शहरातील तैलिक मंगल कार्यालयाच्या सभागृहात रोप स्किपिंग स्पर्धा म्हणजे विजय गौरव दोरी उडी स्पर्धेचे उद्घाटन डॉ. हिना गावित, डॉ. सुप्रिया गावित यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी भाजपचे नंदुरबार तालुकाध्यक्ष दीपक पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रवीण पाटील, माजी तालुकाध्यक्ष जितेंद्र पाटील, प्रा. डॉ. ईश्वर धामणे, छत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त बळवंत निकुम, हिवाळे, क्रीडाशिक्षिका पूनम शर्मा, तुषार सोनवणे, किरण इंगळे, श्रीकृष्ण पाटील, अशोक वसावे, नकुल चौधरी, विशाल सोनवणे, अनमोल पाडवी आणि पालक उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. हिना गावित यांनी सांगितले की, राजकीय आणि सामाजिक कार्य करण्याबरोबरच कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देणे आवश्यक असते म्हणूनच दरवर्षी अशा स्पर्धा घेण्यात येतात. सुप्रिया गावित यांनी विजय क्रीडा महोत्सव समितीचे कार्य आणि आमदार डॉ. विजयकुमार गावित यांच्या क्रीडाक्षेत्रातील योगदानाबद्दल प्रशंसनीय शब्दात मनोगत व्यक्त केले.



### विजय क्रीडा महोत्सवात होणाऱ्या स्पर्धा

दरम्यान, विजय क्रीडा महोत्सवात मंगळवारी (१२ ऑगस्ट) बुद्धिबळ स्पर्धा १२, १४ आणि १९ वर्षांआतील वयोगटासाठी होतील. खेळाडूंचा स्वतंत्र गट आणि आंतरराष्ट्रीय मानांकनप्राप्त रेटेड खेळाडूंसह १९ वर्षांवरील खेळाडूंचा दुसरा गट, अशा चार गटांत स्पर्धक भाग घेऊ शकतात. १२ आणि १३ ऑगस्टला धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांतील संघांसाठी व्हॉलिबॉल स्पर्धा होतील. १७ वयोगटाच्या आतील खेळाडूंसाठी पासिंग आणि १९ वर्षांवरील खेळाडूंसाठी शूटिंग स्पर्धा राहील. १४ ऑगस्टला सकाळी सातला मॅरेथॉन स्पर्धा आमदार डॉ. विजयकुमार गावित यांच्या निवासस्थानी होईल. १८ वर्षांवरील गटासाठी म्हणजे खुल्या गटासाठी ही स्पर्धा राहील.

स्पर्धेतील वरिष्ठ गटात पालकांनी उत्साहात सहभाग घेतला. स्पर्धांच्या यशस्वितेसाठी दीपेश गायकवाड, कुणाल चौधरी, सचिन गोंधळी, शरीफ शेख, मोहित मोरे, चंद्रकांत पाटील, सचिन सोनवणे, राज अहिरे, दिव्येश बाबर, आर्यन अहिरे, रोहित अहिरे, गणेश गवळी, समर गुरव यांनी सहकार्य केले. तुषार सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. विजय पटेल यांनी आभार मानले.

# नंदुरबारमधील घरफोडी प्रकरणातील सराईत गुन्हेगार जळगावातून ताब्यात

## स्थानिक गुन्हे शाखा, शहर पोलिसांची कारवाई

**नंदुरबार :** शहरातील टोयोटा शोरूम, बुलेट शोरूम आणि उज्ज्वल ऑटोमोबाइल्समध्ये झालेल्या घरफोडीचा प्रयत्न करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला येथील स्थानिक गुन्हे शाखा आणि शहर पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत जळगाव येथून ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नंदुरबार शहरातील टोयोटा शोरूमचे व्यवस्थापक प्रदीप नामदेव राणे यांनी २५ जुलै रोजी नंदुरबार शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. २४ ते २५ जुलैदरम्यान चोरट्यांनी शोरूमच्या खिडकीचे गज तोडून आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, रोख रक्कम किंवा मौल्यवान ऐवज नसल्याने त्यांना काहीही मिळाले नाही. त्यांनी फक्त किरकोळ तोडफोड केली होती. त्याचप्रकारे शहरातील धुळे रोडवरील दिनेश व्हिल्स बुलेट शोरूम आणि उज्ज्वल ऑटोमोबाइल्स येथेही अशाच प्रकारे चोरीचा प्रयत्न झाल्याचे समोर आले होते. या प्रकरणी अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखा आणि शहर पोलिस संयुक्तपणे करत होते. १ ऑगस्टला पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, हा गुन्हा जळगाव जिल्ह्यातील बोदवड तालुक्यातील धानोरी येथील सराईत गुन्हेगार युवराज देवराम मोहिते (वय ३५) याने त्याच्या साथीदारांसोबत केला असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील आणि शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांनी पथके तयार करून जळगावमधील बोदवड येथे छापा टाकला. पोलिसांनी धानोरी गावातून युवराज मोहिते याला त्याच्या घराजवळून शिताफीने ताब्यात घेतले. नंदुरबार शहर पोलिसांनी त्याला अटक केली असून, तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक श्रवण दत्त. एस, अपर पोलिस अधीक्षक आशित कांबळे, उपविभागीय पोलिस अधिकारी संजय महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक हेमंतकुमार पाटील, उपनिरीक्षक विकास गुंजाळ, पोलिस अंमलदार अभय राजपूत, भरत उगले, पंकज महाले, हरेश कोळी आणि ललित गवळी यांच्या पथकाने केली.

### नंदुरबार शहरात घरफोडीचा प्रयत्न

**नंदुरबार :** येथील सुप्रियानगर भागातील घरात मध्यरात्री तीन अनोळखी व्यक्तींनी घरफोडीचा प्रयत्न केला. मात्र, या प्रयत्नात कोणतीही वस्तू चोरीला गेली नाही. या घटनेची नोंद नंदुरबार शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नितीन रामदास वसईकर (वय ४४) हे दुधाळे शिवारातील सुप्रियानगर भागात (प्लॉट क्र. ८०) राहतात. १० ऑगस्टला मध्यरात्री तीन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. परंतु सुदैवाने त्यांच्या हाती काहीच लागले नाही. घटनेनंतर नितीन वसईकर यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार शैलेंद्र राजपूत तपास करत आहेत.

# मोबाइल दुकानासह हॉटेलमधून ३३ हजारांचा मुद्देमाल लंपास

## तळोद्यात घरफोडी; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**तळोदा :** तालुक्यातील बोरद गावात चोरट्यांनी एकाच वेळी मोबाइल दुकान आणि शेजारील हॉटेलमधून सुमारे ३३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. १० ऑगस्टला सकाळी ही घटना उघडकीस आली. याप्रकरणी तळोदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनील केलास मोरे (वय ३५, रा. बोरद, लाखापूर रोड) यांचे बोरद गावात वनविभागासमोर 'श्री महालक्ष्मी मोबाइल पॉइंट' नावाचे दुकान आहे. ९ ऑगस्टला रात्री ९ ते १० ऑगस्टला सकाळी सहाच्या दरम्यान चोरट्यांनी त्यांच्या दुकानाचे आणि शेजारील 'नागाई नास्ता हॉटेल'चे पत्रे उचकवून आत प्रवेश केला.

चोरट्यांनी श्री महालक्ष्मी मोबाइल पॉइंटमधून १२ हजारांचे विवो कंपनीचे दोन मोबाइल, चार हजारांचा रेडमी मोबाइल, तीन हजारांचे दोन केचोडा मोबाइल आणि नऊ हजारांचे दोन रिअलमी मोबाइल लंपास केले. याव्यतिरिक्त दुकानाच्या ड्रॉवरमधून १०, २० आणि ५० रुपयांच्या नोटा असलेले २५०० रुपयांची रोख रक्कमही त्यांनी लंपास केली. त्याचप्रमाणे शेजारील जितेंद्र राजेंद्र पाटील यांच्या मालकीच्या नागाई नास्ता हॉटेलच्या गल्ल्यातून तीन हजारांची रोख रक्कम आणि चिल्लरही चोरट्यांनी लंपास केली. दोन्ही दुकानांमधून एकूण ३३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर सुनील मोरे यांनी तळोदा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सहाय्यक पोलिस निरीक्षक राजू लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार भीमसिंह ठाकरे तपास करीत आहेत.

### भालेर शिवारातून शेतातील सोलर प्लेटची चोरी

**नंदुरबार :** तालुक्यातील भालेर शिवारात शेतकऱ्याच्या शेतातून जुनी सोलर प्लेट चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नंदुरबार तालुका पोलिस ठाण्यात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भालेर येथील अर्जुन धुडकू पाटील (वय ७२) यांच्या गट क्रमांक १८९ मधील शेतातून ही चोरी झाली. २७ जून ते २६ जुलैदरम्यान चोरट्याने त्यांच्या शेतातून नऊ हजारांची ६४ फूट लांबी-रुंदीची जुनी सोलर प्लेट लंपास केली. अर्जुन पाटील यांना चोरीचा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी १० ऑगस्टला नंदुरबार तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिस नाईक सरवरसिंग वसावे तपास करीत आहेत.

# नंदुरबारमधून एकाच दिवसात तीन दुचाकींची चोरी

**नंदुरबार :** शहरातील विविध भागांतून एका दिवसात तीन दुचाकी चोरीला गेल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. या तिन्ही घटनांमध्ये चोरट्यांनी दुचाकींची चोरी केली असून, त्यांची एकूण किंमत ७० हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

लुबी चिकन सेंटरजवळील माणुसकीची भिंतजवळून संदीप गुलाबसिंग वळवी (वय ३८, रा. पलसवाड, जि. नर्मदा, गुजरात) यांची २० हजारांची हिरो होंडा स्प्लेंडर प्रो दुचाकी (जीजे २२, सी ७३७) ९ ऑगस्टला दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत चोरीला गेली. या प्रकरणी हवालदार दिनकर गुले तपास करत आहेत. ललित चंद्रकांत माळी (वय ३२, रा. नंदुरबार) यांची २५ हजारांची हिरो सीबी शाइन दुचाकी (एमएच ३९, एई ७२०३) त्याच दिवशी दुपारी ४ ते सायंकाळी ६ दरम्यान मारुती व्यायामशाळेजवळून चोरी झाली. हवालदार ज्योतिबा दीपक तपास करीत आहेत.

संजय अर्जुन बहिरम (वय २६, रा. पिंजारझाडी ता. साक्री, जि. धुळे) यांची २५ हजारांची युनिकॉर्न दुचाकी (एमएच ३९, बीपी ३२८७) हीदेखील ९ ऑगस्टला दुपारी २ ते ४ या वेळेत नेहरू पुतळ्याजवळील जयहिंद इलेक्ट्रॉनिक्ससमोरून चोरीला गेली. सहाय्यक फौजदार जितेंद्र जाधव तपास करीत आहेत.

तिन्ही घटनांमध्ये फिर्यादींनी दिलेल्या तक्रारीनुसार, चोरट्यांनी दुचाकी लॉक केलेल्या असतानाही त्या लंपास केल्या आहेत. नंदुरबार शहर पोलिस ठाण्यात या तिन्ही प्रकरणांची नोंद करण्यात आली असून, तपास सुरू आहे.

पोलिस निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चोरीला गेलेल्या दुचाकींचा शोध घेतला जात आहे. शहरात दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले असून, नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. या चोरीत एखाद्या सराईत टोळीचा सहभाग असण्याची शक्यता आहे. शहरातील नागरिकांनी वाहनांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### जावदे त. बो. येथे अल्पवयीन मुलीचे अपहरण

**शहादा :** तालुक्यातील जावदे त. बो. गावातून १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी म्हसावद पोलिस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जावदे येथील रहिवासी ठाकरे (वय ४३) यांची १६ वर्षीय मुलगी २५ जुलै २०२५ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घरातून बेपत्ता झाली. अनोळखी व्यक्तीने तिला आमिष दाखवून आणि फूस लावून पळवून नेल्याची तक्रार तिच्या वडिलांनी केली आहे. या घटनेची तक्रार १० ऑगस्टला म्हसावद पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. हवालदार रवींद्र ठाकरे तपास करत आहेत.

# शॉर्ट फिल्म निर्मितीसाठी योफिमा युवा शिष्यवृत्तीचा शुभारंभ

## युवा चित्रकर्मींसाठी संधी ; १० सप्टेंबरपर्यंत नाव नोंदणी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑगस्ट**

युवा वर्गाच्या कौशल्याला योग्य व्यासपीठ मिळावं यासाठी अजिंठा फिल्म सोसायटी खान्देश व मराठवाडा भागातील तरुण चित्रकर्मींसाठी योफिमा शिष्यवृत्ती अर्थात यंग फिल्म मेकर फेलोशिप सलग दुसऱ्या वर्षी घेऊन येत आहे या योजनेचा शुभारंभ आज जळगाव येथे करण्यात आला. सुप्रसिद्ध अभिनेता,लेखक ,दिग्दर्शक प्रा. योगेश सोमण या योफिमा योजनेचे प्रमुख मार्गदर्शक आहेत.

मराठवाडा व खान्देश परिक्षेत्रात चित्रपट निर्मितीसाठी ची सर्जनशीलता असूनही अनेक तरुण चित्रकर्मींना आर्थिक मदती अभावी आपली सर्जनशीलता व कलाकृती जगासमोर मांडता येत नाही अशा लघुपट निर्माते किंवा युवा चित्रकर्मींना आपली कला जगासमोर मांडता यावी यासाठी अजिंठा फिल्म सोसायटी खान्देश व मराठवाडा भागातील तरुण चित्रकर्मींसाठी योफिमा शिष्यवृत्ती अर्थात यंग फिल्म मेकर फेलोशिप प्रोग्राम योजना यावर्षी देखील आयोजित करत आहे. या योजनेत खान्देश व मराठवाडा भागातील म्हणजेच जळगाव, धुळे,नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर,जालना,परभणी,हिंगोली, नांदेड, लातूर, इ.जिल्ह्यातील १८ ते ३० वयोगटातील प्रतिभावान युवा चित्रकर्मींना सहभागी होता येणार आहे. योजनेत नोंदणी झालेल्या युवा चित्रकर्मींपैकी निवड समितीतर्फे निवड झालेल्या सर्वोत्कृष्ट ६ कलाकृतींच्या निर्मिती साठी प्रत्येकी रु २५०००/- इतकी शिष्यवृत्ती रक्कम मिळणार आहे. या योजनेत नोंदणी केलेल्या प्रत्येक युवा फिल्म मेकर्स ना लघुपट निर्मिती साठी आवश्यक मार्गदर्शन तसेच कथा निवड, लेखन , दिग्दर्शन, पोस्ट प्रोडक्शन इ.विषयांच्या कार्यशाळेत मोफत सहभागी होता येणार आहे. या सर्व कार्यशाळांमध्ये चित्रपट क्षेत्रातील अनेक दिग्गज लेखन, दिग्दर्शक, कलावंत मार्गदर्शन करणार आहेत.या योजनेत सहभागी होण्यासाठी दि.१० सप्टेंबर २०२५ पर्यंत नाव नोंदणी करता येणार आहे. या योजनेचा शुभारंभ सोहळा दि.११ ऑगस्ट २०२५ रोजी जळगावातील नुतन मराठा महाविद्यालय येथे मान्यवरांच्या हस्ते चे पोस्टर विमोचन करुन उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख, अजिंठा



फिल्म सोसायटीचे उपाध्यक्ष अनिल भोळे सचिव विनीत जोशी,कोषाध्यक्ष डॉ. संजय हांडे,सदस्य पियुषभाई रावळ,देवगिरी चित्र साधनाचे प्रांत संयोजक किरण सोहळे, प्रसार माध्यम प्रमुख रजत भोळे, निर्मिती प्रमुख पार्थ ठाकर,रंगकर्मी हनुमान सुरवसे इ.मान्यवर उपस्थित होते. अजिंठा फिल्म सोसायटीच्या वतीने किरण सोहळे यांनी योजनेची सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रजत भोळे यांनी केले तर पार्थ ठाकर यांनी मान्यवरांचे आभार मानले. या योजनेचा अधिकाधिक युवा चित्रकर्मींनी लाभ घ्यावा व अधिक माहितीसाठी : ९३०९२६४४२९ - ९८९२९०६३७४ -७०५७३४४४११ वर संपर्क साधावा असे आवाहन योफिमा आयोजन समितीचे अध्यक्ष प्रा.योगेश सोमण, डॉ.जयंत शेवतेकर,डॉ.जयेंद्र लेकुरवाळे, डॉ. अनुराधा पत्की, डॉ.सुचित्रा लोंढे, डॉ. श्रद्धा शुक्ल यांनी केले आहे.

**Change In Name**

I HAVE CHANGED MY NAME FROM "**SHAIKH HASHEEM SHAIKH KAREEM**" (OLD NAME). TO "**SHAIKH HASHEEM KARIM**" (NEW NAME). ALL DOCUMENTS ARE BELONG TO MY NAME.

**Change In Name**

I have changed my name from **Mohammed Mujtahid Ansari** (Old Name) to **Mohammed Mujtahid Mohammed Mohsin Ansari** (New Name) as per documents for all propus.

Kirloskar
जगप्रसिध्द किर्लोस्कर कंपनीचे सर्व प्रकारचे घरगुती,शेती उपयोगी, औद्योगिक व जीनींग प्रेसींग पंप,मोटर्स अल्टरनेटर्स उपलब्ध.
संपर्क : निलेश संघवी
M.9373232643
● अधिकृत विक्रेता ●
संघवी पाईप
'कस्तुरी'२६,नवीपेठ,जुन्या बस स्टॅन्ड समोरील गल्लीत,जळगांव
☎ 2232641 To 2232645

### जाहिर नोटीस

**ॲड. पाटील संदिप संतोष**

**जळगाव येथीलल मे. वसीम एम. देशमुख सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दि.कि.अर्ज.नं.४७१/२०२५**
**निशाणी ७**
**चौकशी ता. १५/०९/२०२५**

**१)** श्री. राजेश बन्सीलाल साळी (भोपाळे), उ.व. ५४ वर्ष, धंदा-मजुरी, **२)** श्री दिनेश बन्सीलाल साळी (भोपाळे), उ.व. ४२ धंदा-मजुरी, **३)** चि. डिंगबर गणेश साळी (भोपाळे), उ.व. १६. धंदा-शिक्षण, **४)** चि. नैतिक गणेश साळी (भोपाळे), उ.व. १३ धंदा-शिक्षण, क्र.०३ व ०४ तर्फे अपाक श्री राजेश बन्सीलाल साळी (भोपाळे) रा. शिवाजी चौक पिंप्राळा ता. जि. जळगांव **५)** सौ. शारदाबेन भरतभाई, उ.व. ५२ धंदा-घरकाम, रा. धास्तीपुरा, सुरत (गुजरात), **६)** सौ. नीता शिवकुमार तगारे, उ.व. ४९ धंदा-गृहिणी, रा. चिंचपुरा, पिंप्राळा, ता. जि. जळगांव, **७)** सौ. योगिता नंदादीप किचंबरे, उ.व. ४० धंदा गृहिणी, मानवसेवा केंद्राजवळ, महादेव नगर, उधना. सुरत (गुजरात)

..........**अर्जदार**

**विरुध्द** कोणीही नाही ...........**सा.वाला**

**अर्ज - बॉम्बे रेगुलेशन कायदा कलम ०२ व ०३ प्रमाणे वारस दाखला मिळण्यासाठी.....**

नोटीस देण्यात येते कि, अर्जदार हे सरनाम्यात वर दिलेल्या पत्त्यावर राहत असून त्यांचे शिवाय मयतास कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार ०१,०२,०५,०६,०७ यांचे वडिल व अर्जदार नं. ०३ व ०४ यांचे आजोबा मयत नामे **बन्सी उर्फ बन्सीलाल मोतीराम साळी** (भोपाळे) यांचे दि. २४/०६/१९९६ रोजी जळगांव, येथे निधन झालेले आहे. मयत यांची पत्नी सुलोचनाबाई बन्सीलाल साळी (भोपाळे) ह्या दि. २७/०७/१९९६ रोजी जळगांव येथे मयत झाल्या आहेत. मयत यांचे आई वडिल बऱ्याच वर्षापूर्वी मयत झाले आहेत. मयत यांचा मुलगा गणेश बन्सीलाल साळी (भोपाळे) हे दि. १२/०१/२०१८ रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. मयताच्या मृत्युपश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशिर वारस आहेत.

**बन्सी उर्फ बन्सीलाल मोतीराम साळी** यांच्या मृत्युपश्चात अर्जदार यांना शासकिय निमशासकिय कामासाठी अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन **एक महिन्याचे आत** त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात आणि उक्त लेखा वरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरील अर्जदारांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबित झाल्यास सदर अर्जदार यांना मयत **बन्सी उर्फ बन्सीलाल मोतीराम साळी** यांचा वारस दाखला देण्यात येईल. आज दिनांक ११/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे,

हुकूमावरुन,
सही/-
**सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर जळगांव

सही/-
क. लिपीक
शिक्का

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग,** डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

# भटक्या कुत्र्यांना निवाऱ्यात ठेवा

## सर्वोच्च न्यायालयाचा दिल्ली-एनसीआर प्रशासनाला निर्देश

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी परिसर अर्थात् एनसीआरमधील सर्व भटके कुत्रे रस्त्यांवरून हटवून त्यांना आश्रयगृहांमध्ये ठेवा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिल्ली-एनसीआर प्रशासनाला दिला आहे. हे कुत्रे पुन्हा रस्त्यांवर येता कामा नये, असा इशाराही न्यायालयाने दिला आहे.



भटक्या कुत्र्यांचे चावे अत्यंत भयंकर असल्याचे स्पष्ट करीत न्या. जे. बी. पार्डीवाला आणि न्या. आर. महादेवन यांनी काही कठोर निर्देश दिले तसेच या कामात कोणतीही व्यक्ती किंवा संघटनेने अडथळा निर्माण केल्यास न्यायालयीन अवमाननेचे प्रकरण सुरू केले जाऊ शकते, असे स्पष्ट केले.

भटक्या कुत्र्यांना उचलण्याच्या कामात कोणतीही व्यक्ती किंवा संघटनेने अडथळा निर्माण केल्यास आणि त्याची माहिती आम्हाला दिली गेल्यास आम्ही त्यांच्या विरोधात कठोर कारवाई सुरू करू, असे न्यायासनाने स्पष्ट केले. प्राणी कार्यकर्ते आणि तथाकथित प्रेमी रेबीजला बळी पडलेल्या मुलांना परत आणू शकतील का, असा सवालही न्यायासनाने केला.

तुम्ही त्या मुलांना परत आणू शकता का? परिस्थितीनुसार तुम्ही वागायला पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले. राष्ट्रीय राजधानीत भटक्या कुत्र्यांच्या चाव्यांद्वारे रेबीज होण्याबाबत २८ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेत सुनावणी सुरू केली होती. सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिल्ली सरकार आणि गुरुग्राम, नोएडा आणि गाझियाबादच्या नागरी संस्थांनी सर्व भटक्या प्राण्यांना काढून आश्रयस्थानांत ठेवण्याचा निर्देश दिला.



सर्वोच्च न्यायालयाने श्वान आश्रयस्थानांना त्यांची काळजी घेण्याव्यतिरिक्त त्यांचे निर्जंतुकीकरण आणि लसीकरण करण्यासाठी पुरेसे कर्मचारी ठेवण्याचा निर्देश दिला. कोणत्याही कुत्र्याला सोडले जाणार नाही किंवा बाहेर नेले जाणार नाही, हे सुनिश्चित करण्यासाठी केंद्रांवर सीसीटीव्ही देखरेख असेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

**पाच हजार कुत्र्यांसाठी आठवडाभरात आश्रयगृह उभारा**

जवळपास पाच हजार कुत्रे राहू शकतील इतक्या क्षमतेची आश्रयगृहे पाच ते आठ दिवसांत उभारा, असा निर्देश न्यायालयाने प्रशासनाला दिला. अधिकाऱ्यांनी सर्व परिसरातून, विशेषतः शहरातील असुरक्षित वस्त्यांमधून बाहेरील भागांतून भटक्या कुत्र्यांना लवकरात लवकर उचलण्यास सुरुवात करावी, असे न्यायालयाने म्हटले आहे.

**न्यायालयीन आदेशाचे पालन करणार : रेखा गुप्ता**

भटक्या कुत्र्यांचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढला आहे आणि सरकार लवकरच यावर धोरण तयार करेल तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची नियोजनबद्ध पद्धतीने अंमलबजावणी करेल, अशी प्रतिक्रिया दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी व्यक्त केली. दिल्लीतील नागरिक भटक्या कुत्र्यांपासून त्रस्त झाले आहेत. आम्ही या मुद्यावर चर्चा करीत आहोत. सर्वोच्च न्यायालयाचा निर्देश महत्त्वपूर्ण आहे, असे रेखा गुप्ता म्हणाल्या.



निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप करीत सोमवारी इंडिया आघाडीच्या सर्वपक्षीय खासदारांनी संसद परिसरात धरणे आंदोलन केले. काँग्रेस खासदार प्रियांका वढेरा, सपाच्या डिंपल यादव, तृणमूलच्या सायोनी घोष यांच्यासह अनेक संसद सदस्य आंदोलनात सहभागी झाले होते

# जुनी पेन्शन योजना पुनरुज्जीवित करण्याचा प्रस्ताव नाही

### निर्मला सीतारामन् यांची माहिती

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

राष्ट्रीय पेन्शन प्रणाली अंतर्गत (एनपीएस) येणाऱ्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेनेशन योजना (ओपीएस) पुनरुज्जीवित करण्याचा कोणताही प्रस्ताव भारत सरकारच्या विचाराधीन नाही, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सोमवारी संसदेत दिली.

सरकारी तिजोरीवरील भार आणि अस्थिर आर्थिक दायित्वामुळे सरकार जुन्या पेन्शन योजनेपासून दूर गेले आहे, असे निर्मला सीतारामन् यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. एनपीएस ही एक परिभाषित योगदान-आधारित योजना आहे, जी १ जानेवारी २००४ रोजी किंवा त्यानंतर सेवेत रुजू होणाऱ्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी (सशस्त्र दल वगळता) सुरू करण्यात आली होती. अशा कर्मचाऱ्यांना पेन्शनरी फायदे सुधारण्याच्या उद्देशाने, एनपीएसमध्ये बदल करण्यासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी तत्कालीन अर्थ सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती, असे सीतारामन् म्हणाल्या. समितीने भागधारकांसोबत केलेल्या चर्चेच्या आधारे, एनपीएस अंतर्गत एक पर्याय म्हणून युनिफाईड पेन्शन स्कीम सुरू करण्यात आली, ज्याचा उद्देश एनपीएस अंतर्गत येणाऱ्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर निश्चित फायदे प्रदान करणे आहे.

कुटुंबाची व्याख्या यासह यूपीएसची वैशिष्ट्ये अशा प्रकारे डिझाईन केली गेली आहेत, की निधीची आर्थिक शाश्वतता राखताना खात्राने चुकारे होतील, असे सीतारामन् म्हणाल्या. एनपीएस अंतर्गत यूपीएसचा पर्याय निवडणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्याचा सेवेदरम्यान मृत्यू झाल्यास किंवा अवैधता अथवा अपंगत्वाच्या कारणावरून त्याला नोकरीवर काढून टाकल्यास सीसीएस (पेन्शन) अधिनियम-२०२१ किंवा सीसीएस (असाधारण पेन्शन) नियम-२०२३ अंतर्गत लाभ मिळवण्यासाठी पात्र असतील.

### मेधा पाटकर प्रकरणात हायकोर्टाचा निर्णय कायम

**नवी दिल्ली :** दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी दाखल केलेल्या २५ वर्षांपूर्वीच्या मानहानीच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी मेधा पाटकर यांच्याबाबत उच्च न्यायालयाने दिलेला आदेश कायम ठेवला. दिल्ली उच्च न्यायालयाने मेधा पाटकर यांना चांगल्या वर्तणुकीच्या हमीवर सोडण्याचा आदेश दिला होता. मात्र, दर तीन वर्षांनी एक वेळा सत्र न्यायालयासमोर हजर राहण्यास सांगितले होते. न्या. एम. एम. सुंदरेश आणि न्या. एन. कोटिश्वरसिंह यांच्या न्यायासनाने या निर्णयात हस्तक्षेप करणार नसल्याचे स्पष्ट केले. मात्र, याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सादर केलेले म्हणणे विचारात घेऊन लावलेला दंड रद्द करण्यात आला आहे आणि आम्ही यापुढे स्पष्ट करतो की, देखरेखीचा आदेश लागू होणार नाही, असेही आदेशात म्हटले आहे. ■

# १५ महिन्यांच्या मुलीला डे-केअरमध्ये मारहाण

## आई ढसाढसा रडली ● सीसीटीव्ही पाहिल्यापासून झोप येत नाही...

**नोएडा, ११ ऑगस्ट**

नोएडामधील डे-केअर सेंटरमध्ये १५ महिन्यांच्या मुलीला अमानुष मारहाण झाल्याचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. मुलीच्या आईला हा सगळा प्रकार समजला तेव्हापासून रडू थांबतच नाहीये. तिने सांगितले की, सीसीटीव्ही पाहिल्यानंतर माझी झोप उडाली आहे, मला आठवडाभरापासून झोप येत नाही.

मुलीच्या आईने दिलेल्या माहितीनुसार, ४ ऑगस्ट रोजी सकाळी नवरा मुलीला डे-केअरमध्ये सोडून ऑफिसला गेला. दुपारी १२:३० वाजता ती मुलीला घेण्यासाठी पोहोचली तेव्हा सेंटरचे तीन शिक्षक गेटवर आले आणि म्हणाले की मुलीला चिकनपॉक्स असू शकतात, ती सतत रडत आहे. मुलीला घरी नेलं तेव्हा तिची प्रकृती पाहून आईला संशय आला आणि ती डॉक्टरकडे गेली. डॉक्टरांनी सांगितलं की, मुलीला कोणीतरी चावले आहे. ही दुखापत कुठे आणि कशी झाली हे ताबडतोब शोधा.

मुलीच्या आईने डे-केअर सेंटरच्या मालकाला विचारले तेव्हा तिने स्पष्टपणे नकार दिला आणि दावा केला की, ही दुखापत घरी किंवा क्लिनिकमध्ये झाली असावी. जेव्हा सीसीटीव्ही फुटेज मागितले गेले तेव्हा तेही अनेक दिवस ते दाखवले गेले नाही. सेंटर व्यवस्थापन आणि काही लोकांनी तिच्यावर गुन्हा दाखल करू नये, यासाठी दबाव आणला.

अखेर अनेक दिवसांच्या दबाव आणि आश्वासनानंतर, पोलिसांच्या उपस्थितीत मुलीच्या आईला सीसीटीव्ही फुटेज दाखवण्यात आले. मुलीच्या आईने सांगितले की, फुटेज पाहून मला खूप मोठा धक्का बसला. त्या आयाने खोलीचा दरवाजा बंद केला आणि माझ्या मुलीचा गळा दाबला, तिच्या तोंडात पेन्सिल घातली, मुलीला भिंतीवर आपटले, जमिनीवर फेकले आणि ४५ मिनिटे तिला टॉर्चर केले. ती माझ्या मुलीला खाली आपटत होती.

**सेंटर चालकाचे दुर्लक्ष**

मुलीच्या आईचा आरोप आहे की, डे-केअर सेंटरच्या मालकीण चारू अरोरा यांनी हे सर्व पाहिले पाहिजे होते. परंतु त्यांनी याकडे लक्ष दिले नाही. फुटेज पाहिल्यानंतर आईने मुलीचे सीटी स्कॅन केले आहे. मुलीच्या आईने सांगितले की, मला भीती वाटते की, माझी मुलगी दोन महिन्यांपासून तिथे जात होती, कदाचित हे रोजचच होते. फुटेज पाहिल्यानंतर, बाकीचे फुटेज पाहण्याची माझ्यात हिंमत होत नाही. या प्रकरणी आता पोलिस तपास सुरू झाला आहे. ■



रशिया-युक्रेन यांचे एकमेकांवरील हल्ले सुरूच असून युक्रेनच्या ५९ ब्रिगेडच्या एअर डिफेन्स तुकडीने निप्रोपेट्रोव्हस्क प्रांतात रशियन ड्रोन्सच्या दिशेने अग्निबाण डागले

# ‘कविता करना बंद किया क्या?’

### पंतप्रधान मोदींची आठवलेंना विचारणा

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

गेल्या काही दिवसांपासून राज्यासह राष्ट्रीय पातळीवरील राजकीय वर्तुळात अनेक घडामोडी घडताना दिसत आहेत. आरोप-प्रत्यारोप, दावे-प्रतिदावे सुरू आहेत. यातच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे नेते रामदास आठवले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतली. याप्रसंगी पंतप्रधानांनी ‘कविता करना बंद किया क्या?’ असा प्रश्न आठवलेंना केला.



पंतप्रधान मोदी यांच्याशी झालेल्या भेटीबाबत रामदास आठवले यांनी सांगितले की, पंतप्रधान मोदींशी सुमारे १० मिनिटे बोललो. मी त्यांच्यासमोर महाराष्ट्रातील परिस्थितीबद्दल माझे म्हणणे मांडले. परंतु, या भेटीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रामदास आठवले यांना कवितांबाबत विचारणा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी इच्छा व्यक्त करताच रामदास आठवले यांनी तत्काळ एक नवीन कोरी कविता करून दाखवली.

बोधगयाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रामदास आठवले दीर्घ काळानंतर आमने-सामने आले. आठवले यांनी मोदींना नमस्कार केल्यावर मोदींचे लक्ष आठवलेंच्या वाढलेल्या पोटाकडे गेले. ‘आप का वजन काफी बढ़ गया है’, अशा शब्दांत मोदींनी आठवले यांना अप्रत्यक्षपणे वजन नियंत्रणात ठेवण्याचा आदेशच दिला. त्यानंतर मोदींनी आठवले यांना, बहोत दिन हो गए आप की नई कविता नही सुनी, असे हसत हसत म्हणाले. कविता करना छोड तो नही दिया? असा प्रश्न करायलाही ते विसरले नाहीत. यामुळे आठवले मनोमन सुखावले. त्यांना दोन ओळी सुचल्या... दिल्ली में मेरा बढ गया वजन, हर कोई करता है मेरी कविता पसंद...

**महाराष्ट्रात मंत्रिपद मिळायला हवे होते**

दरम्यान, आरपीआयला महाराष्ट्रात कोणतेही मंत्रिपद मिळाले नाही किंवा सत्तेत विशेष भूमिका मिळाली नाही. महाराष्ट्रात आम्हाला मंत्रीपद मिळायला हवे होते, परंतु राज्यातील भाजपा युनिटने आम्हाला दिले नाही. यामुळे आमच्या समाजात नाराजी आहे. मी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी या विषयावर आधीच चर्चा केली आहे. आता आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका आणि नगरपालिका यासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आमच्या पक्षाला जागा मिळाव्या, अशी मागणी रामदास आठवले केली.

## चित्रपट वार्ता

### ‘असंभव’मध्ये मुक्ता-प्रियाची जोडी



**मुंबई :** येत्या काही महिन्यात मराठीत अनेक दमदार कथानकाचे चित्रपट येऊ घातले आहेत. त्यातच ‘असंभव’ या चित्रपटाची विशेष चर्चा आहे. याचा टीझर नुकताच समोर आला. यात मुक्ता बर्वे, प्रिया बापट यांची प्रमुख भूमिका असून त्यांच्याा जोडीला सचित पाटील आणि संदीप कुलकर्णी असे ताकदीचे कलाकार आहेत. विशेष म्हणजे, याचे दिग्दर्शन सचित पाटील आणि पुष्कर श्रोत्रीने केले आहे. याचा टीझर अतिशय उत्कंठावर्धक आहे. यात एक बंगला दाखवला असून रात्रीच्यावेळी बंगल्यात कोणीतरी शिरतं. ती व्यक्ती कोणाचा तरी शोध घेत असते. त्यानंतर एका खोलीत झोपलेल्या व्यक्तीच्या पोटात चाकू खुपसून तिचा खून होतो. शेवटी एक बाई जोरात किंचाळते. यात एक अद्भुत प्रेम कहाणी पाहायला मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, प्रेक्षकांना या चित्रपटाची थोडी वाट पाहावी लागणार आहे. हा चित्रपट नोव्हेंबरमध्ये प्रदर्शित होईल. ■

### टायगरच्या ‘बागी ४’चा टीझर आला समोर



**मुंबई :** ‘बागी ४’चा बहुप्रतिक्षित टीझर समोर आला आहे. यातही टायगर श्रॉफ मुख्य भूमिकेत आहेत. चाहत्यांना चित्रपटाचा टीझर खूप आवडला आहे. यात बराच रक्तपात दिसतो आहे. हा चित्रपट येत्या ५ सप्टेंबरला प्रदर्शित होणार आहे. यात टायगर व्यतिरिक्त संजय दत्त आणि सोनम बाजवा मुख्य भूमिकेत आहे. याशिवाय माजी मिस युनिव्हर्स हरनाज कौर संधू या चित्रपटाद्वारे हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहे. याची निर्मिती साजिद नादियाडवालाने केली असून चित्रपटाच्या टीझरला सीबीएफसीकडून ‘ए’ प्रमाणपत्र मिळाले आहे. विशेष म्हणजे, चित्रपटात ॲक्शन मसाला भरपूर असणार आहे. ■

### असित मोदींच्या घरी पोहोचली ‘दयाबेन’



**मुंबई :** ‘तारक मेहता का उल्टा चष्मा’मध्ये दयाबेनची भूमिका साकारून देशभरात लोकप्रिय झालेली दिशा वाकानी नुकतीच शोच्या निर्मात्याची भेट घेतली. रक्षाबंधनाच्या खास प्रसंगी तिने असित मोदी यांच्या घरी जाऊन त्यांना राखी बांधली, त्यानंतर निर्मात्याने तिच्या पायांना स्पर्श केला. या खास प्रसंगी दिशा वाकानीच्या मुलीही उपस्थित होत्या. निर्माते असित मोदी यांनी दिशा वाकानीसोबत रक्षाबंधन साजरा करतानाचा व्हिडीओ शेअर करून एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे. त्यांनी लिहिले आहे की, दिशा वाकानी ही फक्त आमची दया भाभी नाही तर माझी बहीण आहे. गेल्या काही वर्षांत हास्य, आठवणी आणि जवळीक शेअर करत हे नाते पडद्याच्या पलीकडे गेले आहे. दिशा वाकानीने २०१७ मध्ये गरोदरपणामुळे प्रसूती रजा घेतली होती. मात्र, त्यानंतर ती परतली नाही. असित मोदी यांनी तिला शोमध्ये आणण्यासाठी खूप प्रयत्न केले, पण ते शक्य झाले नाही. ■

## स्वातंत्र्यदिनी मांस विक्रीवर बंदी घालण्याच्या आदेशाने वाद

**ठाणे/मुंबई :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने स्वातंत्र्यदिनी मांस विक्रीवर बंदी घालण्याच्या आदेशावरून वाद निर्माण झाला आहे.या आदेशावर विरोधी पक्ष-शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठा शिवसेनेच्या नेत्यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. हा आदेश म्हणजे लोकांच्या अन्न निवडीचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे. कल्याण महानगरपालिकेच्या आदेशानुसार, सर्व कत्तलखाने व शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या आणि मोठ्या प्राण्यांचे परवानाधारक कसाईंची दुकाने १४ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून १५ ऑगस्टच्या मध्यरात्रीपर्यंत २४ तास बंद ठेवावीत. नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्याचा इशारा महानगरपालिकेने दिला. १९८८ पासून दरवर्षी नागरी ठरावाचा भाग म्हणून असाच आदेश जारी केला जात आहे. सार्वजनिक सुव्यवस्था व महत्त्वाच्या राष्ट्रीय सणाप्रसंगी पाळण्यासाठी प्रचलित असलेल्या प्रशासकीय ठरावांनुसार हे पाऊल उचलण्यात आले आहे, असे कल्याण महानगरपालिकेचे उपायुक्त (परवाना) कांचन गायकवाड यांनी सांगितले.

# कबुतरखान्यावर पुन्हा ताडपत्री

### महापालिकेने वाढवली सुरक्षा

**मुंबई, ११ ऑगस्ट**

दादरमधील कबुतरखान्यावर मुंबई महापालिकेने पुन्हा एकदा ताडपत्री घातली आहे, असे अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले होते. आंदोलकांनी यापूर्वी येथील ताडपत्री काढून टाकली होती.

कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये आणि लोकांना पक्ष्यांना खायला घालण्यापासून रोखण्यासाठी परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले. ६ ऑगस्ट रोजी कबुतरांना धान्य देण्याची पद्धत रोखण्यासाठी दादर कबुतरखान्यात बृहन्मुंबई महापालिकेने घातलेली ताडपत्री मोठ्या संख्येने आलेल्या निदर्शकांनी काढून टाकली होती. यावेळी त्यांची पोलिसांसोबत झटापट झाली होती. त्यात जैन समुदायाच्या लोकांचा कोणताही हात नव्हता, असा दावा मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केला होता. मुंबई महापालिकेने रविवारी पुन्हा कबुतरखान्यावर ताडपत्री टाकली. पश्चिम दादरमध्ये असलेल्या कबुतरांच्या खाद्य क्षेत्रावर चांदीच्या रंगाच्या प्लॅस्टिकच्या चादरी टाकण्यापूर्वी त्यांनी घटनास्थळी खराब झालेले बांबूचे आवरण दुरुस्त केले.

असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये आणि लोकांना पक्ष्यांना खायला घालण्यापासून रोखण्यासाठी, त्या ठिकाणी सुरक्षा वाढवण्यात आली आहे आणि महापालिकेने कबुतरखान्यात आपले मार्शलही तैनात केली आहे, असे त्यांनी सांगितले.



# कॅटी बॉस आणि कटिया देवी यांचा मुलगा कॅट कुमार!

## बिहारमधील रहिवासी प्रमाणपत्रासाठीचा अर्ज पुन्हा चर्चेत

**पाटणा, ११ ऑगस्ट**

बिहारमध्ये कधी काही घडेल याचा नेम नाही, आपण विचारही करू शकणार नाही. गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळ्या घटना उजेडात येत आहेत. आता येथे रहिवासी प्रमाणपत्रासाठी चक्क एका मांजराने अर्ज केल्याचा प्रकार समोर आला आहे. बिहारमधील रोहतास येथे ‘कॅटी बॉस’ आणि कॅटिया देवी यांचा मुलगा ‘कॅट कुमार’ याच्या रहिवासी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज दाखल करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे या अर्जामध्ये फोन नंबर आणि इमेल आयडी अशी माहिती देखील भरण्यात आली आहे.



इतकेच नाही तर हा अर्ज सुरुवातीच्या टप्प्यातच बाद न होता तो पुढे देखील पाठवण्यात आला आहे. देण्यात आलेल्या तक्रारीनुसार, २९-०७-२०२५ रोजी मोबाइल क्रमांक ६२०५६३१७९९ यावरून कॅट कुमार नावाने रहिवासी प्रमाणपत्र जारी करण्यासाठी अर्ज मिळाला, ज्यामध्ये वडीलांचे नाव कॅटी बॉस आणि आईचे नाव कटिया देवी असे होते. दिलेला पत्ता होता हा गाव अतिमिगंज, वॉर्ड क्रमांक ०७, पोस्ट महादेवा, पोलिस स्टेशन नसरीगंज, पिन ८२१३१०. अर्जदाराच्या छायाचित्र म्हणून एका मांजराचा फोटो अपलोड करण्यात आला होता. तर या अर्जाबरोबर ईमेल दिला होता.

हा प्रकार उजेडात आल्यानंतर जिल्हा दंडाधिकारी उदित सिंह यांनी अधिकाऱ्यांना कारवाईचे आदेश दिले आहेत, तसेच एका अनोळखी व्यक्तीविरोधात नरसिंगगंज पोलिस ठाण्यात १० ऑगस्ट २०२५ रोजी तक्रार देखील दाखल करण्यात आली आहे.

दरम्यान, तक्रारीत अधिकाऱ्याने म्हटले आहे की हा अर्ज खोट्या माहितीच्या आधारे करण्यात आला होता आणि त्याचा उद्देश सरकारी कार्यपद्धतींची खिल्ली उडवणे होता. या प्रकरणाचा आता पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## अग्रलेख...

# पवारांचे पोकळ 'पंच'तंत्र!

लाल मातीतल्या किंवा आखाड्यातल्या कुस्तीचा जमाना आता राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर मागे पडत चालला असल्याने या कुस्तीच्या खेळाचे सारेच नियम नव्या मॅटवरच्या कुस्ती स्पर्धेत चालत नाहीत. आखाड्यातल्या कुस्तीत, धोबीपछाडसारखे डावपेच खेळून प्रतिस्पर्ध्याची पाठ जमिनीला लावणारा पैलवान विजयी ठरत असला, तरी मॅटवरच्या, नव्या जमान्यातल्या कुस्तीत एवढा एकच नियम विजयासाठी पुरेसा नसतो. या दोन्ही प्रकारच्या कुस्तीचे नियम वेगळे असतात, खेळायची पद्धतही वेगळी असते, विजयाचे निकष वेगळे असतात आणि मैदानही वेगळे असते. मॅटवरची कुस्ती किंवा फ्रीस्टाईल कुस्ती बंदिस्त मैदानात मॅटवरच खेळली जाते आणि त्याची आंतरराष्ट्रीय मानके ठरलेली असतात, ती गुणांच्या आधारावर खेळली जाते. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनीही लाल मातीतील कुस्तीगीरांच्या संघटनेचे नेतृत्व केले होते. बहुधा त्यामुळेच धोबीपछाड हा त्यांचा आवडता डाव असल्याची चर्चा राजकारणाच्या आखाड्यातही होत असते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना, दूरदर्शन या सरकारी चित्रवाणीवरील एका मुलाखतीत स्वतः पवार यांनीही त्याची तशी कबुली दिली होती आणि लोकांच्या अशा समजुतीची आपण मजा अनुभवत असतो, असेही तेव्हा त्यांनी अभिमानाने सांगितले होते. त्या मुलाखतीनंतर शरद पवार यांचे राजकारण अनाकलनीय आहे असा समज दृढ होऊ लागला. त्यांच्या राजकारणाचा हा प्रवास, आजही, त्यांच्या वयाच्या या टप्प्यावरही तशीच मजा अनुभवत सुरू असल्याने, अशी गंमत करणे हा आपल्या राजकारणाचाच एक भाग आहे, असाही त्यांचा समज असावा. राजकारणाच्या उमेदीच्या काळात याच राजकारणाचा वापर करून त्यांनी राजकारणाचा आखाडा गाजविला आणि त्यांच्या अनाकलनीय राजकारणाचा फटका बसलेल्या अनेकांना, जमिनीला पाठ लागेपर्यंत पराभव झाल्याचे लक्षातही आले नाही. धोबीपछाड देऊन प्रतिस्पर्ध्यास आखाड्याबाहेर घालविण्याचे त्यांचे कौशल्य तेव्हा अनेकांनी मान्य केल्याने, आजही तीच स्थिती असावी असा काहींचा समज असला, तरी आता कुस्तीचे नियमच बदलले आहेत. लाल मातीच्या आखाड्यातल्या कुस्तीचे नियम आता मॅटवरच्या कुस्तीत चालत नाहीत आणि आखाड्यातील कुस्तीच्या नियमांतील लवचीकपणादेखील या प्रकारात खपवून घेतला जात नाही. पवार यांनी दीर्घकाळ राजकारणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातील अनेक खेळांच्या संघटनांचेही नेतृत्व केल्याने, त्यांच्या राजकारणात प्रतिस्पर्ध्यास खेळविण्यावरही बराचसा भर असे. मात्र, गेल्या सुमारे दशकभरापासून पवारांच्या आवडत्या कुस्ती प्रकाराचे डावपेच कालबाह्य झाले असून राजकारणाच्या आखाड्यातील कुस्तीतही त्यांच्यासमोर शड्डू ठोकून उभे राहण्याची उमेद असलेले नवे कसलेले मल्ल आता प्रतिस्पर्धी गटांतही तयार झाल्याने पवारांची सद्दी संपत चालली आहे. कुस्तीच्या खेळात प्रतिस्पर्ध्यावरील पकड मजबूत असावी लागते, हे पवारांना पूर्वी चांगले ठावूक होते. आता मात्र त्यांचीच पकड सैल होत चालल्याने, कुस्तीच्या आखाड्यात उतरल्यानंतरही धरसोडीचाच प्रकार अधिक होत असून यातही त्यांना बरेचदा माघारच घ्यावी लागल्याने, तडजोडीची कुस्ती किंवा लुटुपुटूची कुस्ती खेळून मैदानात टिकून राहण्यासाठी त्यांची सुरू असलेली धडपड आता स्पष्ट दिसू लागली आहे. नव्या नेतृत्वाला संधी देऊन पक्षावरील ताबा सोडून केवळ सल्लागाराची भूमिका बजावण्याचा अजित पवार यांनी त्यांना दिलेला सल्ला धुडकावूनही त्यांनी पक्षावर ताबा टिकविण्यासाठी घेतलेल्या भूमिकेचे तेव्हा काहीसे कौतुक झालेदेखील असेल, पण त्यापायीच पक्ष फुटला आणि तडजोडीच्या राजकारणासाठी धरसोडीचे अनेक डाव खेळूनही यशस्वी ठरले नाहीत हेदेखील स्पष्ट झाले. सत्ता हे कोणाच्याही राजकीय कारकीर्दीचे अंतिम उद्दिष्टच असते. दीर्घकाळ राजकारणात राहून वेगवेगळी सत्तापदे उपभोगलेले शरद पवार हे त्यास अपवाद असतील असेही नाही. कदाचित त्यामुळेच सत्तेच्या सान्निध्यात राहण्यासाठी त्यांना कराव्या लागणाऱ्या तडजोडींपायी जुन्या कुस्तीचे लवचीक नियम अधिक लवचीक करण्याची वेळही त्यांच्यावर अनेकदा आली. भाजपासोबत सत्ता स्थापन करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे पितळ खुद्द अजित पवारांनीच अनेकदा उघडे पाडल्याने, पवारांच्या जुन्या, अनाकलनीय राजकारणातील त्यांनाच वाटणारी गंमतही आता सपक झाली आहे आणि त्यांच्या राजकारणाचा बराचसा भाग विनोदी वाटू लागला आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणुकीत मत चोरी झाल्याचा आरोप करत निवडणूक आयोगाच्या नावाने बोटे मोडण्यास सुरुवात केल्यावर, राजकारणातील सर्वांत मोठा ॲटम बॉम्ब फुटल्याच्या अपेक्षेने पुढच्या घडामोडींकडे पाहणाऱ्यांचा बराचसा हिरमोड झाल्याचे लक्षात येताच शरद पवार पुढे सरसावले. एखादी नवी, बिनबुडाची लोणकढी पुढे आणली तर सध्याच्या संशय निर्माण करण्याच्या वातावरणात आपलेही घोडे पुढे दामटणे शक्य होईल, असा प्रयत्न शिवसेनेच्या उबाठा गटाचे खासदार संजय राऊत नेहमीच करत असतात. त्याकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नसले किंवा त्यांच्या त्या प्रयत्नांतून साध्या लवंगी फटाक्याचाही आवाज निघत नसला, तरी बातम्यांचा रतीब टाकण्यासाठी भुकेल्या वाहिन्यांची भूक भागविणारा चटकदार मसाला मिळत असल्याने वाहिन्यांवर मात्र अशा प्रयत्नांना सर्वांत मोठ्या बातमीची जागा मिळते हे स्पष्ट झाले आहे. राहुल गांधी यांना त्या कथित ॲटम बॉम्बची कल्पनादेखील संजय राऊत यांच्या तंत्रावरूनच सुचली असावी, असे एक सूचक विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्यावर पवार यांनाही त्याचे अनुकरण करण्याची अनावर इच्छा झाली असावी. अन्यथा, शेंडाबुडखा नसलेली एक लोणकढी बातमी सोडून त्यांनी राहुल गांधींच्या फुसक्या ॲटम बॉम्बच्या चर्चेची हवा काढून घेण्याचा प्रयत्न केलाच नसता. पवार यांच्या अनाकलनीय राजकारणाची पूर्वीची सद्दी केव्हाच संपल्याने, ते स्वतः अजूनही त्याची कितीही गंमत अनुभवत असले, तरी त्याचेदेखील गांभीर्य आता राहिलेले नाही. मुंबईतील तेराव्या बॉम्बस्फोटाची अफवा पसरवून आपल्याच अनाकलनीय राजकारणाची गंमत अनुभवण्याचा त्यांचा प्रयत्न तेव्हा त्यांच्या जसा अंगाशी आला होता, तसाच भीमा कोरेगाव प्रकरणात नाहक काही जणांभोवती संशय पेरून गंमत अनुभवण्याचा प्रकार त्यांना फारसा पेलता आला नव्हता. हिंदू दहशतवादाचा भ्रम जनतेमध्ये पसरविण्याचा काँग्रेसच्या कटात सहभागी होण्याचा त्यांचा प्रयत्नही फारसा यशस्वी ठरला नव्हता. निवडणुकीच्या काळात दोघे जण आपल्याला भेटले व १६० जागांवर विजय मिळवून देण्याची हमी त्यांनी दिली, हा पवारांचा नवा 'पंच'देखील फुसका ठरला आहे. कुस्तीच्या खेळात पंच मारणे हा फाऊल समजला जातो. पवार यांनी ज्या कुस्तीच्या खेळाचे नेतृत्व केले, त्या खेळात तर लवचीक नियम असूनही पंच मारण्यास परवानगीच नाही. त्यामुळे आखाड्यातील कुस्तीत हा वेगळाच पंच मारण्याचा प्रयत्न म्हणजे फाऊल ठरला आहेच; पण त्यांच्या कालपरवापर्यंत अनाकलनीय वाटणाऱ्या राजकारणाचा फोलपणाही उघडा पडला आहे. जेव्हा प्रतिस्पर्धीच नसतो, तेव्हा एखादा मल्ल आपल्याच मस्तीत शड्डू ठोकत आखाड्यात उतरतो, पण तेव्हाच्या राजकीय आखाड्यातील तशी परिस्थिती आता राहिलेली नाही. आता कुस्तीचे आव्हान स्वीकारणारेच नव्हे, तर आव्हान देणारे कसलेले आणि नव्या दमाचे मल्ल राजकारणात उतरलेले आहेत आणि जुना धोबीपछाडचा डाव कुचकामी ठरतो, हे त्यांनी सिद्धही केले आहे. निवडणुकीत विजय मिळवून देण्यासाठी दोघांनी आपली भेट घेतली, त्यांची आपण राहुल गांधींशी गाठ घालून दिली आणि अखेर दोघांनीही हा देकार नाकारला, हा त्यांचा बिनबुडाचा दावा बातम्यांसाठी भुकेल्या वाहिन्यांनी गांभीर्याने लोकांसमोर ठेवला, अपेक्षेप्रमाणे त्यांचा तो फटाकाही राहुल गांधी यांच्या फुसक्या बॉम्बसारखाच फुसका ठरला; तरीही पवारांपाठोपाठ जाग आलेल्या संजय राऊत यांनीही तसाच दावा केला आहे. म्हणजे, आता राऊत यांच्या रांगेत खुद्द राहुल गांधी आणि शरद पवारदेखील दाखल झाले आहेत, एवढेच!

## आंतरराष्ट्रीय

# बांगलादेश, म्यानमारमधील संकट वाढणार?

**प्रा. जयसिंग यादव**



२०२१ मध्ये झालेल्या उठावानंतर म्यानमार गृहयुद्धात बुडाला आहे. लष्करी जुंटा गटाला सत्तेवरून हटवण्यासाठी अनेक सशस्त्र गट लढत आहेत. गेल्या दोन वर्षांमध्ये जुंटाने देशाच्या जवळजवळ अर्ध्या भागावरील नियंत्रण गमावले आहे. तिथे जातीय बंडखोर सैन्य आणि प्रतिकार गट देशाचा एकामागून एक भाग ताब्यात घेत आहेत. दुसरीकडे, ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशमधील शेख हसीनांचे सरकार अराजकांनी उलथवून टाकल्यानंतर बांगलादेशमध्ये अराजकता पसरली. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकार आतापर्यंत सत्तेत आहे. त्याने अवामी लीग आणि त्यांच्या सहयोगी पक्षांविरुद्ध सूड उगवण्याच्या कारवाया सुरू केल्या आहेत. कट्टरपंथी इस्लामिक शक्ती तिथे अधिक मजबूत झाल्या आहेत. युनूस सरकारने हसीना यांच्या काळात तुरुंगात असलेल्या दहशतवादी संघटनेच्या अन्सारुल्ला बांगला टीमचे प्रमुख जसीमुद्दीन रहमानीसारख्या कैद्यांना सोडले. लष्कराच्या दबावाला न जुमानता युनूस यांनी निवडणूक रोडमॅप जाहीर केलेला नाही. ५ ऑगस्ट रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात त्यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या निवडणुकांवर भाष्य केले; परंतु जर 'सर्व काही व्यवस्थित झाले' तर अशी 'जर, तर'ची भाषा त्यांनी वापरली. मुख्य निवडणूक आयुक्त एएमएम नसिरुद्दीन यांनी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या संसदीय निवडणुकांची पुष्टी केली; परंतु अनेक अडचणी पुढे केल्या. युनूस हे या मार्गातील सर्वांत मोठे अडथळे मानले जातात.

दोन महिन्यांपूर्वी लंडनमध्ये बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी)चे कार्यकारी अध्यक्ष तारिक रहमान यांच्याशी झालेल्या बैठकीत युनूस यांनी फेब्रुवारीच्या सुरुवातीला निवडणुका होण्याची शक्यता व्यक्त केली होती; परंतु तोपर्यंत काही आवश्यक सुधारणा पूर्ण कराव्यात अशी अट घातली होती. यापूर्वी त्यांनी जून २०२६ मध्ये निवडणुका घेऊ असे भाष्य केले होते. अंतरिम सरकारचे प्रमुख म्हणून त्यांनी सत्ता घेताच तीन महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे जाहीर केले होते; परंतु हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून कारभार हाती घेऊन एक वर्षाहून अधिक काळ झाला असला, तरी त्यांना आता खुर्चीचा मोह सुटत नाही, हे दिसते. युनूस जागावाटपावर 'बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी' (बीएनपी)शी जोरदार सौदेबाजी करत आहेत. शेख हसीना यांचे सरकार असताना 'बीएनपी' पक्षाच्या अनेक नेत्यांना न्यायालयाने देशद्रोही कारवायांबद्दल दोषी ठरवून शिक्षा दिली होती. अंतरिम सरकारच्या काळात या सर्वांची सुटका करण्यात आली. त्यात युनूस यांचा मोठा वाटा होता. त्यांना आता त्याची परतफेड हवी आहे. ३०० जागांच्या संसदेतील किमान ५० जागा 'जमात-ए-इस्लामी'साठी आणि तितक्याच जागा 'नॅशनल सिटिझन्स पार्टी' (एनसीपी) आणि इतर लहान इस्लामिक पक्षांसाठी सोडाव्यात अशी त्यांची इच्छा आहे. 'बीएनपी'ने पूर्वी 'जमात-ए-इस्लामी'शी युती केली होती; पण आता अनेक नेते स्वतंत्रपणे निवडणूक लढवू इच्छितात.

'जमात-ए-इस्लामी'चा इतिहास वादग्रस्त आहे. कारण त्यांनी १९७१ च्या मुक्ती युद्धात पाकिस्तानी सैन्याला पाठिंबा दिला होता. त्यामुळे, अनेक 'बीएनपी' नेते त्यांच्यापासून दूर राहून आपली राष्ट्रवादी प्रतिमा मजबूत करू इच्छितात; परंतु 'जमात-ए-इस्लामी' आणि राष्ट्रवादी हे युनूसचे मोठे समर्थक आहेत. राष्ट्रवादीची स्थापना हसीना यांना सत्तेवरून काढून टाकणाऱ्या विद्यार्थी-युवा ब्रिगेडने केली होती. युनूस यांची महत्त्वाकांक्षा वाढली असून, त्यांना अध्यक्ष व्हायचे आहे. राष्ट्रपती बनण्यासाठी ते एक मजबूत युती तयार करू इच्छितात. अध्यक्षपदामुळे त्यांना दैनंदिन कारभाराच्या ताणाशिवाय धोरणांवर प्रभाव पाडण्याची संधी मिळेल. हसीना यांच्या कार्यकाळात त्यांच्याविरुद्ध खटले दाखल झाले होते. हे त्यांना भविष्यातील कायदेशीर कारवाईपासूनही मुक्त करेल; पण 'अवामी लीग'वर निवडणूक लढवण्यास बंदी घातली गेल्यास युनूस निष्पक्ष निवडणुका घेऊ शकतील का, हा प्रश्नच आहे. हसीना यांच्या कथित हुकूमशाही राजवटीच्या नावाखाली अवामी लीगला निवडणूक लढवण्यास बंदी घालणे म्हणजे १९८० च्या दशकात आणिबाणीमुळे काँग्रेसला निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यासारखेच असेल.

दुसरीकडे, म्यानमारची लष्करी सत्ता सांभाळणारे जुंटा घाईत आहेत. जुंटा प्रमुख वरिष्ठ जनरल मिन आंग ह्याईंग यांनी जुलैच्या अखेरीस आणिबाणी उठवली आणि डिसेंबर-जानेवारीमध्ये टप्प्याटप्प्याने राष्ट्रीय निवडणुका घेण्यास परवानगी दिली. २००८ च्या संविधानानुसार, आणिबाणी उठवल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडणुका घेणे आवश्यक आहे. जुलैमध्ये राष्ट्रीय संरक्षण आणि सुरक्षा परिषदेने राज्य प्रशासन परिषद विसर्जित केली. त्या जागी राज्य सुरक्षा आणि शांतता आयोगाची स्थापना करण्यात आली. त्याचे नेतृत्व ह्याईंग यांनी केले. ते कार्यवाहक अध्यक्षदेखील आहेत. 'द ग्लोबल न्यू लाईट ऑफ म्यानमार'मध्ये प्रकाशित झालेल्या वृत्तानुसार, हा आयोग संरक्षण, सुरक्षा आणि शांततेसाठी काम करेल आणि बहुपक्षीय लोकशाही निवडणुका सुनिश्चित करेल. या आयोगाकडे कार्यकारी, कायदेविषयक आणि न्यायिक अधिकार असतील. ह्याईंग यांच्याकडे लष्करप्रमुख आणि कार्यवाहक अध्यक्षपद असल्याने हे बदल आंतरराष्ट्रीय समुदायाला आकर्षित करण्यासाठी केवळ एक देखावा आहे हे स्पष्ट आहे. जुंटा निष्पक्ष निवडणुका घेऊ शकेल का, याबाबत अनेकांना शंका आहे. कारण आंग सान सू की यांच्या 'नॅशनल लीग फॉर डेमोक्रसी' आणि वांशिक बंडखोर गटांसारखे लोकशाही पक्ष निवडणुकांवर बहिष्कार टाकू शकतात. ह्याईंग यांनी अलिकडेच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला. ट्रम्प प्रशासनाने बर्मी लष्करी सहयोगींच्या काही कंपन्यांवरील निर्बंध उठवले. त्यामुळे ह्याईंग यांना प्रोत्साहन मिळाले.

बांगलादेश आणि म्यानमारमधील निवडणुका राजकीय स्थैर्य आणतील आणि भारताला नवीन राज्यकर्त्यांशी मजबूत संबंध निर्माण करण्यास मदत करतील, असा आशावाद अनेक जण बाळगून आहेत. भारतीय राज्यकर्त्यांनाही त्याचीच प्रतीक्षा आहे. आज भारताचा प्रत्येक शेजारी अंतर्गत समस्यांमुळे अस्वस्थ असून इतर देशांशीही सतत संघर्ष अनुभवत आहे. याचा परिणाम भारतावरही होत आहे. कारण पैसा, रोजगार, शांतता, स्थैर्य यापैकी कोणत्या तरी कारणासाठी अनेक प्रांतांमध्ये बंडखोर, अतिरेकी किंवा नक्षलवादी सीमावर्ती भागात हिंसाचार घडवत उपद्रवमूल्य वाढवतात. प्रसंगी भारतातही शिरतात. त्यांच्यापासून आपल्या देशाला धोका आहेच. मात्र अशा प्रकारे निर्माण होत असलेली अस्वस्थता या शेजारी देशांमध्ये लोकशाही नांदल्यास कमी होऊ शकते. त्यामुळे भारताची डोकेदुखी कमी होईल; पण असे होण्याची शक्यता कमी आहे. बांगलादेशमध्ये 'बीएनपी', 'जमात-ए-इस्लामी', 'राष्ट्रवादी आणि इतर इस्लामिक पक्षांचे युनियन बनवून युनूस राष्ट्रपती झाले, तरी त्याचा परिणाम त्या देशात अराजकता येण्यात होणार आहे. 'अवामी लीग'ला निवडणुकीतून बाहेर ठेवले गेले, तर ही निवडणूक निष्पक्ष मानली जाणार नाही. 'अवामी लीग'ने देशात अर्ध्याहून अधिक काळ राज्य केले आहे आणि त्यांची मोठी मतपेढी आहे. निवडणुका निष्पक्ष असतील आणि 'अवामी लीग'ला निर्भयपणे सहभागी होण्याची संधी मिळाली तर शेख हसीनासह त्यांचे बहुतेक नेते बांगलादेशमध्ये परतले असते; परंतु त्यांच्या मनात भीती आहे की बांगलादेशमध्ये परतल्यानंतर त्यांच्या जीविताला धोका होण्याची शक्यता आहे.

या पृष्ठभूमीवर सुरक्षिततेची खात्री होत नाही. तोपर्यंत 'अवामी लीग'चे नेते तेथे परतणार नाहीत. परिणामी, बांगलादेशमध्ये कट्टरतावाद्यांची सत्ता येण्याची दाट शक्यता आहे. कट्टरतावाद्यांच्या हाती सत्ता जाण्याने भारताची डोकेदुखी वाढणार आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# आदर्श गावांतील अभिनव ठराव

महाराष्ट्रातील अनेक ग्रामपंचायतींनी घेतलेले अनोखे ठराव केवळ कागदापुरते मर्यादित न राहता गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे ठरले आहेत. अशा ठरावांमुळे गावकऱ्यांच्या जीवनमानात, लोकशाही प्रक्रिया, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, आर्थिक विकास स्वनिर्मित उद्योग शेतीपूरक व्यवसाय अशा अनेक बाबतीत प्रत्यक्ष फायदे झाले आहेत. मूल्याधिष्ठित गाव म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्याच्या साताऱ्याची ओळख आहे. यंदाच्या महाराष्ट्र दिनी या गावच्या ग्रामसभेत शिवीमुक्त गाव करण्याच्या प्रस्तावाला एकमताने मान्यता दिली. कोणीही महिलांचा अपमान करणारी भाषा वापरल्यास, शिवी दिल्यास त्याच्याकडून ५०० रुपये दंड आकारला जाईल. दंड न भरल्यास संबंधित व्यक्तीला ग्रामपंचायतीकडून कोणतेही सरकारी दाखले दिले जाणार नाहीत, असा निर्णय घेण्यात आला. गावातील वादावादीत आई-बहिणींवरून अपमानास्पद शिव्यांचा वापर वाढत असल्याने दीड हजार लोकसंख्या असलेल्या साताराच्या ग्रामपंचायतीने महिलांच्या सन्मानासाठी अभिनव आणि ठोस पाऊल उचलले. ग्रामपंचायतीचे सरपंच गजानन गुळधे यांनी यासाठी पुढाकार घेतला. भांडणे होत असतील, तर ती समजुतीने मिटवावी, पण स्त्रियांबाबत अपमानास्पद शब्दप्रयोग यापुढे खपवून घेतला जाणार नाही, असा संदेश त्यांनी ग्रामसभेत दिला. सुरुवातीला काहींनी या निर्णयाला विरोध दर्शविला, मात्र गावातील शिक्षक, आरोग्य सेविका व ज्येष्ठ नागरिकांनी योग्य समज दिल्याने सगळ्यांनी त्यास पाठिंबा दिला. या सकारात्मक निर्णयामुळे गावात नव्या पिढीवर चांगले संस्कार होतील या प्रस्तावाला शिवीमुक्त गाव, दारूबंदी व स्वच्छता मोहीम, तंटामुक्त गाव यासारख्या इतर सामाजिक उपक्रमांची जोडही देण्यात आली.

आदर्श ग्रामपंचायत म्हणून राज्यभरात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाटोदा ग्रामपंचायतीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. देशपातळीवर पर्यावरण जलसंवर्धन ग्रामपंचायत श्रेणीत पाटोदा ग्रामपंचायतीने दुसरा क्रमांक पटकावला आहे. माजी सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्या काळात पाटोदा गावाची राज्यभर चर्चा सुरू होती. त्या काळात ग्रामविकासाचा पाटोदा पॅटर्न विविध ग्रामपंचायतींसाठी आदर्श ठरला होता. त्यांच्या सहकाऱ्यांनी पाटोदा गावाच्या आदर्शपणाचा इतिहास कायम ठेवला आहे. राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांसाठी २०२३ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाटोदा ग्रामपंचायतीने देशपातळीवर झेंडा रोवला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आदर्श ग्रामपंचायत पाटोदा-गंगापूर नेहरीला देशातून दुसऱ्या क्रमांकाचा नुकताच नॅशनल पंचायत अवॉर्ड कार्बन न्युट्रल ग्रामपंचायत पुरस्कार जाहीर झाला. नवी दिल्ली येथे हा पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार येथे पाण्याचे योग्य नियोजन, जलसंधारण आणि पर्जन्यजल व्यवस्थापनासाठी हे गाव प्रसिद्ध आहे. शेतकऱ्यांनी सामूहिकरीत्या जलसंधारणाचे काम केले. गावात ओढे, तलाव आणि बंधारे बांधून पाण्याची उपलब्धता वाढवण्यात आली. पिण्याच्या पाण्याची सोय, सिंचनाची सोय आणि जमिनीची सुपीकता वाढली आहे. धुळे जिल्ह्यातील रोहिणी ग्रामपंचायत ग्रामीण ई-शासनाचा आदर्श रोहिणी गावात डिजिटल सेवा अगदी गावात पोहोचवणाऱ्या सर्व योजनांची ई-सेवा प्रणाली लागू करण्यात आली जिथून ग्रामपंचायतचे सर्व व्यवहार आजकाल इलेट्रॉनिक पद्धतीने होतात. या उपक्रमामुळे गावातील लोकांना विविध सेवांमध्ये प्रवेश सोपा झाला जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, तक्रारी, सूचना, अवघ्या ग्रामीण सेवांमध्ये सातत्य मिळाले. याच ग्रामपंचायतीने २०२५ मध्ये पुरस्कार जिंकले. गावात ९५० पेक्षा जास्त ऑनलाईन डिजिटल सेवा समावेश आहे. सोलापूर जिल्ह्यातील नराले गावाने ठराव घेऊन विधवांना रोजगारासाठी शेतीकामात संधी देण्यासोबतच जास्त योजनेत विधवांना काम मिळाल्याने महिला आत्मनिर्भर झाल्या. त्यांचा आत्मसन्मान वाढला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्होकल ते लोकल हा नारा दिल्यानंतर देशभरात याबद्दल चर्चा झाली परंतु प्रत्यक्षात किती जण हे तत्त्व मनापासून आचरणात आणतात? आपल्यापैकी अनेकांना बाहेरचं भारी वाटतं. गावातील उद्योग व्यवसायातून तयार झालेल्या वस्तूंऐवजी ऑनलाईन मागवणे, मुंबई-पुण्याच्या टॅग असलेल्या सेवांवर भरवसा ठेवणे ही आपल्या रोजच्या वस्तू खरेदीतील सवय झाली आहे. परंतु हे करत असताना आपण आपल्याच शेजारी, गावकरी, स्थानिक व्यावसायिक आणि उद्योजकांना दुर्लक्षित करत आहोत, याची जाणीव फार थोड्यांना असते. प्रत्यक्षात आपण हा मंत्र किती प्रमाणात आचरणात आणतो, याचा विचार करण्याची गरज आहे. ही केवळ सरकारची जबाबदारी नसून सर्वांची आहे. स्थानिकांसाठी आवाज उठवणे, त्यांच्या कामावर विश्वास ठेवणे ही एक संस्कृती बनायला हवी.

९८८१७१७८२८

## दखल

# डॉ. रंगनाथन् आणि आजचे माहिती युग

**प्रा. डॉ. मोहन रतकंठीवार**

आजच्या माहितीच्या युगात ज्ञानाचे महत्त्व जसे वाढले आहे तसेच ज्ञानाच्या व्यवस्थापनाचे महत्त्वही अफाट वाढले आहे. या संदर्भात भारताने एक महान व्यक्तिमत्त्व दिले, डॉ. शियाली रामामृत रंगनाथन् ज्यांनी ग्रंथालयशास्त्राला एक वैज्ञानिक आणि तात्त्विक अधिष्ठान दिले. त्यांचे विचार, कार्य आणि त्यांनी घडवलेला ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम हा आजच्या डिजिटल युगातही तितकाच महत्त्वाचा व प्रभावी आहे.

डॉ. एस. आर. रंगनाथन् यांचा जन्म १२ ऑगस्ट १८९२ रोजी तामिळनाडू राज्यातील शियाली येथे झाला. गणित या विषयात पदवी घेतल्यानंतर त्यांनी ग्रंथालयशास्त्राचा अभ्यास लंडन येथे केला. ते भारतातील पहिले व्यावसायिक ग्रंथपाल ठरले. त्यांनी ग्रंथालयशास्त्राला एका शास्त्रीय पद्धतीने विकसित केले आणि ग्रंथालय प्रणालीमध्ये अनेक क्रांतिकारी बदल घडवून आणले. डॉ. एस. आर. रंगनाथन् यांनी मांडलेले ग्रंथालयशास्त्राचे पाच मूलभूत नियम आजही संपूर्ण जगभर मान्यताप्राप्त आहेत. ग्रंथ उपयोगासाठी आहेत, प्रत्येक वाचकाला त्यांचा ग्रंथ मिळाला पाहिजे, प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळाला पाहिजे, वाचकाचा वेळ वाचावा आणि ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे. हे पाच नियम केवळ ग्रंथालय व्यवस्थापनापुरते मर्यादित नसून, आधुनिक माहिती व्यवस्थापन आणि डिजिटल डेटाबेसच्या संदर्भातही लागू होतात. यामुळेच ते आजही टाईमलेस ठरतात. डॉ. रंगनाथन् यांनी विकसित केलेली कोलन वर्गीकरण पद्धती ही विशिष्ट वैज्ञानिक दृष्टिकोनातून तयार केलेली प्रणाली होती. 'पीएमईएसटी' (पर्सनालिटी, मॅटर, एनर्जी, स्पेस, टाईम) या पाच परिमाणांवर आधारित ही पद्धत आजही संशोधनग्रंथ, प्रबंध आणि तांत्रिक माहितीचे व्यवस्थापन करण्यात उपयुक्त आहे. या वर्गीकरण प्रणालीमुळे जटिल माहितीचेही सुगम आणि सुसूत्र व्यवस्थापन शक्य झाले, ज्याचा उपयोग आजच्या डिजिटल ग्रंथालय, डेटाबेस व्यवस्थापन पद्धतीमध्ये केला जातो.



डॉ. रंगनाथन् यांच्या काळात ग्रंथालयशास्त्र हे केवळ पुस्तकांचे व्यवस्थापन, वर्गीकरण आणि वाचनालय चालवणे यापुरते मर्यादित होते. परंतु आजचे ग्रंथालयशास्त्र 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र' या रूपात अधिक व्यापक आणि बहुआयामी झालेला आहे. आजच्या अभ्यासक्रमात सूचना आणि माहिती विज्ञान, डिजिटल लायब्ररी व ई-स्रोत, डेटा बेस व्यवस्थापन प्रणाली, वृत्तपत्र, संकेतस्थळे आणि सोशल मीडिया माहिती विश्लेषण, ग्रंथालय ऑटोमेशन व व्यवस्थापन प्रणाली, माहितीचा कायदेशीर, नैतिक व बौद्धिक अधिकार इ. घटकांचा समावेश झालेला आहे.

आज जगभरातील माहितीची वाढ, डिजिटल माध्यमातील प्रचंड वाढती माहिती आणि उपयोगकर्त्यांची वेगाने बदलणारी गरज यामुळे माहिती व्यावसायिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची झालेली आहे. ग्रंथालयशास्त्र अभ्यासक्रमातून घडवले जाणारे व्यावसायिक, केवळ पारंपरिक ग्रंथपाल न राहता ते आता माहिती व्यवस्थापक, डिजिटल लायब्ररी संचालक, सामाजिक मीडिया विश्लेषक, डेटा सायंटिस्ट/कंटेंट क्यूरेटर, शैक्षणिक आणि संशोधन माहिती अधिकारी यांसारख्या भूमिका निभावत आहेत.

डॉ. एस. आर. रंगनाथन् यांची विचारसरणी आणि तत्त्वे आजच्या डिजिटल युगातही सुसंगत आहेत. त्यांनी वापरकर्तकेंद्रित दृष्टिकोन मांडलेला होता, जो आजच्या 'यूजर एक्सपीरियन्स' संकल्पनेशी अत्यंत सुसंगत आहे. त्यांनी ग्रंथालयाला 'सजीव संस्था' म्हटले आणि आज तीच संकल्पना डिजिटल लायब्ररी, क्लाऊड बेस्ट लायब्ररी, मोबाईल लायब्ररी ॲप्समधून जिवंत झालेली आहे.

आज ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवीधरांसाठी नवी क्षितिजे खुली झालेली आहेत. जसे युनेस्को, जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये माहिती अधिकारी, शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि माहिती तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये डेटाबेस मॅनेजमेंट तज्ज्ञ, सांस्कृतिक वारसा डिजिटायझेशन प्रकल्पांमध्ये महत्त्वाची भूमिका उत्कृष्टपणे निभावीत आहेत.

डॉ. शियाली रामामृत रंगनाथन् यांचा वारसा हा केवळ भारतासाठी नव्हे, तर संपूर्ण जगासाठी एक मौल्यवान ठेव आहे. त्यांनी दिलेले तत्त्वज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी स्पर्श आजच्या डिजिटल युगातही मार्गदर्शक ठरत आहेत. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम हा केवळ अभ्यासक्रम नाही, तर एक उत्तम समाजनिर्माणासाठी आवश्यक असलेला शाश्वत आधार आहे.

डॉ. रंगनाथन् यांच्या विचारांनी प्रेरणा घेऊन आजचा विद्यार्थी माहितीच्या महासागरात शिस्तबद्ध आणि नैतिक मार्गाने चालू शकतो. त्यामुळेच आजच्या युवकांनी या अभ्यासक्रमाकडे केवळ नोकरीच्या संधीसाठी नव्हे, तर ज्ञानसेवा आणि सामाजिक बांधिलकी या दृष्टीनेही पाहावे. कारण 'माहिती हेच आजचे सामर्थ्य आहे आणि माहिती व्यवस्थापक हेच नव्या युगाचे नायक आहेत.'

९३७१४६१२६७

## वाचक पत्रे

### काँग्रेसची वाटचाल अस्ताच्या दिशेने

मतदारयादीत घोळ करून मतदान चोरी केल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केल्यावर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. बिहार राज्यातील मतदार पडताळणी मोहीम, बिहार राज्यात काँग्रेस पक्षाची दशा व राहुल गांधी यांचे व्यक्तिमत्त्व या त्रिमितीवर या आरोपांचा परामर्श घेणे सयुक्तिक ठरते. बिहार राज्यातून रोजगारासाठी अन्य राज्यात स्थलांतरित होणाऱ्यांची संख्या मोठी असून त्याचबरोबर बांगलादेशीय घुसखोरांनी बिहार राज्यात घुसखोरी करून मतदारयादीत नाव समाविष्ट करून बस्तान बसविण्याचा केलेला कट इत्यादी कारणांमुळे मतदारयादी पडताळणी मोहीम राबविण्यात आली. सुमारे ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आल्याने याकडे अनेकांचे लक्ष वेधले गेले. निवडणूक आयोगाने कायद्याच्या चौकटीत राहून मतदारयादी पडताळणी केली असली तरी काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल यांच्यासारखे पक्ष त्यामुळे अस्वस्थ झालेत आणि त्यांनी थेट निवडणूक आयोगालाच लक्ष्य करण्याचे ठरविलेले दिसते.

यावर्षी बिहार राज्य विधानसभा निवडणुका होत असून सर्वच पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. विधानसभेच्या एकूण २४३ जागा असून काँग्रेसने २०२० मध्ये १९, २०१५ मध्ये २७ तर २०१० मध्ये अवघ्या ४ जागा जिंकल्या आहेत. या पृष्ठभूमीवर २०२५ मध्ये काँग्रेस पक्षाची दशा काय होणार याचा तर्क करता येतो. २०१४ पासून काँग्रेस पक्षाला काही अपवाद वगळता सतत पराभवाचा सामना करावा लागला असून राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आरोप करून संशयाचा धुराळा निर्माण करायचा, प्रसिद्धीच्या झोतात यायचे आणि वेळ आलीच तर माफी मागून मोकळे व्हायचे अशी राहुल गांधींची रणनीती असावी. पुराव्याअभावी आरोप केल्याने राफेल प्रकरणात त्यांना माफी मागावी लागली. निवडणुकीत यश प्राप्त करण्यासाठी राहुल गांधी यांनी स्वायत्त संस्थांवर आरोप करण्याचा जो मार्ग किंवा विचार निवडला आहे तो काँग्रेस पक्षाला अस्ताला घेऊन जाणारा आहे.

**हेमंत पुरुषोत्तम कद्रे**

### इंग्लंडमध्ये इतिहासाची पुनरावृत्ती

एक प्रसिद्ध म्हण आहे - 'इतिहासाची पुनरावृत्ती होते' अर्थात याचा अर्थ असा नाही किंवा असे सूचित करत नाही की भविष्यात अशाच घटना किंवा नमुने पुन्हा घडतात. याचा अर्थ असा आहे की घटना किंवा घडामोडी अनेकदा अंदाजे परिणाम देतात, ज्यामुळे भूतकाळातील घटना वर्तमान समजून घेण्यासाठी प्रासंगिक होतात. ही म्हण ४ ऑगस्ट २०२५ रोजी इंग्लंड आणि भारत यांच्यातील क्रिकेट मालिकेच्या पाचव्या आणि शेवटच्या कसोटीच्या पाचव्या दिवशी ओव्हल लंडन येथे घडलेल्या घटनेला अगदी लागू पडते. याच दिवशी मोहम्मद सिराजने ॲटकिन्सनला दिलेल्या सुंदर यॉर्करसह पाचवी कसोटी भारताने जिंकली आणि भारत-इंग्लंड मालिका २-२ अशी बरोबरीत संपली. खरोखरच एक संघर्षपूर्ण आणि मनोरंजक कसोटी मलिका, कसोटी क्रिकेटला त्याच्या सर्वोत्तम पातळीवर पोहोचवले.

हा विजय माझ्यासारख्या क्रिकेटप्रेमींना आठवण देतो १९७१ मध्ये अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली भारताने तिसऱ्या कसोटीत मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाची आणि इंग्लंडमध्ये पहिल्यांदाच मालिका जिंकल्याची. या विजयात भारताला पहिल्या डावाच्या बळावर ७१ धावांची तूट होती, तर आताच्या पाचव्या कसोटीतही भारताला २३ धावांची तफावत होती आणि दुसऱ्या डावातही भागवत चंद्रशेखर यांच्या जादुई कामगिरीमुळे दिग्गज फिरकीपटूंपैकी एक असलेल्या त्रिकुटातील एकाने ३८ धावांत (१८.१-३- ३८-६) सहा बळी घेतले आणि भारताने तिसऱ्या कसोटीत विजय मिळवला. माझ्या बालपणीच्या आठवणींनुसार, २४ जुलै रोजी गणेश चतुर्थीच्या शुभ दिवशी इंग्लंडच्या भूमीवर भारताचा हा पहिलाच कसोटी विजय होता. हा सामना तीन सामन्यांच्या मालिकेचा भाग होता, जो भारताने १-० ने जिंकला. ४ ऑगस्ट २०२५ रोजी भारताने इंग्लंडला पराभूत केल्यानंतर ओव्हलवर इतिहासाची पुनरावृत्ती झाली.

**श्रीकांत वसंतराव हडप**

### अमेरिकेचा वर्चस्ववाद

अमेरिकेची भूमिका नेहमीच वर्चस्ववादाची राहिली आहे. एक तर तुम्ही आमच्याबरोबर आहात, नाहीतर आमचे शत्रू आहात, असा विचार ते करत आलेले आहेत. भारत रशियाकडून तेल विकत घेतो म्हणजे रशियाला युद्धासाठी अर्थसाहाय्य करतो असा जर अर्थ काढला जात असेल तर अमेरिका स्वतः काय करते आहे? पाकिस्तान दहशतवादी कारवाया करत असताना त्याला आयएमएफकडून कर्ज मिळवून देणे, त्याला शस्त्रे विकणे, पाकिस्तानच्या लष्करप्रमुखाला सन्मानाने व्हाईट हाऊसमधे जेवायला बोलावणे, ही सर्व भारताच्या शत्रूला उघडपणे उत्तेजन देणे नाही काय? त्यामुळे अमेरिकेची वर्चस्ववादी भूमिका मोडून काढायची गरज आहे.

**रवींद्र पंडित**

## थोडक्यात महत्वाचे...



### किनगाव इंग्लिश मीडियम पब्लिक स्कूलमध्ये रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**डांभुर्णी (ता. यावल) :** येथून जवळच असलेल्या स्व.केतन मल्टीपर्पज फाउंडेशन व इंग्लिश मीडियम निवासी पब्लिक स्कूल किनगाव यांच्यातर्फे ८ रोजी रक्तदान शिबिर घेण्यात आले. डोणगाव किनगाव रोडवरील इंग्लिश मीडियम निवासी पब्लिक स्कूलमध्ये झालेल्या या रक्तदान शिबिरात २४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. जास्तीत जास्त लोकांनी रक्तदान करावे. आपण केलेल्या रक्तदानाने एखाद्याचा प्राणही वाचू शकतो, असे चेअरमन विजयकुमार पाटील व सचिव मनीष पाटील यांनी सांगितले. सर्वप्रथम उपमुख्याध्यापक सुहास भालेराव यांनी रक्तदान केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. राहुल पाटील, एल.टी.त्रिपाठी, दीपक होनमाने, कपिल पाटील, प्रदीप पाडवी, अक्षय धोंडगे, प्रभाकर पाटील, डॉ.गौरव काटोने यांचे योगदान लाभले. यावेळी इंग्लिश मीडियम निवासी पब्लिक स्कूलचे चेअरमन विजयकुमार देवचंद पाटील, स्व.केतन मल्टीपर्पज फाउंडेशनचे अध्यक्ष मनीष विजयकुमार पाटील, मुख्याध्यापक अशोक प्रतापसिंग पाटील, उपमुख्याध्यापक सुहास भालेराव, हर्षल मोरे, पवन महाजन वीज वितरण कंपनीचे किनगाव येथील अभियंता समीर तडवी, किनगावचे माजी उपसरपंच लुकुमान कलंदर तडवी, डोणगावचे पोलीस पाटील उमेश पाटील, अंजली मेडिकलचे संचालक मनीष पाटील, दीपक पाटील, उमेश पाटील, विजय कोळी, रोहित बावीस्कर बाळासाहेब पाटील, नीलेश महाजन यासह शिक्षक व शिक्षकेतर उपस्थित होते.



### खिरोदा बी. एड. मध्ये विद्यापीठ नामविस्तार, बहिणाबाई चौधरी जयंतीनिमित्त कार्यक्रम

**खिरोदा (ता. रावेर) :** जनता शिक्षण मंडळ संचलित खिरोदा येथील साने गुरुजी विद्या प्रबोधिनी सर्व समावेशक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ११ ऑगस्ट रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ नामविस्तार आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष कुमार चौधरी अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे आंतरविद्या शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एस टी. भूकन होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीताने झाली. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रा. डॉ. एस. टी. भूकन यांनी विद्यापीठ नामविस्ताराचा संपूर्ण घटनाक्रम तसेच आजतागायत विद्यापीठास लाभलेल्या कुलगुरूंनी या विद्यापीठाच्या विकासात दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकला. तसेच कुमार चौधरी यांनी अध्यक्षीय भाषणात म्हटले की, जीवनाचे तत्वधन कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या अमूल्य अशा कवितांमधून होतो, असे प्रतिपादन केले. आभार प्रदर्शन नंदिनी माळी हिने केले. सूत्रसंचालन हिना मोझे हिने केले. कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर उपस्थित होते.



### यावल कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी घेतली 'अवयवदाना'वर शपथ

**यावल :** जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचलित यावल येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात एन.एस. एस.विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांतर्गत अवयवदान या विषयावर शपथ घेण्यात आली. यावेळी ग्रामीण रुग्णालयातील समुपदेशक वसंतकुमार संदानशिव यांनी अवयवदानाविषयी माहिती दिली. उपप्राचार्य प्रा.एम.डी.खैरनार यांनी विद्यार्थ्यांना अवयवदान करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मृत्यूनंतर ते नष्ट करण्यापेक्षा रुग्णालयांना दान करून उपयोगात आणले तर ते पुण्याचे काम होईल. एखाद्या रुग्णाच्या शरीरात आपण मृत्यूनंतरही जिवंत राहू शकतो. त्या रुग्णाला डोळे, यकृत, किडनी हृदय यांसारख्या अवयवाच्या माध्यमातून जीवदान मिळू शकते. म्हणूनच अवयवदान हे जगातील सर्वश्रेष्ठ दान असून त्यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी पुढे यायला पाहिजे, असे सांगितले. यावेळी एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.पी.व्ही.पावरा, डॉ. एच.जी.भंगाळे, कांचन चौधरी, एन.एस.एस.सहाय्यक सी.टी.वसावे व महिला कार्यक्रमाधिकारी प्रा.आर.एस. शिरसाठ उपस्थित होते.




### अंजाळे येथील शाळेतील विद्यार्थ्यांनी वृक्षांप्रती राखी बांधून केली कृतज्ञता व्यक्त

**फैजपूर (ता. यावल) :** अंजाळे येथील नूतन विद्या मंदिर शाळेत राष्ट्रीय हरितसेनेतर्फे पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक बंधुभावाचा अनोखा संगम साधणारा उपक्रम उत्साहात पार पडला. प्रारंभी विद्यार्थिनींनी शाळा परिसरातील वृक्षांना स्वतः तयार केलेल्या राख्या बांधून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. ज्योती परखड, उल्हास पाटील यांनी भारतीय संस्कृतीत पर्यावरणाचे स्थान याविषयी माहिती दिली. मुख्याध्यापिका नीलिमा झोपे, वरिष्ठ शिक्षक डी. व्ही. बोरोलेंसह सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर उपस्थित होते. उपक्रमाचे नियोजन राष्ट्रीय हरितसेना प्रमुख लीलाधर वानखेडे यांनी केले.



### फैजपूरमध्ये रोटरी क्लब स्थापनेसंबंधी सभा

**फैजपूर (ता. यावल) :** फैजपूरला रोटरी क्लब स्थापन करण्यासंबंधी चोपडा रोटरी क्लबचे अध्यक्ष पंकज बोरोले व माजी अध्यक्ष व्ही. एस. पाटील यांची फैजपूर येथील इच्छुक रोटेरियनसोबत विचारविनिमय सभा झाली. यावेळी फैजपूर येथील पांडुरंग सराफ, राकेश जैन, अनंता नेहते, पप्पू चौधरी, प्रफुल कासार, मनीष माहुरकर, संदीप भारंबे, साजन चौधरी, सुरज गाजरे, रामदास बैरागी, सिद्धेश्वर वाघुळदे, राजेश महाजन, नंदकिशोर अग्रवाल, कॅप्टन डॉ. राजेंद्र राजपूत आदी उपस्थित होते.

# रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ग्रामस्थांचे पूर्णा पात्रात जलसमाधी आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**मुक्ताईनगर, ११ ऑगस्ट**

तालुक्यातील मानेगाव फाटा ते बजरंगबली मंदिरापर्यंतच्या रस्त्याच्या दुरवस्थेमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी ११ ऑगस्ट रोजी अचानक पूर्णा नदी पात्रात जलसमाधी आंदोलन केले. मानेगाव ग्रामस्थांच्या या आंदोलनामुळे प्रशासनामध्ये खळबळ उडाली.



या रस्त्याने मानेगाव येथून मुक्ताईनगर येथे शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, नागरिक यांचा येण्या-जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर होत असतो. रस्ता नादुरुस्त असल्याने नागरिकांकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला दुरुस्तीबाबत अर्ज देण्यात आला होता. त्यावेळी रस्त्याची तात्पुरती डागडुजी करण्यात आली होती. पुन्हा रस्ता खराब झाल्यावर जिल्हाधिकारी व संबंधित ठेकेदार यांना व विभागाला स्मरणपत्र देण्यात आले. तरीसुद्धा त्यांनी फक्त आश्वासनच दिले. त्यामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी सोमवारी जलसमाधीचे पाऊल उचलले. घटनेचे वृत्त समजताच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी तसेच पोलीस निरीक्षक आशिष अडसूळ यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांना आठ ते दहा दिवसांत रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले.



## पानवेल मळे रोहयोत समाविष्ट करावे

### बारी पंच मंडळाचे मंत्री संजय सावकारे यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ११ ऑगस्ट**

तालुक्यातील कुऱ्हे (पानाचे) येथील पानवेली/नागवेल मळे रोजगार हमी योजनेत समाविष्ट करण्यात यावे, अशी मागणी बारी पंच मंडळ समाजातर्फे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पानवेल आपल्या जिल्ह्यासह भारतात अत्यंत कमी क्षेत्रावर लागवड होणारे पीक आहे. जळगाव जिल्ह्यात या पिकाचे सुमारे ८० ते १०० हेक्टर क्षेत्र आहे. या अगोदर जळगाव जिल्ह्यात ३०० ते ४०० हेक्टरपर्यंत लागवड केली जात होती. मात्र येणाऱ्या नैसर्गिक संकटामुळे कुशल मजुरांमुळे रोग व किडींचा भडीमारामुळे व येणाऱ्या जास्तीत उत्पादन खर्चामुळे हे पीक परवडत नसल्यामुळे पानवेल, नागवेल या पिकाचे जिल्ह्यातील क्षेत्र कमी होत आहे व वारंवार येणाऱ्या रोगराईमुळे हे पीक नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

त्याचप्रमाणे कृषी विभागाची एकही योजना पानवेल/नागवेल पिकासाठी नाही. किमान महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत या पिकाचा समावेश केल्यास शेतकऱ्यांना उत्पादन घेण्यासाठी आर्थिक मदत मिळेल. जिल्ह्यातील नामशेष होत चाललेल्या या पिकाच्या क्षेत्रात वाढ होऊ शकते. पानवेल पिकासाठी पीक विम्याची वेगळी तरतूद करावी, अशा आशयाचे निवेदन देण्यात आले.

निवेदन देताना पानवेल कृषी विकास मंडळ अध्यक्ष प्रमोद उंबरकर, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य किशोर वराडे, राजेंद्र वराडे, संतोष रंदाळे, गोकुळ वराडे, विलास रंदाडे व पानवेल शेतकरी उपस्थित होते.

## गो. से. हायस्कूलमध्ये चित्रकला अन् रांगोळी स्पर्धा

**पाचोरा :** पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित गो. से. हायस्कूलमध्ये 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत चित्रकला व रांगोळी स्पर्धा तसेच देशभक्ती, स्वातंत्र्य दिन इ. विषयांवर स्पर्धा घेण्यात आली.

चित्रकला स्पर्धा प्रथम क्रमांक- सनी अहिर, द्वितीय यज्ञेश पाटील, तृतीया-किरण बडगुजर, रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक धनश्री विजय पाटील व ग्रुप नववी 'क', द्वितीय- धनश्री रवींद्र पाटील- रेणुका चौधरी व ग्रुप असा निकाल घोषित करण्यात आला. मुख्याध्यापक एन. आर. पाटील यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले. कलाशिक्षक सुनील भिवसने, सुबोध कांतायन, प्रमोद पाटील, ज्योती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. उपमुख्याध्यापक आर. एल. पाटील, पर्यवेक्षिका अंजली गोहिल, पर्यवेक्षक रहीम तडवी, राजेश बांठिया, क्रीडा शिक्षक संजय करंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुबोध कांतायन यांनी तर आभार प्रमोद पाटील यांनी मानले.



## ओरिजनल पत्रकार संघ नूतन कार्यकारिणी जाहीर

**सावदा (ता. रावेर) :** येथील शासकीय विश्रामगृहात ओरिजनल पत्रकार संघाच्या नवीन कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी महत्त्वपूर्ण चर्चा झाली. या बैठकीत पत्रकारांच्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा करून संघटनेला अधिक बळकट करण्याचा निर्धार करण्यात आला. विशेष म्हणजे, समाजहितासाठी आणि गरजूंसाठी ठोस पावले उचलण्याचा निर्णयही घेण्यात आला. नवीन कार्यकारिणी अशी- अध्यक्ष भानुदास भारंबे, उपाध्यक्ष दिलीप चांदेलकर, कार्याध्यक्ष युसुफ शहा, सचिव फरीद शेख, खजिनदार कैलास लवंगडे, प्रसिद्धीप्रमुख अजहर खान, सहसचिव मिलिंद कोरे, सदस्य दीपक श्रावगे, सदस्य मुख्तार शेख, लाला कोष्टी व प्रशांत सरोदे. बैठकीत पत्रकारांच्या हितासाठी आणि सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी अनेक मुद्द्यांवर विचारमंथन झाले.

# मध्य रेल्वे अन् एसबीआयकडून दिवंगत रेल्वे कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला १ कोटींची मदत

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ११ ऑगस्ट**

कर्मचारी कल्याणासाठीची अविचल बांधिलकी आणि संस्थात्मक सहकार्याची ताकद यांचे प्रदर्शन करत, मध्य रेल्वे व स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) यांनी गुरुवारी भुसावळ विभागातील मुख्य आरक्षण निरीक्षक (सीबीएस) स्व. मुकेश सनंसे यांच्या कुटुंबाला १ कोटी रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. त्यांच्या अचानक निधनाच्या वेळी ते नाशिक येथे कार्यरत होते.



ही आर्थिक मदत एसबीआयच्या रेल्वे सॅलरी पॅकेज डायमंड व्हेरिएंट अंतर्गत वैयक्तिक अपघात विमा (पीएआय) योजनेखाली देण्यात आली. रेल्वे कर्मचाऱ्यांसाठीच्या या विशेष योजनेत खातेधारक असल्याने सनंसे यांना वाढीव विमा संरक्षणाचा लाभ मिळाला होता, ज्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीतही कुटुंबाची आर्थिक सुरक्षितता सुनिश्चित झाली.

या दुर्दैवी घटनेनंतर एसबीआयने मध्य रेल्वेशी समन्वय साधून हा दावा प्राधान्याने निकाली काढला, ज्यामुळे कुटुंबाला ही रक्कम विलंब न होता प्राप्त झाली.

हा धनादेश विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुनीत अग्रवाल यांच्या हस्ते संगीता पटेल, सहाय्यक महाव्यवस्थापक, एसबीआय प्रशासकीय कार्यालय, नाशिक, वरिष्ठ रेल्वे अधिकारी, एसबीआय रेल्वे कॉलनी भुसावळ शाखा व्यवस्थापक, अन्य एसबीआय प्रतिनिधी आणि दिवंगतांच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत सुपूर्द करण्यात आला.

'ही मदत मध्य रेल्वे आणि एसबीआय महाराष्ट्र मंडळ यांच्यातील रेल्वे सॅलरी पॅकेज कराराचा थेट परिणाम आहे,' असे एका रेल्वे अधिकाऱ्याने सांगितले. त्यांनी असेही नमूद केले की, अशा उपक्रमांमुळे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठीचे सुरक्षिततेचे जाळे अधिक मजबूत होते.

कार्यक्रमात मध्य रेल्वे व एसबीआयच्या अधिकाऱ्यांनी कठीणप्रसंगी कर्मचाऱ्यांच्या आणि त्यांच्या परिवाराच्या पाठीशी उभे राहण्याच्या आपल्या सामायिक निर्धाराची पुनरुज्जीविती केली. तसेच वास्तव तत्काळ मदत पोहोचविणाऱ्या कल्याणकारी उपाययोजना पुढेही बळकट करण्याची ग्वाही दिली.

## फैजपूरला कावड यात्रेत भक्तांचा जनसागर

### आ.अमोल जावळे यांची विशेष उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर (ता. यावल), ११ ऑगस्ट**

फैजपूर येथे श्रावण मासानिमित्त शिवभक्त कावड यात्रा श्री क्षेत्र तारकेश्वर धाम मंदिर तापी काठावरील श्री तारकेश्वर महादेव मंदिरापासून १० ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता तापी नदीची ओटी भरून व पूजन करून भुसावळ येथून निघाली. यावेळी आमदार अमोल जावळे यांची विशेष उपस्थिती होती.

यात हजारो भक्तांनी हाती कावड घेऊन फैजपूरकडे प्रयाण केले. कावड यात्रेच्या अग्रभागी असलेल्या महाकाय नंदी महादेव पिंड मूर्ती, शिव पालखी तर शिव रुपातील घोडेस्वार, बग्गीमधील शिव पार्वतीचे सजीव पात्र देखावे व महाकाय त्र्यंबकेश्वर शिव मूर्तीच्या विलोभनीय सजीव देखाव्याने भाविकांचे लक्ष वेधले होते. महामंडलेश्वर पवनकुमारदासजी महाराजांसह पुजारी राममनोहरदासजी महाराज, शास्त्री अनंतप्रकाशदासजी, कन्हैयादासजी महाराज, हभप भरत महाराज, हभप प्रवीण महाराज, हभप मिथिलेश महाराजांसह हजारो अबालवृद्ध, महिला, तरुणाई भक्तांनी सहभाग घेतला.

**१५१ किलोची कावड भाविकांनी खांद्यावर घेतली होती**

कावड यात्रेत अनेक मान्यवरानी भेटी देऊन आशीवार्द घेतले. तापी नदी ते फैजपूर यात्रा मार्गावर मोठ्या सुंदर रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. गावागावात रस्त्याचे दुतर्फा भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी उसळली होती. यात्रेतील शिवभक्तांना चहा पाणी, फराळ वितरण सेवा दिली. ११ ऑगस्टला सकाळी महामंडलेश्वर पवनकुमारदासजी महाराज, पुजारी राममनोहरदासजी महाराज यांच्या उपस्थितीत पुरोहित गुणवंत जोशी यांनी वेदमंत्रांचे जयघोषात फैजपूर खंडोबा देवस्थान खंडेश्वर मंदिरात कावड यात्रातील तापी जलाने भगवान खंडोबा व खंडेश्वर महादेव वर जलाभिषेक महापूज करण्यात आला.

## धरणगावात १० लाखांचा गांजा जप्त

### स्वीफ्ट गाडी सोडून चालक फरार

**तभा वृत्तसेवा**
**धरणगाव, ११ ऑगस्ट**

रात्री बारा वाजेच्या सुमारास १० लाखाचा गांजा जप्त करण्यात आला आहे. शहरातील धरणगाव-अमळनेर नाक्यावर पोलिसांनी नाकाबंदी केलेली होती. त्या ठिकाणी हवालदार सुनील चौधरी, सत्यवान पवार, पोलीस कॉन्स्टेबल किशोर भाई व होमगार्ड निखिल चौधरी हे कर्तव्यावर होते.

चोपड्याकडून येणारी स्वीफ्ट क्रमांक एमएच ०१ डीपी ०२५२ या गाडीला थांबण्याचा इशारा केला. परंतु गाडी न थांबता भरघाव वेगाने शहराकडे आली. सुधीर चौधरी यांनी मोटारसायकलने तिचा पाठलाग सुरू केला, परंतु अचानक ती गाडी पारोळा रस्त्याकडे निघाली. दरम्यान, काही अंतरावर गाडी डोळ्यासमोरून दिसेनाशी झाली. मात्र पाठलाग सुरू ठेवल्यानंतर सुधीर चौधरी यांनी पुढे जात शोध घेतला असता ती गाडी रस्त्याच्या कडेला बाभळीच्या झाडाखाली लावलेली आढळली. गाडीची तपासणी केली असता त्यातील इसम पळून गेलेला होता. गाडीची डिक्की उघडून पाहिली असता त्यात मोठ्या प्रमाणावर गांजा आढळून आला. घटनास्थळी पंचनामा करून गाडी व गाडीच्या डिक्कीतील गांजा पोलीस स्टेशनला आणला. हा गांजा मोजणी केल्यानंतर ४० किलो ४० ग्रॅम एवढा वजनाचा भरला. त्याची बाजारभावानुसार किंमत १० लाख सहा हजार ६०० रुपये एवढी आहे. तसेच जप्त केलेल्या स्वीफ्ट गाडीची किंमतही १० लाख रुपये आहे. असा एकूण सुमारे २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## थोडक्यात महत्वाचे...



### फ़ैजपुरातून लाडक्या बहिणींकडून राखी रवाना

**फैजपूर (ता. यावल) :** फैजपूर भाजप मंडळतर्फे लाडका देवाभाऊ (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) यांना राखी पौर्णिमेनिमित्त शहरातील बूथ क्र.२४२ मधील लाडक्या बहिणींनी राख्या रवाना केल्या. बूथप्रमुख संजय सराफ, तनुजा सराफ, नेहा सराफ, लता हिरे, मृणालिनी राणे, मनीषा राणे, सुरेखा टोके, भागश्री भंगाळे, रजनी महाजन, वंदना गुजराथी, विजया चौधरी, प्राजक्ता धांडे, वंदना महाजन, संगीता पाटील, छाया गलवाडे, वृषाली गलवाडे, चंदा चौधरी, सुनंदा कोल्हे, आशा अभंग, रोहिणी कोळी, कांचन कोळी, लता कोळी, कोल्हे, जयशरी ढाके यासह अनेक लाडक्या बहिणी उपस्थित होत्या.

### सब ज्युनिअर ज्युदो स्पर्धेसाठी आज निवड चाचणी

**रावेर :** महाराष्ट्र ज्युदो संघटनातर्फे ५२ वी महाराष्ट्र राज्य सब ज्युनिअर राज्यस्तरीय ज्युदो स्पर्धा लातूर येथे २२ ते २४ ऑगस्ट दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी जळगाव जिल्ह्याचा संघ निवडण्यात येणार आहे. यासाठी जळगाव जिल्हा हौशी ज्युदो असोसिएशनतर्फे १२ ऑगस्ट रोजी नूतन मराठा कॉलेजमध्ये सकाळी ९ वाजता जिल्हा संघाची निवड चाचणी ठेवण्यात आलेली आहे. या स्पर्धेसाठी ज्या खेळाडूंचे वय वर्षे १२ पूर्ण असतील व १५ वर्षाखालील अशा सर्व खेळाडूंनी या निवड चाचणीमध्ये सहभागी व्हावे. अधिक माहितीसाठी संपर्क संघटनेचे सचिव उमेश पाटील, अजय काशीद, सचिन वाघ, दिगंबर महाजन यांच्याशी करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अंतुर्ली फाटा येथे बेळी येथील कावड यात्रेचे स्वागत

**मुक्ताईनगर :** तालुक्यातील अंतुर्ली फाट्यावरील तराळ हॉलमध्ये बेळी येथील भरत महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली कावड यात्रा आली असता यात्रेचे स्वागत करण्यात आले. यात्रेचे स्वागत राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी केले. यावेळी भुसावळचे भाजप तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील, बाजार समितीचे सभापती वारके, पं.स.चे माजी सभापती गोलू पाटील, माफदाचे तालुकाध्यक्ष जितू चोपडे, शिवाजी पाटील आदी उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत बोदवड बाजार समितीचे सभापती सुधीर तराळ, शिवसेना उपजिल्हाप्रमुख छोटू भोई, पं.स.सभापती किशोर चौधरी, माजी सरपंच विलास पांडे, लोहारखेडा वि.का. सोसायटीचे चेअरमन मनोज पाटील, अनिल दुट्टे, बबलू कापसे, अमित देशमुख, राहुल पाटील, युवा सेनेचे पदाधिकारी सुधीर कुलकर्णी, संतोष साळुंखे, पवन पाटील, ग्रा. पं. सदस्य संपा महाजन, अर्जुन वैदकर, पंकज पिंगळे, विलास काळे या मान्यवरांनी केले. सोबत स्वीय सहाय्यक प्रवीण जावरे होते. यावेळी विनोद तराळ यांनी आभार, तर अंतुर्लीचे माजी सरपंच कैलास दुट्टे यांनी सूत्रसंचालन केले.




### पौगंडावस्थेतील मुलींच्या समस्यांविषयी मार्गदर्शन अन् विशेष समुपदेशन सत्र

**फैजपूर (ता. यावल) :** लेवा भ्रातृमंडळ, पिंपळे सौदागर, पुणे यांच्यातर्फे भारत विद्यालय, कनिष्ट महाविद्यालय न्हावी येथे शालेय विद्यार्थिनींना (कळ्यांना) त्यांच्या पौगंडावस्थेत नुकतेच पदार्पण केलेल्या त्यांच्या उमलत्या वयामध्ये शारीरिक आकर्षण व आजूबाजूचे वातावरण भुलवत असते, त्यामुळे नकळतच त्यांचे पाऊल चुकीच्या वाटेवर पडू शकते आणि नंतर त्यांच्यावर पश्चाताप करण्याची वेळ येते. आपल्या स्वप्नांना गवसणी घालण्याचा हा काळ आनंदाने जगण्याचा प्रभावी मार्ग म्हणजे योग्य मार्गदर्शन आणि दिशादर्शन होय. असेच मार्गदर्शन महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघाचे सारिका शैलेश पाटील (पुणे) आणि विभावरी नीलेश इंगळे (पुणे) यांनी नुकत्याच झालेल्या विशेष महत्त्व समुपदेशन सत्रामध्ये सखोल व मुलींच्या मनाला हात घालत केले, परिणामी प्रश्नोत्तराच्या तासात मुलींनी स्पष्टपणे म्हटले की, मार्गदर्शकांनी आमच्या मनातील प्रश्न, जे आम्ही स्वतःच्या आई वडिलांना विचारू शकत नाहीत ते स्पष्ट केले. तसेच उपस्थित आई पालकांनीसुद्धा समाधान व्यक्त करत आम्हाला या कार्यक्रमातून मिळालेल्या मार्गदर्शनामुळे आमच्या मुलींबाबत आम्ही निश्चिंत झालो असून येथून पुढे आम्ही आमच्या मुलींचे प्रश्न उत्तम प्रकारे हाताळू शकतो, असा विश्वास त्यांनी दर्शविला. लवकरच हा उपक्रम जळगाव शहर व ग्रामीण भाग, मलकापूर परिसर आणि छत्रपती संभाजी नगर येथे घेण्यात येणार आहे, असे भातृ मंडळ पुणेचे पुरुषोत्तम पिंपळे यांनी कळविले आहे.



### सर्चलाईट स्कूलमध्ये आदिवासी दिनी विविध कार्यक्रम

**सावदा (ता. रावेर) :** सर्चलाईट इंग्लिश मीडियम स्कूल वढोदे प्र. सावदा येथे आदिवासी शहीद बिरसा मुंडा यांना अभिवादन करण्यात आले. सम्राट फाउंडेशनचे अध्यक्ष अनोमदर्शी तायडे, शाळेच्या चेअरमन अश्विनी तायडे, मुख्याध्यापक नितीन झाल्टे, पर्यवेक्षक पंकज बोदडे यासह सर्व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत आदिवासी शहीद बिरसा मुंडा यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेतील फलकावर अग्रभागी 'पारंपरिक ज्ञानाचे जतन आणि प्रसार करण्यात आदिवासी महिलांची भूमिका' या थीम सह बैलगाडी व त्यावरील नांगर, इरली, घोंगडे यांचे चित्र सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. यशस्वीतेसाठी विजय भालेराव, पंकज भालेराव, तेजस्विनी तायडे, रंजना बोदडे, शीतल भालेराव, कविता बैसाने, कुंदन तायडे, विशाल बोदडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन पंकज भालेराव यांनी केले.



### खडसे महाविद्यालयात समुपदेशन

**मुक्ताईनगर :** येथील खडसे महाविद्यालयातील मानसशास्त्र विभाग व समुपदेशन केंद्रामार्फत महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत बचत गट व उन्नती लोकसंचालिका साधन केंद्रात १० बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या. या कार्यक्रमांमध्ये प्रमुख वक्ते म्हणून समुपदेशक प्रा.डॉ. छाया ठिंगळे होत्या. त्यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये आजच्या आधुनिक जगात धावपळीच्या युगात, जाहिरातीच्या, मॉडेलिंगच्या दुनियेत, जीवन जगत असताना आपले शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले असणे गरजेचे आहे. मानसिक आरोग्य काळाची गरज आहे. महिलांनी आपल्या कामाबरोबरच आपले शारीरिक, मानसिक आरोग्य चांगले ठेवावे. आपल्या जीवनामध्ये अनेक सुख, दुःख, आनंद, येत राहतात. परंतु कधीकधी दुःख हे पचवायला असाहाय्य होते आणि त्यातून नैराश्य निर्माण होते. यासाठी सर्वांनी मानसिक आरोग्य काय आहे हे समजून घेणे गरजेचे आहे. कुटुंबामध्ये राहत असताना समायोजन साधणे महत्त्वाचे आहे, असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सहाय्यक बचत गट समन्वयक माया तायडे, मंगला चौधरी, रत्ना माळी यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. आभार वैशाली कोळी यांनी मानले.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### डॉ. काणे गर्ल्स हायस्कूलमध्ये चित्रकला स्पर्धा

**नंदुरबार** : शहरातील डॉ. काणे गर्ल्स हायस्कूलमध्ये 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत सातवी व आठवीच्या गटासाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत ४५ बालचित्रकारांनी सहभाग नोंदवला. यात खुशी ठाकरे प्रथम, रिद्धी बेडसे द्वितीय, पायल सूर्यवंशी तृतीय, वृषाली गावित चतुर्थ, विद्या कोकणी पाचवी आली. स्पर्धेचे परीक्षण चंद्रशेखर चौधरी यांनी केले. मुख्याध्यापिका सीमा मोडक यांच्या मार्गदर्शनात स्पर्धा घेण्यात आली. या वेळी पर्यवेक्षक मिलिंद चव्हाण, ज्येष्ठ शिक्षक संजय चौरे यांनी बालचित्रकारांचा गौरव केला.



### वनवासी विद्यालयात संस्कृत दिनानिमित्त कार्यक्रम

**नंदुरबार** : चिंचपाडा (नवापूर) येथील पश्चिम खान्देश भिल्ल सेवा मंडळ संचलित वनवासी विद्यालय व एस. सी. चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयात जागतिक संस्कृत दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य प्रमोद चिंचोले अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमात शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी संस्कृतमधून मनोगते व्यक्त केली. शिक्षक प्रमोद चिंचोले यांनी संस्कृतभाषा हीच भारतीय संस्कृतीचे मूळ असून, या भाषेचे संरक्षण आणि संवर्धन करणे ही प्रत्येकाची राष्ट्रीय जबाबदारी आहे, असे सांगितले. प्रेमळ पाडवी यांनी संस्कृतमधून मनोगत व्यक्त केले. धनंजय कुलकर्णी यांनी संस्कृत स्तोत्र गात विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला. संस्कृत शिक्षक संदीप महाले यांनी संस्कृतमधून सूत्रसंचालन केले. ध्रुवी कारले यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.



### के. डी. गावित विद्यालयातर्फे विद्यार्थ्यांची प्रभातफेरी

**नंदुरबार** : नागसर येथील के. डी. गावित माध्यमिक विद्यालयात आदिवासी गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी गावातून प्रभात फेरी काढून आदिवासी गौरव दिनाच्या व क्रांती दिनाच्या घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. विद्यार्थी पारंपरिक आदिवासी वेशभूषेत आले होते, त्यांनी आदिवासी नृत्य करून कार्यक्रमाची रंगत वाढवली व मान्यवरांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते बिरसा बिरसा मुंडा व तंट्या भिल यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. मुख्याध्यापक राजेंद्र चौधरी यांनी आदिवासी संस्कृतीबद्दल मार्गदर्शन केले. प्रमुख वक्ते सरपंच अशोक गावित यांनी आदिवासी बोलीभाषेत विचार मांडत, आदिवासी समाज हा निसर्गपूजक असून, त्यांची परंपरा व चालिरीतीच्या माध्यमातून होणारे पर्यावरण रक्षण जगातील विविध संकटांपासून रक्षण करू शकतो, तसेच ज्या प्रकारे स्वातंत्र्यसंग्रामात जननायक बिरसा मुंडा, तंट्या मामा भिल सहभागी होते, तसेच झलकारीबाई, हेमा कोम, राणी चिंतामणी यांसारख्या आदिवासी स्त्रियांचाही मोठा सहभाग होता, असे प्रतिपादन केले. अक्षय पाटील यांनी सूत्रसंचालन केले. शंकर वळवी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



### काणे विद्यामंदिरात आदिवासी पारंपरिक शस्त्रपूजन

**नंदुरबार** : आदिवासी समाज हा भारताच्या इतिहासातील ठेवा व वारसा टिकविण्याची संस्कृती असून, नंदुरबार हा आदिवासीबहुल जिल्हा आहे. आदिवासी समाजाचा सांस्कृतिक वारसा, भाषा, कला आणि परंपरा समाजाची हक्काचे संरक्षणाबरोबर नृत्य, ढोल, शिबलीवर ठुमके घेत आपला आदिवासी वसा, वारसा जपण्याचे काम समाजबांधव करीत असतात, असे प्रतिपादन मुख्याध्यापिका सुलभा माहिरे यांनी केले. सर्व प्रथम विद्यार्थी व शिक्षकांनी प्रतिमापूजन केले व विद्यार्थ्यांच्या हस्ते आदिवासी समाजाचे शस्त्रपूजन करण्यात आले. त्यात प्रामुख्याने धनुष्यबाण पूजन करण्यात आले. या वेळी शिक्षक-विद्यार्थ्यांनी गीतगायन केले. ऋषिकेश पाटील यांनी आदिवासी समाजाची माहिती दिली. शुभांगी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. अनिता पाठक यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी घ. रा. बेडसे, पुष्पलता चौरे, अमित वसावे, प्रवीण परदेशी, रेखा सूर्यवंशी, अनिता पाठक, नरेंद्र ब्रह्मे, शुभांगी पाटील, ऋषी पाटील, प्रकल्प भामरे यांनी सहकार्य केले.



### के. डी. गावित शैक्षणिक संकुलात रक्षाबंधन उत्साहात

**नंदुरबार** : बंधुत्व, प्रेम, आपुलकी आणि निसर्गसंवर्धनाचा संदेश देणारा रक्षाबंधन सोहळा कोरीट यथील के. डी. गावित शैक्षणिक संकुलात उत्साहात पार पडला. यानिमित्त घरगुती राखी शाळेत बनवण्याची कार्यशाळा तसेच पर्यावरणपूरक रक्षाबंधनाचा उपक्रम राबविण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मुकेश पाटील अध्यक्षस्थानी होते. त्यांनी रक्षाबंधनाचा इतिहास, सांस्कृतिक महत्त्व आणि भावनिक बंध याविषयी मार्गदर्शन केले. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शशिकांत पाटील यांनी विद्यार्थ्यांना बांधिलकी, निसर्गप्रेम आणि संस्कार यांचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी घरातील उपलब्ध वस्तूंचा वापर करून आकर्षक व पर्यावरणपूरक राख्या तयार केल्या. विशेष म्हणजे, बंधुत्वाचा सन्मान केवळ मानवी नात्यांपुरता मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी वृक्षांनाही राखी बांधून त्यांचे संवर्धन करण्याची शपथ घेतली. कार्यक्रमात राकेश पाटील, व्ही. एस. पाटील, सुनीता निकम, सुरेश पटेल, विश्वासराव शिरसाठ, रवींद्र सोनवणे, चारुशीला निकम, शंकर ओगले, मीनाक्षी पाटील, प्रा. भरत चव्हाण, प्रा. सुनील खाडे, प्रा. स्वाती बारी, प्रा. प्रशांत बोरसे, सुनंदा पाटील, सविता पाटील, ज्योस्ना देवरे, किशोर भिलावे, प्रा. नयना पवार यांनी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. रवींद्र सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. भरत चव्हाण यांनी आभार मानले.

# भाजपचे युवानेते विक्रांत मोरे यांनी घेतले चार कुपोषित मुलांना दत्तक!

## सोलखेडीपाडा येथील अंगणवाडी केंद्रात आगळ्यावेगळ्या पद्धतीने आदिवासी गौरव दिन

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, ११ ऑगस्ट**

भाजपचे युवानेते तथा जिजामाता एज्युकेशन सोसायटीचे संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विक्रांत दिलीपराव मोरे यांनी धडगाव तालुक्यातील कात्री येथील चार कुपोषित मुलांना आदिवासी गौरव दिनाचे औचित्य साधून दत्तक घेतले.



धडगाव तालुक्यातील कात्री येथील सोलखेडीपाडा अंगणवाडी केंद्रात डॉ. विक्रांत मोरे मित्रपरिवारातर्फे ९ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय आदिवासी गौरव दिनाचे औचित्य साधून सोलखेडीपाडा अंगणवाडी केंद्रातील कुपोषणग्रस्त चार बालके दत्तक घेऊन त्यांना कुपोषणमुक्त करण्याचा निर्धार करण्यात आला. या चार मुलांच्या कुपोषणमुक्तीसाठी सहा महिन्यांचा पौष्टिक आहार व त्यासाठी लागणाऱ्या इतर साहित्याचा पुरवठा या वेळी करण्यात आला.

सोलखेडीपाडा अंगणवाडी केंद्रात जिजामाता शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. विक्रांत मोरे यांच्या हस्ते माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी नगरसेवक प्रवीण गुरव, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवक जिल्हाध्यक्ष सुभाष पानपाटील, ॲड. प्रवीण वाघ, आदिवासी क्रांती दलाचे प्रकाश गावित, अंकुश नाईक, प्रफुल्ल पाटील, पोलिसपाटील फत्तेसिंग वळवी, ठोग्या वळवी, कालसिंग वळवी, भीमसिंग वळवी, संदीप वळवी, अंगणवाडी सेविका बिंदिया वळवी, आशा सेविका भारती वळवी, राजीबाई वळवी, रमेश वळवी, धीरसिंग वळवी, भिका वळवी आदी उपस्थित होते. येथेच अंगणवाडी सेविका आशा सेविका, पालक तथा ग्रामस्थांच्या उपस्थितीत पोषण आहार किट डॉ. विक्रांत मोरे यांच्या हस्ते वाटप करण्यात आल्या. अंगणवाडी सेविका बिंदिया वळवी यांनी आभार मानले.

**ही आहेत दत्तक घेतलेली बालके**

मच्छिंद्र कृष्णा वळवी (वय २ वर्ष ८ महिने, रा. सोलखेडीपाडा), कृतिका कृष्णा वळवी(वय ४ वर्षे ६ महिने, रा. सोलखेडीपाडा), शुभम चमाऱ्या वळवी (वय ४ वर्षे, रा. सोलखेडीपाडा), आर्यन अमरसिंग वळवी (वय २ वर्षे, रा. सोलखेडीपाडा).

> कुपोषित मुलांना दत्तक घेत आगळ्यावेगळ्या पद्धतीने आदिवासी गौरव दिन साजरा केल्याचे समाधान आहे. आपण समाजाचे देणे लागतो. आपल्या परीने जेवढी शक्य होईल तेवढी मदत करण्यात येईल.
> **- डॉ. विक्रांत मोरे**



### पावला येथे शोभायात्रेत तीर कामठेधारी चिमुकले आकर्षण

**नंदुरबार** : तालुक्यातील पावला येथील के. डी. गावित अनुदानित आश्रमशाळेत आदिवासी गौरव दिन विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून साजरा करण्यात आला. शोभायात्रेत तीर कामठेधारी चिमुकले आकर्षण ठरले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी पारंपरिक आदिवासी पोशाख परिधान करून आदिम संस्कृतीचे दर्शन घडवले. ढोलच्या तालावर गावातून शोभायात्रा करण्यात आली. तीर कामठेधारी लहान चिमुकले कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. आदिवासी गाण्यांवर नृत्याविष्कार सादर करून थाटामाटात सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. प्राथमिकचे सहाय्यक मुख्याध्यापक अशोक वळवी अध्यक्षस्थानी होते. बीआरसीच्या प्रतिभा पाटील प्रमुख पाहुण्या होत्या. आदिवासी पारंपरिक पोशाख परिधान करून विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. आदिवासी संस्कृती व आभूषणे, बोलीभाषांबद्दल अशोक वळवी यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आदिवासी समाजातील क्रांतिकारकांचा परिचय करून दिला. नीलेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. आश्विन महिरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

### आदिवासी संस्कृती परंपरेला काणे हायस्कूलमध्ये उजाळा

**नंदुरबार** : डॉ. काणे गर्ल्स हायस्कूलमध्ये आदिवासी गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात आदिवासी संस्कृती परंपरेला उजाळा देण्यात आला.

ज्येष्ठ शिक्षक संजय चौरे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी पर्यवेक्षक मिलिंद चव्हाण, रेखा गोसावी यांनी आदिवासी कुलदैवत याहा मोगी माता, क्रांतिवीर तंट्या भिल, बिरसा मुंडा, बालशहीद शिरीषकुमार मेहता यांच्या प्रतिमांचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. जान्हवी महेंद्र पवार हिने आदिवासी निसर्गपूजा या विषयावर व प्राची संदीप गावित हिने तंट्या भिल यांच्या जीवनावर वक्तृत्व सादर केले. संजय चौरे यांनी आदिवासी समाजाची संस्कृती, परंपरा आणि इतिहासाबद्दल माहिती दिली. वक्तृत्व सादर करणाऱ्या विद्यार्थिनींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. आदिवासी वेशभूषेत आलेल्या विद्यार्थिनींनी आदिवासी नृत्य सादर केले. कार्यक्रमास मुख्याध्यापिका सीमा मोडक यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाला जितेंद्र पगारे, भगतसिंग पाडवी, किसन पावरा, चंद्रशेखर चौधरी, हेमंत बोरसे, पूजा सोनार, सुधाकर पाटील व शिक्षकेतर बंधू-भगिनी आदी उपस्थित होते. सीमा गावित यांनी सूत्रसंचालन केले. स्वाती कुलकर्णी यांनी आभार मानले.





### सेंट मदर टेरेसा शाळेत जागतिक आदिवासी दिन साजरा

**नंदुरबार** : शहरातील जिजामाता एज्युकेशन सोसायटी संचलित सेंट मदर टेरेसा स्कूलमध्ये जागतिक आदिवासी गौरव दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. क्रांतिकारकांनी आदिवासी समाजासाठी केलेल्या कार्याचे वर्णन करताना संस्कृती, पर्यावरण, परंपरा यांचे संवर्धन व संरक्षण करण्याचे मुख्याध्यापिका शिल्पा वाणी यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

जागतिक आदिवासी दिवस साजरा करण्यामागील उद्देश व त्याचे महत्त्व, आदिवासी समाजाच्या समस्या, शैक्षणिक मागासलेपणा, अंधश्रद्धा या विषयांची मांडणी निवेदिका पूनम जाधव यांनी सूत्रसंचालनातून केली. रक्षाबंधनाचे औचित्य साधून ग्रिटिंग कार्ड व निबंध स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी आदिवासी संस्कृतीचा पारंपरिक पोशाख परिधान करीत उपस्थितांचे लक्ष वेधले. बालगोपाळांनी राख्या बांधून बहीण-भावांच्याप्रति प्रेम व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा शोभाताई मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमात संस्थेचे सचिव अभिजित मोरे यांनी आदिवासी पारंपरिक पोशाख परिधान केलेल्या विद्यार्थ्यांना आपली संस्कृती जपण्याचे आवाहन केले व स्पर्धेतील सर्व विद्यार्थ्यांचा गौरव केला. कार्यक्रमाला शिक्षिका मीना शिरसाठ यांचे मार्गदर्शन लाभले.

### नवोदय विद्यालयात आदिवासी गौरव दिन, रक्षाबंधन

**अक्कलकुवा** : येथील जवाहर नवोदय विद्यालयात रक्षाबंधन व आदिवासी गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम आदिवासी गौरव दिनानिमित्त आदिवासी क्रांतिकारकांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.



प्राचार्य जी. एम. मस्के अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ शिक्षक विलास पाटील, संजय पाचोरे, सुनील लोहार आदी उपस्थित होते. प्राचार्य मस्के यांनी आदिवासी गौरव दिनाचे महत्त्व विशद करीत आदिवासी समाजाचा इतिहास, वैभवशाली परंपरा, संस्कृती आणि गौरवशाली वारसा याबद्दल माहिती देत विद्यार्थ्यांनी जबाबदाऱ्या आणि हक्क याप्रति सजग राहावे, असे सांगितले.

यावेळी संजय पाचोरे, धैर्यशील जगदाळे, आशिष शर्मा यांनी मार्गदर्शन केले. वेदांत, सर्वज्ञ, प्रेमकुमार या विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण भाषणे दिली. विद्यार्थ्यांनी आदिवासी बोलीभाषेतील पारंपरिक गीतांवर पोशाख परिधान करून नृत्य सादर करून वातावरणात चैतन्य निर्माण केले. रक्षाबंधनही उत्साहात साजरे करण्यात आले. विद्यालयात शिकत असलेल्या सख्ख्या भावंडांना मंचावर बोलावून बहिणींनी भाऊरायाला चैतन्यपूर्ण वातावरणात राखी बांधली. सोबतच विद्यार्थिनींनी आपापल्या वर्गातील व कनिष्ठ तसेच वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांना राखी बांधून कौटुंबिक वातावरण तयार केले.

अकरावीचे विद्यार्थी जयेंद्र पावरा, दिशांत वळवी यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रमोद कुलकर्णी, सतीशकुमार, लालागिर गोस्वामी, शंकर यादव, अशोक शेखावत, अनिल ठाकरे, निर्मला, अर्चना खैरनार, पायल पटेल या शिक्षकांनी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### अंबापूरच्या के. डी. गावित विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

**नंदुरबार** : तालुक्यातील अंबापूर येथील के. डी. गावित माध्यमिक विद्यालयात जागतिक आदिवासी गौरव दिन व रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

माजी सरपंच वासुदेव गायकवाड अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून रवींद्र बागूल, राजू पवार मुख्याध्यापक बापू गवते, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पुनाजी चौरे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते क्रांतिकारक बिरसा मुंडा, तंट्या भिल व एकलव्य, देवमोगरा माता यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनींनी आदिवासी भाषेत स्वागतगीत सादर करून केली. शिक्षक व अध्यक्षांनी आदिवासी समाजाबद्दल, क्रांतिकारकांनी केलेल्या कार्याचा उजाळा व आदिवासी समाजातील चालिरीती, परंपरा याबद्दल माहिती दिली. या वेळी वक्तृत्व स्पर्धाही घेण्यात आली. त्यात प्रावीण्य मिळवलेल्या कार्तिकी चौरे, मोहिनी गायकवाड, आदित्य गवळी यांना रवी बागूल यांच्याकडून पारितोषिक म्हणून पुस्तके देण्यात आली. आदिवासी पारंपरिक पोशाखातील विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले.

सिद्धांत खाडे यांनी सूत्रसंचालन केले. सुनील दाभाडे यांनी आभार मानले. दीपक पाटील यांनी फलकलेखन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नीलेश पाटील, हेमांगी पाटील, योगेश शिंपी, रेश्मा गावित, सागर शर्मा, राजेंद्र चौरे यांनी सहकार्य केले.



### साधना विद्यालयात वक्तृत्व, वेशभूषा स्पर्धा



**नंदुरबार** : तालुक्यातील शनिमांडळ येथील नंदुरबार तालुका विधायक समिती संचलित साधना विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात आदिवासी गौरव दिवस साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक तथा प्राचार्य कुंदन पाटील, पर्यवेक्षक पी. यू. आव्हाड यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम झाला. एम. सी. कासार अध्यक्षस्थानी होते. सुरुवातीला भगवान बिरसा मुंडा व देव मोगरा माता प्रतिमेचे पूजन झाले. एम. सी. कासार, बी. आर. वाघ यांनी आदिवासी पेहराव परिधान करून कार्यक्रमाची जबाबदारी घेतली. विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा, आदिवासी वेशभूषा स्पर्धा, नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या.

विद्यार्थ्यांनी आदिवासी वेशभूषा परिधान केली, आदिवासी साहित्य घेऊन नृत्य सादर केले. आदिवासी समाजाचे थोर समाजसुधारकांसह आदिवासी दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धेतून सादर केले. एस. आर. वसावे यांनी सूत्रसंचालन केले. व्ही. जे. प्रधान यांनी प्रास्ताविक केले. सी. के. राठोड यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सांस्कृतिक मंडळप्रमुख किरण मोरे व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

### विधी महाविद्यालयात आदिवासी गौरव दिन उत्साहात

**नंदुरबार** : शहरातील नंदुरबार तालुका विधायक समिती संचलित श्री. बटेसिंग भैय्या रघुवंशी विधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत आदिवासी गौरव दिन व क्रांती दिनानिमित्त कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ. एन. डी. चौधरी यांनी आदिवासी समाजातील क्रांतिकारी जननायक बिरसा मुंडा व शिरीष मेहता यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात दिलेल्या योगदानाबद्दल माहिती दिली. तसेच भारताच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या तेजस्वी क्रांतिवीरांना नमन केले. त्यांनी लोकमान्य टिळक, सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी, वीर भगतसिंग, चंद्रशेखर आझाद आदींचे स्वातंत्र्यसंग्रामातील योगदानातील महत्त्व सांगितले. आदिवासी बांधवांना संविधानाद्वारे जे अधिकार प्राप्त झाले आहेत, ते त्यांच्यापर्यंत पोहोचले पाहिजेत, यासाठी आपण सगळ्यांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.



राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. आशा तिवारी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. के. एस. मराठे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रघुवंशी, उपाध्यक्ष मनोज रघुवंशी तसेच संचालक मंडळाने प्रोत्साहन दिले.



### पाटील महाविद्यालयात आदिवासी गौरव दिन

**नंदुरबार** : येथील जी. टी. पाटील महाविद्यालयात आदिवासी गौरव दिवस साजरा करण्यात आला. प्राचार्य तथा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. एम. जे. रघुवंशी यांच्या हस्ते जननायक बिरसा मुंडा व क्रांतिकारक खाज्या नाईक यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. या वेळी उपप्राचार्य डॉ. संदीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी विद्यार्थिनींनी आदिवासी लोकनृत्य सादर करून आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविले. डॉ. मनोज शेवाळे यांनी सूत्रसंचालन केले. जयंती समन्वयक डॉ. उपेंद्र धगधगे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. एस. एस. दुतोंडे, प्रा. हर्षबोध बैसाणे यांनी सहकार्य केले.



### के. डी. गावित विद्यालयात महापुरुषांना अभिवादन

**नंदुरबार** : तलावपाडा (श्रीरामपूर) येथील के. डी. गावित माध्यमिक विद्यालयात आदिवासी गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सरपंच यशवंत गांगुर्डे अध्यक्षस्थानी होते. त्यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी हिरालाल गांगुर्डे, योगेश गावित आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आदिवासी वेशभूषा परिधान करून सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक श्यामराव धनगर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमात प्रफुल्ल पाटील यांनी आदिवासी गौरव दिनाचे महत्त्व व उद्देश याविषयी माहिती दिली. श्रीमती परमार यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जितेंद्र पाटील, अक्षय बागूल, विजया मोरे, सरिता शिंदे, संदीप शिंदे, विलास सोनवणे, वामन महाले आदींचे सहकार्य लाभले.



### पाचोराबारी येथील विद्यालयात प्रतिमापूजन

**नंदुरबार** : पाचोराबारी येथील के. डी. गावित माध्यमिक विद्यालयात आदिवासी गौरव दिवस उत्साहात झाला. सुरुवातीला देवमोगरा माता, वीर एकलव्य, जननायक बिरसा मुंडा, तंट्या मामा भिल यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापक गोरखनाथ बोराणे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून नारायणपूरच्या सरपंच सुनीता नाईक, पाचोराबारीचे माजी उपसरपंच धरमसिंग प्रधान, ग्रामपंचायतीचे सदस्य जालमसिंग प्रधान आदी उपस्थित होते. प्रमुख वक्ते उपशिक्षक संतोष पाडवी व किरण पाडवी यांनी आदिवासी बोलीभाषेत विचार मांडले. प्रवीण पटेल यांनी सूत्रसंचालन केले. मनोहर वसईकर यांनी आभार मानले. वंदना खैरनार, कविता पटेल, राजेंद्र ईशी, राजेंद्र पटेल आदींनी सहकार्य केले.



### वडछिल आश्रमशाळेत क्रांती दिन, रक्षाबंधन

**शहादा** : तालुक्यातील वडछिल येथील के. डी. गावित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत ऑगस्ट क्रांती दिन, जागतिक आदिवासी गौरव दिवस आणि रक्षाबंधन हे तिन्ही दिवस उत्साहात साजरे करण्यात आले. मुख्याध्यापिका ऊर्मिला वसावे अध्यक्षस्थानी होत्या. प्रमुख वक्ते म्हणून अजित वसावे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात आदिशक्ती श्री देवमोगरा माता आणि आद्य क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी एकमेकांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा आनंद घेतला. अजित वसावे यांनी ऑगस्ट क्रांती दिन आणि जागतिक आदिवासी गौरव दिवसाचे महत्त्व सांगितले. मनोज पाटील यांनी सूत्रसंचालन केले. रामकृष्ण पाटील यांनी आभार मानले.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### वंदे भारत ट्रेनच्या उद्घाटनप्रसंगी कुडे अन् बालकवी विद्यालयाचे विद्यार्थी झाले सहभागी

**धरणगाव :** भारतातील सर्वात लांब पल्ल्याच्या वंदे भारत ट्रेनच्या उद्घाटनप्रसंगी धरणगाव येथील सारजाई दामोदर कुडे व बालकवी ठोंबरे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यात प्रत्यक्ष बसून जळगाव ते मनमाडपर्यंत प्रवास केला. रेल्वे प्रशासनामार्फत ठराविक शाळांना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आलेले होते. या कार्यक्रमात खासदार स्मिताताई वाघ, नवनिर्वाचित खासदार ॲड. उज्ज्वल निकम, आमदार सुरेश भोळे, सेंट्रल रेल्वे प्रवासी मंडळाचे सदस्य महेंद्र कोठारी उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी विद्यालयाला एक स्मृतीचिन्ह देऊन गौरवांकीत करण्यात आले व विद्यार्थ्यांना नाश्ता, जेवण आणि उत्तम अशी प्रवासाची सुविधा पुरविण्यात आली. या गौरवशाली कार्यक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष हेमलाल भाटिया, उपाध्यक्ष चिंतामण पाटील, सचिव ललित उपासनींसह सर्व संचालक मंडळ तसेच मुख्याध्यापक एस. एस. पाटील, मुख्याध्यापक जीवन पाटील, शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी होण्यास किरण पाटील यांचे सहकार्य लाभले.



### पारोळा येथे टायगर इंटरनशनल स्कूलच्या नवीन इमारतीचे उद्घाटन

**पारोळा :** शहरासह तालुक्यात शिक्षण क्षेत्रातील नावलौकिक असलेल्या टायगर इंटरनशनल स्कूलच्या नवीन इमारतीचे उद्घाटन आमदार अमोल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. टायगर स्कूलचे चेअरमन रवींद्र पाटील प्रत्येक चढ-उतारात मी साक्षीदार आहे, त्यांनी संगणक व शैक्षणिक क्षेत्रात सुरूवातीपासूनच खूप कष्ट घेतले. त्यांनी त्यांच्या संगणक सेंटरची सुरूवात देवगाव येथून केली. त्यानंतर शीतल अकडमी, प्रवक्ता अकडमी ही भारतासह अन्य देशात सुरू केली. त्यांची जिद्द व मेहनतीने साकारलेल्या या शाळेचा आज लोकार्पण सोहळा पार पडला. सुरुवातीपासूनचे जीवन बघितले तर अगदी संघर्ष व काबाडकष्टाचे होते, त्यांनी प्रवक्ता अकडमी व टायगर इंटरनशनल स्कूलसह विविध क्षेत्रात घेतलेली उंच भरारी ही नक्कीच प्रेरणादायी आहे, असे मत आमदार पाटील यांनी व्यक्त केले. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष करण पवार, चंद्रकांत पाटील, दयाराम पाटील, रोहन मोरे, पोलीस निरीक्षक सचिन सानप यांच्यासह स्कूलचे प्राचार्य, शिक्षक-शिक्षकेतर उपस्थित होते.

### चाळीसगाव येथे कर्नाटक एक्सप्रेसला थांबा देण्याची प्रवाशांची मागणी

**चाळीसगाव :** चाळीसगाव जंक्शन हे जळगाव, नाशिक आणि धुळे या जिल्ह्यासाठी एक अतिशय महत्त्वाचे मध्यवर्ती रेल्वेस्थानक आहे. मनमाड आणि भुसावळ या स्थानकांच्या दरम्यान चाळीसगाव स्थानक असल्याने या ठिकाणी जलद गतीने धावणाऱ्या रेल्वे गाड्यांना थांबा नाही. यामुळे प्रवाशांची कुचंबणा होत असून वंदे भारत ट्रेनलादेखील चाळीसगाव येथे थांबा देण्यात आला नाही, ही येथून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांशी रेल्वे विभागाने केलेली थट्टा असून किमान कर्नाटक एक्सप्रेसला थांबा मिळावा, ही अनेक दिवसांची मागणी मंजूर करावी. कर्नाटक एक्सप्रेसला थांबा देण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा वसुंधरा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सचिन पवार यांनी निवेदनाद्वारे केली आहे. चाळीसगाव जंक्शनवरून बंगलोर, दिल्ली, सोलापूर (पंढरपूरसाठी) या ठिकाणी जाण्यासाठी कर्नाटक एक्सप्रेस (१२६२७, १२६२८) थांबा द्यावा. कारण परिसरातील युवक युवती नोकरीच्या संधीनुसार दिल्ली, बंगलोर, गुडगावमध्ये काम करतात. लांब पल्ल्याच्या बहुतांश ट्रेन चाळीसगाव येथे थांबत नाही, त्यामुळे प्रवाशांना मनमाड किंवा जळगावला जावे लागते. रेल्वे प्रशासनाने योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी सचिन पवार यांनी केली आहे.

### पर्यावरण संवर्धनासाठी लोहारा येथे माजी विद्यार्थ्यांनी केले वृक्षारोपण

**लोहारा (ता. पाचोरा) :** येथील डॉ. जे. जी. पंडित माध्यमिक विद्यालयात



दहावीच्या सन २००५ च्या माजी विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करुन आपला संकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. येथील विद्यार्थ्यांनी काही दिवसांपूर्वी स्नेहसंमेलनामध्ये वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला होता. म्हणून त्यांनी मराठी मुलींची कन्या शाळा व मराठी मुलांची शाळा लोहारा येथे वृक्षारोपण यशस्वीरीत्या पार पाडले. निसर्गाचे व समाजाचे आपण काही तरी देणे लागतो, या भावनेतून ‘वृक्षारोपण आणि संवर्धनाचा’ वसा त्यांनी घेतला आहे. केवळ वृक्षारोपण करायचे नसून, पुढील तीन वर्ष त्याचे संगोपन व संवर्धनही केले जाणार आहे. त्यासाठी नैसर्गिक खत, पाण्याची व्यवस्था केली जाणार आहे. वृक्षारोपणासाठी येथील माजी विद्यार्थी अविनाश चौधरी, जितेंद्र चौधरी, नीलेश देशमुख, हरीश खटके, गोपाल पाटील, सुकलाल डामरे, रामदास माळी, भूषण कासार, राजू गीते, संतोष महाजन यांनी श्रमदान केले.



### एनएसएसतर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांसमवेत रक्षाबंधन

**चोपडा :** येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांना राख्या बांधून व अल्पोपहार वाटप करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका विद्यार्थिनींनी चोपडा येथील प्रेरणा मतिमंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना राख्या बांधून औक्षण केले व विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप केले. प्रा.सुनील पाचवणे यांनी उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट केले. यावेळी महाविद्यालय विभागप्रमुख डॉ.संजय चौधरी, रासेयो प्रमुख कार्यक्रम अधिकारी प्रा.अनिल बाविस्कर, प्रा.समाधान सोनवणे, प्रा.सुनील पाचवणे, प्रा.भाग्यश्री महाजन, प्रा.पूजा माळी, शिक्षीका सरला माळी, नंदीनी याज्ञिक आदी उपस्थित होते.

# अंजनी प्रकल्प पूर्णत्वाच्या आशा पल्लवीत

**तभा वृत्तसेवा**
**धरणगाव, ११ ऑगस्ट**



५ ऑगस्ट रोजी मंत्रालयात जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली तापी खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची बैठक पार पडली. यावेळी माजी आमदार महेद्रसिंग पाटील यांचा युक्तीवाद जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी गांभीर्याने ऐकला, नवीन प्रकल्प अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. या बैठकीत जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव डी.एल.कपूर, सचिव बेलसरे, तापी महामंडळाचे कार्यकारी संचालक बोरकर, अधीक्षक अभियंता गोकूळ महाजन व माजी आमदार महेंद्रसिंह पाटील यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत महेंद्रसिंह पाटील यांनी अंजनी धरणाच्या पाण्याच्या उपलब्धतेअभावी रद्द झालेल्या वाढीव (दुसरा टप्पा) प्रकल्पाचा मुद्दा मांडला. नार-पार तापी प्रकल्पात आता गिरणा धरणासाठी १०.६ टीएमसी पाणी मंजूर केले आहे. पैकी १ टी.एम.सी. पाणी अंजनीच्या वाढीव दुसऱ्या टप्प्यास उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी केली.

पाटबंधारे मंत्री गिरीश महाजन यांनी महेंद्रसिंग पाटील यांचा मुद्दा मान्य करीत प्रकल्पाचा नवीन सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता पंचवीस वर्षांपासून अर्धवट अवस्थेत असलेला हा प्रकल्प पूर्ण होण्याची आशा निर्माण झाली असून या प्रकल्पावर आधीच ३२ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. वाढीव क्षमतेची भिंतदेखील पूर्ण झालेली आहे.

युती सरकारच्या काळात अत्यंत कमी कालावधीत हा प्रकल्प माजी आमदार महेंद्रसिंग पाटील कठोर परिश्रमातून साकारला गेला, पण या प्रकल्पाकडे संपूर्ण दुर्लक्ष झाले होते. महेंद्रसिंग पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे व पाठपुराव्यामुळे अंजनी प्रकल्प पूर्णत्वास येण्याच्या आशा पल्लवीत झाल्या असून, एरंडोल व धरणगाव तालुक्यांतील शेकडो एकर शेतीला याचा लाभ होऊन अनेक गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे.

# पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम धोक्यात

**कडू महाजन**
**धरणगाव, ११ ऑगस्ट**

जिल्हासह तालुक्यातील ८६ खेड्यांतील ग्रामीण शिवारात गेल्या आठ दिवसांपासून मोसमी पावसाने दडी मारल्याने तालुक्यातील बहुतांश भागात दुष्काळसदृश परीस्थीती निर्माण झाली आहे. खरीप पिके कोमेजू लागली असून, उत्पन्नात घट निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सध्या तालुक्यातील बहुतांश भागातील मका, कापूस, सोयाबीन, ज्वारी, बाजरी, उडीद, मुंग व तूरची लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. परंतु एक आठवड्यापासून पाऊस पूर्णतः गायब झाल्याने पिकांना उन्हाचा तडाखा बसला असून उत्पन्नात घट निर्माण होईल, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

खरीप हंगामातील पिकांसाठी दमदार पावसाची गरज भासत असून शेतकऱ्याचे डोळे आकाशाला भिडले आहेत. म्हणून शेतकरी दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. तालुक्यात सरासरीच्या तुलनेत यंदा पावसाचे प्रमाण कमी असून, गेल्या आठ दिवसांपासून पावसाने पुन्हा ब्रेक दिला आहे. त्यामुळे पिकांना पावसाची अत्यावश्यक गरज भासत आहे. सध्या गेल्या महिन्यापासून ठिंबक सिंचन पद्धतीप्रमाणे पाऊस सुरू असून कुठे पाऊस पडतो तर कुठे पाऊसच येत नाही, अशी परिस्थिती पहावयास मिळत आहे. आजपर्यंत नदी नाले कोरडेठाक आहेत.

नदीनाले वाहून न निघाल्याने तालुक्यातील विहिरींची पाण्याची पातळी खालावली आहे. गिरणा पाटबंधारे प्रकल्प अंतर्गत तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येत असली तरी धरणात अद्याप मुबलक पाणी साठा उपलब्ध नसल्याने भविष्यात पाटाला पाणी येईल याची शाश्वती नाही.

# अमळनेरातील पिंपळे रोड मरीआई मंदिराचा जीर्णोद्धार

**अमळनेर :** शहरातील पिंपळे रोड परिसरातील मरीआई मंदिराचा जीर्णोद्धार करून सदर मंदिरावर वासुदेव जोशी गोंधळी समाजातर्फे सालाबादाप्रमाणे पारंपरिक पद्धतीने मरीआईची चक्रपूजा करण्यात आली. ही पूजा ‘कढई पूजा’ म्हणून प्रसिद्ध आहे.



अनेक दशकांपासून गावाबाहेर राहिलेल्या मरीआई मंदिरावर जोशी गोंधळी समाजातर्फे श्रावण महिन्यात संपूर्ण वासुदेव जोशी गोंधळी समाजातर्फे सामूहिक चक्रपूजा करण्यात येते. पिंपळे रोडच्या विस्तारीकरणाच्या कामानंतर या मंदिराचा जीर्णोद्धार करून घेण्यात आला. नवसाला पावणारी मरीआई म्हणून या मंदिरावर भाविक प्रार्थनेसाठी येत असतात. यंदा जोशीपुरा येथून वासुदेव जोशी गोंधळी समाजातर्फे वाजत गाजत मिरवणुकीने महिला व नागरिक पिंपळे नाल्याजवळ असलेल्या मरीआई मंदिरापर्यंत देवीचा जयघोष करीत आले. यावेळी महिला हातात देवीचे ताट, नेवैद्य पूजा थाळी सोबत घेऊन सहभागी झाल्या होत्या. नवीन जोडप्यांनी देवीची पूजा केली.तर सामूहिक आरती करण्यात आली.

यावेळी समाजाचे अध्यक्ष विलास दोरकर, उपाध्यक्ष नारायण शिंदे यांसह अमळनेर अर्बन बँकेचे व्हाईस चेअरमन रणजित शिंदे, समाज पंच मंडळ व कार्यकर्ते कपिल दोरकर, भगवान शिंदे, रवींद्र शिंदे, महेश जोशी, योगेश शिंदे, देवेंद्र दोरकर, दीपक दोरकर, सुमित दोरकर, हरीश विधाते, नरेंद्र दोरकर, आदित्य दोरकर, येतीश शिंदे, जयेश दोरकर, नयन शिंदे , विनोद दोरकर, रोहित भोपे यांसह वैशाली दोरकर, विस्तार अधिकारी शैलजा शिंदे गोदावरी दोरकर, वंदना शिंदे, कमलबाई शिंदे, नयना अहिरराव, अनिता दोरकर, मनीषा दोरकर, पुष्पा दोरकर, मीना दोरकर, रजनी विधाते, सीमा भोपे, शोभा दोरकर आदिंसह समाजबांधव व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# पाचोरा तहसील आवारात घाणीचे साम्राज्य

## संबंधित अधिकाऱ्यांचे सोयीस्कररित्या दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, ११ ऑगस्ट**

येथील तहसील आवारात साफसफाईच्या अभावामुळे सर्वत्र घाणीचे साम्राज्य तर शौचालयांची दुरवस्था झाली असून, दुर्गंधीमुळे कर्मचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, येथील तहसील कार्यालय आवारात फेरफटका मारला असता सफाईअभावी सर्वत्र घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असल्याचे चित्र दिसून येत आहे तर शौचालयांचीदेखील दुरवस्था झाली आहे. दुर्गंधीमुळे कर्मचाऱ्यांचेही आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.



तहसील आवारात पहिल्या मजल्यावर तहसीलदारांच्या कार्यालयासमोरील गॅलरीतमध्येच कचरा साठविला जात असल्याचे चित्र असून, बाजूलाच शौचालयाचीदेखील दुरवस्था झाली आहे. त्यामुळे येथील विविध विभागात कार्यरत कर्मचारी यांचा या ठिकाणी वावर असतानाही सोयीस्कररित्या दुर्लक्ष होतानाचे चित्र दिसून येत आहे.

तसेच दुय्यम निबंधक कार्यालयाशेजारीलदेखील घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असल्याचे चित्र दिसून येत आहे. जिन्यावरदेखील सर्वत्र घाण फेकली जात आहे. तसेच तहसील आवारात जप्त ट्रॅक्टर ट्रॉलीचादेखील ही घाण टाकण्यासाठी उपयोग केला जात असल्याचे चित्र आहे. शासन इमारत दुरुस्ती, रंगरंगोटीसाठी निधी देत असते, मात्र शौचालयाची दुरवस्था साफसफाईचाअभाव तहसील आवारात कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचीदेखील व्यवस्था करण्यात आली नसल्याचे चित्र आहे. तहसील आवारात साफसफाईचा पूर्णतः बोजवारा उडाला आहे. सध्याचे वातावरण पाहता सर्वत्र रुग्णालयामध्ये रुग्ण आढळून येत आहेत. तहसील आवारातील घाणीचे साम्राज्य पाहता संबंधित अधिकाऱ्यांनी काळजी घेणे गरजेचे असून, असेच चित्र राहिल्यास रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पहिले अ. भा. आंतरभारती बालकुमार साहित्य संमेलन उद्यापासून

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑगस्ट**

विद्यार्थी व तरुणांमध्ये बालपणापासून साहित्याची आवड निर्माण व्हावी तसेच साहित्य चळवळ वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने समाज चिंतामणी प्रतिष्ठानतर्फे १३, १४ व १५ ऑगस्ट २०२५ रोजी तीन दिवशीय पहिले अखिल भारतीय आंतरभारती बालकुमार साहित्य संमेलन आयोजित करण्यात आलेले आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे होणाऱ्या या साहित्य संमेलनात शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबरच महाराष्ट्रातील नामांकित साहित्यिक सहभागी होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये साहित्याविषयी अभिरुची निर्माण होण्यास मदत होणार आहे.

या साहित्य संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे होत असून जगातील कानाकोपऱ्यातून साहित्यिकांना व साहित्य रसिकांना प्रवास न करता अगदी घरी बसून साहित्य संमेलनाचा आनंद घेता येणार आहे.त्यामुळे वेळेची व खर्चाची सुद्धा बचत होणार आहे.

समाज चिंतामणी प्रतिष्ठान गेल्या दहा वर्षांपासून साहित्य चळवळ व वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी नवोपक्रम राबवित आहे. या संमेलनात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

अधिक माहिती आर. डी. कोळी (९८६०७०५१०८), प्रा. रत्नाकर कोळी (८३२९६४६५०५), प्रा. गोपीचंद धनगर (९७६६२०७५७४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन तीन दिवसीय संमेलनात १३ रोजी अभिवाचन, बालकुमार कविसंमेलन, १४ रोजी मी लिहिलेले पुस्तक, मी कसा घडलो, निमंत्रितांचे कविसंमेलन, १५ रोजी कथाकथन, देशभक्ती गीतगायन होईल.

**राज्यातील नामवंत साहित्यिकांचा सहभाग**

नागपूर येथील नामवंत लेखिका प्रा. विजया मारोतकर या साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षा असून, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस संमेलनाध्यक्ष आहेत. नांदेड येथील बालसाहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांच्या हस्ते साहित्य संमेलनाचे उद्घाटन होईल. जळगाव येथील प्रसिद्ध बालसाहित्यिका माया धुप्पड साहित्य संमेलनाच्या समारोप अध्यक्षा आहेत.

# सिद्धी झगडे ‘श्रावण क्वीन’ स्पर्धेत सेकंड रनर अप

**मुंबई :** श्रावण महिना म्हणजे व्रत, वैकल्य, उपवास सण वाराचा महिना. या महिन्यात मंगळा गौरीचे विशेष व्रत असते. मंगळागौर हे हिंदू धर्मातील एक व्रत आहे. ते श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी नवविवाहित महिलेने लग्नानंतर पहिली पाच वर्षे करावयाचे असते. यासाठी अशाच इतर नवविवाहितांनाही बोलावून सकाळी एकत्रित पूजा करतात व त्यानंतर रात्री जागरण करतात. यात विविध प्रकारचे खेळ खेळण्यात येतात.

दादासाहेब फाळके पुरस्कारासह सह अनेक सन्मानाचे पुरस्कार विजेत्या सुवर्णलता वांगे यांनी ५ ऑगस्ट रोजी शिवाजी मंदिर दादर मुंबई येथे ‘श्रावण क्वीन स्पर्धा २०२५’ चे आयोजन केले होते.

स्पर्धेत मंगळागौरीत खेळल्या जाणाऱ्या खेळांचा समावेश होता. स्पर्धेचे परीक्षक म्हणून मिस इंडिया इंटरनेशनल विनर, मिस महाराष्ट्र कोमल रुपरेलिया, डान्स फॅशन आणि गरबा जुरी सिद्धेश जाधव यांनी काम पहिले.

स्पर्धा प्रमुख म्हणून सुवर्णा भागवत यांनी तसेच वैशंपायन गमरे, शेखर दाते, केदार वांगे, प्रशांत पवार यांनी व्यवस्थापनाचे




काम पहिले. तन्वी बनसोडे यांच्या निवेदनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

महिलांसाठी दोन गटात या स्पर्धा भरवण्यात आल्या होत्या. संपूर्ण महाराष्ट्रातून या स्पर्धेस महिलांनी भरभरून प्रतिसाद दिला.

अत्यंत प्रतिष्ठित अशा या स्पर्धेत चुरशीच्या लढतीत सिद्धी संतोष झगडे यांनी प्रचंड मेहनत घेऊन सेकंड रनर अपचे पारितोषिक मिळवले. याकरिता सिद्धी संतोष झगडे यांना स्वर स्वामी कला साधनाचे संचालक गणेश हातगे, प्रियांका हातगे, सौरभ हातगे, राजेश हुनारी यांचे सहकार्य लाभले.

# जामनेरात बेटावद खुर्दच्या तरुणाचा मारहाणीत मृत्यू



**जामनेर :** तालुक्यातील बेटावद खुर्द येथील तरुण सुलेमानखान रहिमखान पठाण (वय २१) या तरुणाचा मारहाणीत मृत्यू झाल्याची चर्चा जामनेरात सुरू आहे. याबाबत वृत्त असे की, बेटावद खुर्द येथील सुलेमानखान रहिमखान पठाण हा तरुण ११ रोजी आपले गाव असलेल्या बेटावद खुर्द येथील स्वतःच्या शेतात १० वाजेपर्यंत शेतीचे काम करीत असल्याची माहिती त्याच्या नातेवाईक असलेल्या मंडळीकडून चर्चे दरम्यान मिळाली. त्यानंतर सुलेमानखन हा तरुण पोलीस भरतीची तयारी करण्यासाठी व फॉर्म भरण्यासाठी जामनेर येथे जाऊन येतो, असे घरच्या मंडळीना सांगून तो बेटावद खुर्द येथून ११ वाजेच्या एसटी बसने जामनेर येथे आला.

शहरातील एका कॅफेमध्ये तो गेला असता त्याला काही तरुणांकडून मारहाण झाल्याची चर्चा असून, मारहाण करत त्या तरुणाला त्याच्या मूळ गावी म्हणजे बेटावद खुर्द येथे मारहाण करणारेच तरुण घेऊन गेल्याचे समजते. घरी पोहचल्यानंतर त्याने फक्त पाणी पिल्याचे व आपल्यासोबत घडलेली घटना त्याने आपल्या घरच्या लोकांना सांगितल्याची माहितीसुद्धा समोर येत आहे.

या मारहाणीतच त्याचा मृत्यू झाल्याचे त्याच्या नातेवाईकांचे म्हणणे असून मयत सुलेमानखन यांच्या नातेवाईकांनी येथील पोलीस स्टेशनसमोर मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे दिसून आले. या घटनेला जबाबदार असलेल्या लोकांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी त्यांच्याकडून करण्यात आली आहे. मारहाणीचे कारण मात्र समजू शकले नाही. रात्री उशिरापर्यंत जामनेर पोलिसात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. जामनेर पोलीस स्टेशनमध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी भेट दिली व झालेल्या घटनेची माहिती घेतली. याबाबत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

**TCI FOUNDATION**

Invites application for the position of Outreach Worker from eligible candidates for its Truckers Targeted Intervention (TI) project at Jalgaon, Maharashtra.

| | |
|---|---|
| **Outreach Worker (01)** | Qualification : Minimum 10th Pass. Salary : Rs. 10500/month + TA : Rs.1500/month |

**Last Date to Apply :** 19 August 2025
**Contact Person -** Mr. Pramod Patil, 8788640880
**Email ID -** MH.JL@tcifindia.org
**Venue -** Khushi Clinic TCI Foundation, D26 Transport Nagar, Near Ajintha Chowfully, Jalgaon - 425001, Maharashtra

# किनगाव येथे आदिवासी दिवस उत्साहात साजरा

**यावल :** ९ ऑगस्ट जागतिक ‘आदिवासी दिवस’ किनगावसह परिसरासह आदिवासी पाड्यांवर मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.



किनगाव येथे जागतिक आदिवासी दिवस व क्रांती दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध कलागुण दर्शन व समाज प्रबोधनाचे कार्यक्रमांचेही आयोजन तडवी पंच कमेटी किनगाव, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद नवी दिल्ली, तडवी एकता मंच व आदिवासी एकता परिषद यांच्यामार्फत करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार रमेश चौधरी होते, तर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आर.जी. पाटील, पं.स.चे माजी उपसभापती उमाकांत पाटील, रामराव पाटील, स्व. केतन मल्टीपर्पज फाउंडेशनचे अध्यक्ष व इंग्लिश मीडियम निवासी पब्लिक स्कूलचे सचिव मनीष विजयकुमार पाटील, जिल्हा संघटक मुनीर तडवी, सरपंच स्नेहलता मिलींद चौधरी, छत्रपती शिवाजी महाराज कृती समितीचे अध्यक्ष मोहन पाटील, उपसरपंच अलानूर, माजी उपसरपंच लुकमान कलंदर तडवी, मिलिंद चौधरी, संजय पाटील, किनगाव ग्रा. पं.चे सदस्य अय्युब तडवी, पंचक येथील सरपंच बिस्मिल्ला तडवी लोणी येथील उपसरपंच शबानाताई तडवी, आदिवासी कॉंग्रेस सेलचे जिल्हा अध्यक्ष जफरउल्ला जमादार, अखिल भारतीय आदिवासी विकास युवक सेलच्या महिला सचिव मीना तडवी, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष राजू तडवी, युवा महानिरीक्षक रोनक तडवी, जिल्हाध्यक्ष मुरात तडवी, शाखाध्यक्ष अनिस तडवी, राजीव गांधी फाउंडेशनच्या सचिव फातमा मुनीर तडवी, स्वीय सहाय्यक समीर तडवी, अनिस तडवी, रफिक तडवी, अशोक भील, किरण सोनवणे, भूषण साळुंखे, सुधाकर सावकारे, सूर्यभान पाटील, मांडेवाल, जुम्मा तडवी, भाजपचे अनिल पाटील व संजय पाटील या मान्यवर उपस्थित होते. गावातून मिरवणूकही काढण्यात आली.

आदिवासी दिनाचे औचित्य साधून सांस्कृतिक कार्यक्रम अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद युवक सेल नवी दिल्ली संघटनेच्यावतीने ४२ गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. अध्यक्ष अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे महानिरीक्षक रोनक तडवी, जिल्हाध्यक्ष मुराद तडवी, यावल तहसील चे सखावत तडवी, लुकमान तडवी, अनिस तडवी, अशोक भिल, खलील तडवी यांच्याहस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाखा अध्यक्ष अनिस तडवी, शाखा सचिव शरीफ तडवी, उपाध्यक्ष अझर तडवी, सल्लागार लुकमान तडवी, सलीम तडवी, अशोक भील, सतीश बारेला यांसह परिसरातील पाड्या वस्तीवरील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी खलील तडवी, फकिरा तडवी, अझर तडवी, समीर तडवी, अशोक भील, सबदर तडवी, राजू तडवी, लतीफ तडवी, फिरोज तडवी, गणेश भील, सुधाकर भील, आनंदा भील, सतीश बारेला, जनाराम बारेला, बाळू बारेला, स्वप्निल बारेला, सोहेल तडवी, दिशान तडवी, गोलू तडवी, साहिल तडवी, अमीन तडवी, समस्त तडवी नोकरदार वर्ग व सामाजिक कार्यकर्त्यांनी आर्थिक मदत करून सहकार्य केले.

Shram Sadhana Bombay Trust's
**COLLEGE OF ENGINEERING & TECHNOLOGY**
Bambhori, Jalgaon(MS)
BAMBHORI, JALGAON Estd.2019

**ADMISSION NOTICE-2025-26**
**(Direct Second year MBA)**
**Probable Vacancy For Lateral Entry**

Applications are invited from eligible & aspiring candidates for Admission in Direct Second year Lateral Entry MBA

**THE SCHEDULED ACTIVITY IS AS MENTIONED BELOW**

| Sr. | Activity | Date |
|---|---|---|
| 1 | Submit of Application | 13/08/2025 |
| 2 | Display of Merit List | 14/08/2025 |
| 3 | Confirmation of Admission | 14/08/2025 |

**COURSES :**
**Direct Second year MBA**

Admission will be as per inter-se merit derived from merit list declared by competent Authority. Detailed information is displayed on institute website (https://sscoetjalgaon.ac in) & institute Notice board from time to time. All matter related to admission will be handled by Institute Admission Committee only

note: For aspiring candidates for Institute Level admission it is mandatory to register on mahacet.org

PRINCI PAL

## थोडक्यात महत्त्वाचे...



### राष्ट्रवादी सोशल मीडिया विभाग अमळनेर शहर, तालुका पदाधिकारी नियुक्त

**अमळनेर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सोशल मीडिया विभागाच्या वतीने अमळनेर शहर व तालुक्यातील नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. नवनियुक्त पदाधिकारी असे- शहर उपाध्यक्ष राजेश नेरकर, सुमित ब्रम्हे, शहर सचिव वेदांत पाटील, उदय बैसाने, शहर सरचिटणीस आयुष पाटील, हर्षल निकम, तालुका उपाध्यक्ष गौरव चौधरी, तालुका संघटक राज पाटील. या सर्व नविन पदाधिकाऱ्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वरिष्ठ उपाध्यक्ष व माजी मंत्री, आमदार अनिल भाईदास पाटील यांच्या हस्ते व सोशल मीडिया विभागाचे जिल्हाध्यक्ष सनी गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष ज्ञानदीप सांगोरे, जिल्हा उपाध्यक्ष करण साळुंखे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष कृष्णा बोरसे यांच्या उपस्थितीत, मीडिया शहराध्यक्ष रोहित सूर्यवंशी तालुकाध्यक्ष मयूर बोरसे तालुका शहर कार्याध्यक्ष हितेश नायदे, संघटक जयेश देवरे यांच्या पुढाकाराने नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

### ‘जिल्हा परिषद आपल्या दारी’ उपक्रमांतर्गत चाळीसगावात तक्रार निवारण सभा उत्साहात

**चाळीसगाव :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या ‘जिल्हा परिषद आपल्या दारी’ या अभिनव उपक्रमांतर्गत चाळीसगाव येथे तक्रार निवारण सभा ७ ऑगस्ट रोजी पार पडली. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार मंगेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशासनाशी संवाद साधण्याचे व त्यांच्या अडचणी, समस्या मांडण्यासाठी सुलभ व्यासपीठ मिळावे यासाठी या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, प्रकल्प संचालक लोखंडे, कार्यकारी अधिकारी आकलडे, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी भदाणे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील पाटील, ग्रामीण पाणीपुरवठा अभियंता राहुल जाधव, प्राथमिक शिक्षणाधिकारी सचिन परदेशी, माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण व इतर पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला. यात १०० पेक्षा अधिक तक्रारींचा निपटारा करण्यात आला.



### साकरे विद्यालयात क्रांती दिन, आदिवासी दिन साजरा

**धरणगाव :** तालुक्यातील साकरे येथील बा. च. भाटिया माध्यमिक विद्यालयात ९ ऑगस्ट रोजी ऑगस्ट क्रांती दिन व आदिवासी दिन उत्साहात साजरा झाला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका अनिता पाटील होत्या. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे गायन केले. शिक्षिका निकिता महाजन यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. उपशिक्षिका मनीषा शिंदे यांनी ही देशभक्तीपर गीत सादर करून शहीदांना मानवंदना दिली. इयत्ता दहावीची विद्यार्थिनी बबिता भिवराज भिल हिने आदिवासी गीताचे गायन केले. विद्यालयातील सांस्कृतिक समिती प्रमुख लीलाधर माळी यांनी सूत्रसंचालन केले. यावर्षीही दरवर्षीप्रमाणे विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावीतील विद्यार्थिनींनी स्वतःने रंगबिरंगी व आकर्षक, देशभक्तीवर आधारित राख्या तयार करून सीमेवरील सैनिकांना पाठवत अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन सादर केले. यासाठी विद्यार्थिनींना लीलाधर माळी, किशोर पाटील, मनीषा शिंदे यांनी मार्गदर्शन केले.



### नशिराबादेत न्यू इंग्लिश स्कूलतर्फे तिरंगा रॅली

**नशिराबाद (ता. जळगाव) :** १२ ऑगस्ट रोजी आझादीच्या अमृत महोत्सव ‘हर घर तिरंगा’ या मोहिमेंतर्गत नशिराबाद येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांची तिरंगा रॅली काढण्यात आली. या तिरंगा रॅलीत सहभागी इयत्ता सातवी व इयत्ता आठवीचे विद्यार्थी, मुख्याध्यापिका एस. ए. बनसोडे, उपमुख्याध्यापक ए. डी. चौधरी व शिक्षकांनी सहभाग नोंदविला.

### सोयगाव पोलीस स्टेशनला फुलांची रोपे भेट

**सोयगाव :** सोयगाव पोलीस स्टेशनला निवृत्त पोलीस कर्मचारी सिद्धार्थ



कांबळे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पत्नी लता सिध्दार्थ कांबळे यांनी विविध रंगीबेरंगी फुलांची २१ रोपे भेट म्हणून दिली. यावेळी सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल, पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर, पोलीस उपनिरीक्षक रज्जाक शेख, महिला पोलीस कर्मचारी प्रियांका बोडखे, सादिक तडवी, संजय सिंगल, कृषिभूषण अरुण सोहनी उपस्थित होते.



## माळी, कुणबी पाटील समाजातर्फे धरणगावात मरीआई मंदिरात पूजन

**तभा वृत्तसेवा**
**धरणगाव, ११ ऑगस्ट**

समस्त माळी समाज पंच मंडळ व समस्त कुणबी पाटील समाज पंच मंडळ लहान माळी वाडा यांच्यातर्फे श्रावण मासनिमित्त दुसऱ्या मंगळवारी शहरातील ग्रामदैवत मरीआई मंदिरात पूजनाचा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाला माळी व पाटील समाज पंच भवनापासून प्रारंभ होऊन वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक लहान माळी वाडा परीसरातून गबा नंदा महाजन चौक, तेली विहीर, कोट बाजार, सिद्धी हनुमान व नवेगांवा हनुमान मंदिराजवळून जात मरीआई मंदिरात विधीवत पूजन करून समारोप करण्यात आला. मरीआई मंदिरात समारोपाचा कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार कडू महाजन यांनी प्रास्ताविक केले. मरीआई संस्थानच्यावतीने अध्यक्ष किशोर पहेलवान, गोपाल पाटील, गोरख महाजन यांनी माळी समाजाचे अध्यक्ष रामकृष्ण महाजन व कुणबी पाटील समाजाचे अध्यक्ष माधवराव पाटील यांचा सत्कार करण्यात आला. मरीआई संस्थानचे सदस्य रमेश चौधरी यांनी आभार मानले

**यांची होती उपस्थिती**

याप्रसंगी शिवाजी देशमुख, विलास महाजन, भीमराज पाटील, महेश पाटील, राजेंद्र महाजन, दिलीप पाटील, भटुलाल महाजन, विजय महाजन, आनंद पाटील, दीपक महाजन, राजू महाजन, शांताराम मराठे, दयाराम महाजन, किशोर पाटील, किरण महाजन, भानुदास मराठे, कैलास पाटील, मनोज महाजन, अशोक झुंजारराव, गणेश निकम उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रजेला न्याय, सुरक्षा अन् स्वाभिमान दिला

## मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले : छत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्यासह शिवसृष्टीचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑगस्ट**

‘छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास केवळ युद्धाचा नव्हे तर लोककल्याण, प्रशासन, न्यायव्यवस्था आणि धर्मनिरपेक्षता प्रेरीत आहे. महाराजांनी स्वराज्याची स्थापना करीत प्रजेला न्याय, सुरक्षा आणि स्वाभिमान दिला असल्याचे प्रतिपादन मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

जामनेर तालुक्यातील फत्तेपूर येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे आणि शिवसृष्टीचे लोकार्पण छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज तथा बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

ते पुढे म्हणाले की, “या शिवसृष्टीतून भावी पिढीला इतिहासाचे प्रत्यक्ष दर्शन होईल. आजच्या तरुण पिढीनेही त्या ध्येयाने प्रेरित होऊन कार्य केले पाहिजे.




**यांची होती उपस्थिती**

यावेळी जलसंपदा तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, खासदार स्मिता वाघ, आमदार मंगेश चव्हाण, सुरेश भोळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जे. के. चव्हाण, संजय गरुड, प्रा. शरद पाटील, डॉ. प्रशांत भोंडे, कार्यकारी अभियंता प्रशांत सोनवणे, तहसीलदार नानासाहेब आगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

शालेय विद्यार्थी, तरुण, नागरिकांनी महाराजांचा संघर्ष, शौर्य आणि दूरदृष्टी यांचा अभ्यास करावा,” असे आवाहन त्यांनी केले.

मंत्री गिरीश महाजन यांच्या माध्यमातून उभारलेली शिवस्मारके ही एक ऐतिहासिक चळवळ असून ती प्रेरणेचे केंद्र बनतील. पुतळा हा केवळ धातूचा नसून तो आपल्या विचार, संस्कार आणि वारशाचा जिवंत पुरावा असल्याचेही मंत्री भोसले यांनी सांगितले.

तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेत निर्व्यसनी राहून आई-वडिलांची सेवा करीत एकजुटीने समाजाच्या सेवेत राहावे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये शिवरायांचे पुतळ्यांच्या माध्यमातून प्रेरणा पोहोचवण्याचे कार्य पुढेही सुरू राहणार असल्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

## डॉ. सुरेश पाटील महाविद्यालयात आदिवासी दिन, क्रांती दिनी कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**चोपडा, ११ ऑगस्ट**

महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागाच्या राज्यशास्त्र, इतिहास, मराठी विभाग तसेच विद्यार्थी विकास विभाग यांच्यातर्फे ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सुरुवातीला कविता माळी या विद्यार्थिनीने आदिवासी पारंपरिक आदिवासी लोकगीत सादर करून मान्यवरांचे स्वागत केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे होते. उपप्राचार्य प्रा. डॉ. आर. एम. बागुल, उपप्राचार्य प्रा. डॉ. ए. बी. सूर्यवंशी, महाविद्यालयाचे समन्वयक व कार्यक्रमाचे मार्गदर्शक डॉ. शैलेशकुमार वाघ, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य एस. पी. पाटील, समन्वयक पी. एस. पाडवी, पालक रामलाल बारेला, सौ. एम. टी. शिंदे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. डी. कर्दपवार, सहा. विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. आर. आर. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आदिवासी खेड्यापाड्यातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक आदिवासी समूह नृत्य व समूह गायन कलांचे बहारदार सादरीकरण केले.

प्रमुख मार्गदर्शक समन्वयक डॉ. शैलेशकुमार वाघ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. डी. डी. कर्दपवार यांनी ‘आदिवासी जनजीवन व संस्कृती यावर मार्गदर्शन केले.’

सूत्रसंचालन डॉ. एम. एल. भुसारे यांनी केले. आभार बाबासाहेब जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दिनेश आलाम, निवृत्ती पाटील, मोतीराम पावरा, चेतन बाविस्कर, नितेश पाटील, नरेंद्र सोनावणे, पवन पाटील, कल्पेश पाटील, संदीप पाटील तसेच वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



## शिरसोलीतील असंख्य युवकांचा शिवसेनेत प्रवेश

**जळगाव :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जळगाव तालुक्यातील शिरसोली प्र. न. येथील असंख्य युवकांनी शिवसेनेत प्रवेश केला. राज्याचे लाडके नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून तसेच जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत विधानसभा क्षेत्रप्रमुख श्याम कोगटा तसेच युवासेना जिल्हाध्यक्ष रोहित कोगटा यांच्या कार्यात्मक बाबींची दखल पाहून शिरसोली प्र. न. येथील असंख्य युवकांनी पालकमंत्री पाटील यांच्या निवासस्थानी पाळधी येथे शिवसेनेचे भगवे रुमाल गळ्यात परिधान करून शिवसेनेत प्रवेश केला.

यावेळी हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे यांचे स्मरण करून विविध घोषणा देत मोठा जल्लोष केला. प्रवेश घेते वेळी विशाल मोरे, विशाल भिल्ल, प्रशांत पवार, रवींद्र मालचे, अनिल मोरे, प्रवीण मोरे ,राजू भिल्ल, राजेंद्र भिल्ल, जितू भिल्ल, सोनू मालचे, अजय भिल्ल, विनोद भिल्ल, सोनू मोरे, हुसेन, संदीप, योगेश मोरे, विशाल मोरे, महेश भिल्ल, नितीन भिल्ल, जितू मोरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## बुलडाणा अर्बनच्या सुवर्णकन्या योजनेला उदंड प्रतिसाद

### सिल्लोड विभागातर्फे सोन्याच्या ३०० नाण्यांच्या विक्रीचा टप्पा पार



**तभा वृत्तसेवा**
**सोयगाव, ११ ऑगस्ट**

बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या सुवर्णकन्या योजनेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक यांच्या प्रेरणेने नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर यांच्या नेतृत्वात आणि सिल्लोड विभागीय व्यवस्थापक संजय दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली बुलडाणा अर्बनच्या सिल्लोड विभागाने या योजनेंतर्गत एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. सिल्लोड विभागाने आज सोन्याच्या ३०० नाण्यांच्या विक्रीचा महत्त्वाचा टप्पा पार करत २ कोटी सुवर्णकन्या सोनेतारण कर्जवाटप करून उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

समाजामध्ये लग्नकार्यात किंवा इतर मंगलप्रसंगी सोन्याला विशेष महत्त्व आहे. अनेकदा लग्नाच्या एकूण खर्चापैकी मोठा वाटा सोन्याच्या खरेदीवर होतो. हीच गरज ओळखून सभासदांना सोन्यामधील गुंतवणूक सोपी व्हावी आणि ऐनवेळी येणारा आर्थिक भार कमी व्हावा या उद्देशाने बुलडाणा अर्बनने सुवर्णकन्या योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत १०० टक्के शुद्ध सोन्याचे नाणे सभासदांना खरेदी करता येते. यासाठी सभासदांना सोन्याच्या दरानुसार केवळ १० टक्के रक्कम आणि त्यावर ३ टक्के जीएसटी भरावा लागतो. उर्वरित ९० टक्के रकमेवर संस्थेकडून अत्यल्प व्याजदरात कर्जसुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. यामुळे ज्यांना टप्प्याटप्प्याने बचत करून सोने खरेदी करायचे आहे, त्यांच्यासाठी ही एक सुवर्णसंधी ठरत आहे.

या यशाचे श्रेय संजय दळवी विभागीय व्यवस्थापकांच्या कुशल मार्गदर्शनासह विभागातील शाखेचे सर्व शाखा व्यवस्थापक, कर्मचारी व शिपाई यांच्या सांघिक प्रयत्नांना जाते, अशी भावना व्यक्त करण्यात आली. सिल्लोड विभागातील १७ शाखांवर ५ ग्रॅम व १० ग्रॅमचे शुद्ध २४ कॅरेट सोन्याचे नाणे उपलब्ध असून संस्थेच्या जास्तीत जास्त सभासदांनी या कर्ज योजनेचा लाभ घावा, असे आवाहन बँकेने केले आहे.

### चोपडा ओम शांती केंद्रात रक्षाबंधन

**चोपडा :** येथील ओम शांती केंद्रात रक्षाबंधनाचा पावन सण अत्यंत आध्यात्मिक वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन ब्रह्माकुमारी संस्थेतर्फे करण्यात आले.

कार्यक्रमाला अनेक ब्रह्माकुमारी सदस्यांसह शहरातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मंगलवाणीने आणि शांतीदूतांच्या प्रार्थनांनी करण्यात आली. त्यानंतर भाव-बहिणींच्या नात्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. ब्रह्माकुमारी संस्थेच्या दीदींनी प्रासादिक मार्गदर्शनातून रक्षाबंधनाचा खरा अर्थ स्पष्ट केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी चोपडा ओम शांती केंद्राच्या संचालिका मंगला दीदी, सारिका दीदी, करिश्मा दीदी, शीतल दीदी यांनी परिश्रम घेतले.



## चाळीसगावात आदिवासी दिनानिमित्त कविसंमेलन

**तभा वृत्तसेवा**
**चाळीसगाव, ११ ऑगस्ट**

येथील आदिवासी साहित्य अकादमी, एम्प्लॉईज फेडरेशन व कै. हौसाई बहुउद्देशीय विकास मंडळ यांच्यातर्फे ना. ब. वाचनालयात जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने आदिवासी कवी संमेलन घेण्यात आले.

आदिवासी साहित्याचे अभ्यासक तथा माजी गटशिक्षणाधिकारी डी. एम. बहिरम अध्यक्षस्थानी होते. बहिरम यांनी आदिवासी साहित्य हे वैश्विक साहित्य दर्जाचे साहित्य बनू पाहत आहे, असे विचार स्पष्ट केले. प्रास्ताविकामधून आदिवासी साहित्य अकादमीचे अध्यक्ष- साहित्यिक सुनील गायकवाड यांनी आदिवासी साहित्य अकादमीची भूमिका आणि आदिवासी बोली भाषा याबाबत विचार व्यक्त केले.



या कवी संमेलनाचे उद्घाटन शिरपूर येथील अ‍ॅड. समाधान भवरे यांनी केले. तसेच आदिवासी पुस्तक प्रदर्शनचे उद्घाटन त्यांच्या हस्ते सुरवातीला झाले. कवी संमेलनाचे प्रमुख अतिथी डॉ. वाल्मिक अहिरे यांनी आदिवासी साहित्य संकल्पना सांगून ‘रापी नी धार’ कविता सादर केली. कवी दिनेश चव्हाण यांनी ‘एकटाच लढला बिरसा...एकटाच लढला तंट्या मामा’, कवी गौतमकुमार निकम यांची ‘आदिवासी आम्ही आदिवासी’ ही कविता आदिवासी दिवसाचे महत्व सांगून गेली. प्रवीणकुमार यांनी ‘बिरसा’ ही कविता सादर केली, तर मांगीलाल मोरे यांनी ‘मास्तर’, गणेश निकम यांनी ‘जंगल’, तर वेदराज कपाटे यांनी ‘अहिरानी’ कविता सादर केली. यावेळी आदिवासी साहित्य संशोधक संदीप अहिरे यांनी आदिवासी साहित्यिक सुनील गायकवाड यांची साहित्य चिकित्सा मांडली, तर प्रा. संजय पाडवी, प्रा. लक्ष्मण वळवी, मांगीलाल पावरा यांनी आदिवासी दिनाबाबत विस्तृत विवेचन केले.

यावेळी आदिवासी महिला, तरुणांसह आदिवासी समाज बांधव उपस्थित होते. डॉ. प्रसन्ना अहिरे, डॉ. विजय पाटील, श्यााम रोकडे, ठाकूर, पवार, नागने यांनी आदिवासी दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन कवी गौतमकुमार यांनी केले, तर आभार कवी दिनेश चव्हाण यांनी मानले.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### आमदार सुरेश भोळेंतर्फे शिवपुराण कथेच्या समितीस पूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन

**नशिराबाद (ता. जळगाव) :** नवीन तरसोद असोदा बायपास हायवेवरील दूरदर्शन टॉवरजवळ जळगाव येथे ४ ते १० ऑक्टोबर दरम्यान शिव पुराण कथा आयोजित केली आहे. कुंदकेश्वर शिवमहापुराण कथा सेवा समितीचे आयोजक ममता श्रीकांत बोढरे यांनी ७ ऑगस्ट रोजी आमदार सुरेश भोळे यांची कार्यालयात भेट घेतली. यावेळी कथावाचक पंडित प्रदिप मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेच्या बाबतीत संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन, जबाबदारी तसेच कार्यक्रमास सहकार्य करण्याचे आश्वासन आमदार सुरेश भोळे यांनी दिले. यावेळी शिवमहापुराण कथा आयोजक ममता बोढरे माळी, गणेश महाजन, नाना बारी, सुरेश वाघ, प्रवीण पाटील तथा संगीता महाजन उपस्थित होते.



### धानोरा आदिवासी आश्रमशाळेत आदिवासी दिन साजरा

**धानोरा (ता. चोपडा) :** येथील स्व. निखिल एकनाथराव खडसे व बी. एस. महाजन माध्यमिक व प्राथमिक आदिवासी शाळेत जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतच रॅलीचे आयोजन करण्यात आले व आदिवासी पारंपरिक नृत्य, क्रांतिकारक, भारत माता व थोर विचारवंतांच्या वेशभूषा धारण करून विद्यार्थी सहभागी झाले. प्रसंगी बिरसा मुंडा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी रक्षाबंधन कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी सरपंच रज्जाक तडवी होते. उपसरपंच विजय चौधरी, पोलीस पाटील रवींद्र कोळी, विजय भोई, मुख्याध्यापक ए.पी. जाधव, मुख्याध्यापिका वंदना वळवी अधीक्षक दिगंबर भंगाळे, अधीक्षिका नम्रता सूर्यवंशी, शिक्षक हितेंद्र पाटील, मधुकर भोई उपस्थित होते. सूत्रसंचालन शिक्षिका चारुलता जावळे यांनी केले.

### सोयगावात जागतिक आदिवासी दिन साजरा

**सोयगाव :** आदिवासी दिनानिमित्त आदिवासी बांधवांनी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नगरसेवक हर्षल काळे, संदीप सुरडकर, संतोष बोडखे, भगवान जोहरे, राजू माळी, राजेंद्र काळे, राजेंद्र दुतोंडे, कदिर शहा, विवेक महाजन, संदीप चौधरी, शालिक गवळे, भगवान इंगळे, आनंदा इंगळे, चंद्रास बावस्कर, पुंजाजी जाधव, पांडुरंग दांडगे, शिवाजी माळी, खंडू जोहरे, गणेश इंगळे, राजेश सोनवणे, सुनील ठोंबरे, दत्तू आस्वार, शंकर जेठे, संतोष राऊत, गणेश जोहरे, विक्रम इंगळे, सोनू सोनवणे, रघुनाथ बावस्कर, भगवान टोकरे, मंगेश सपकाळ, संजय मोरे, जीवन पाटील, शिवाजी इंगळे यांच्यासह आदिवासी बांधव उपस्थित होते.



### जय महाकाली कलावंत सांस्कृतिक बहुउद्देशिय संस्थेतर्फे रक्षाबंधन साजरे

**जळगाव :** शहरातील वाघ नगर परिसरातील जय महाकाली कलावंत सांस्कृतिक बहुउद्देशिय संस्थेतर्फे रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश नथ्थू अमृतकर यांनी आपली संस्था राबवित असलेले सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम याविषयी माहिती दिली. या उपक्रमाचाच एक म्हणून आज रक्षाबंधन सण सामूहिकपणे साजरी करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यामुळे मुलींनी राखीचा पवित्र धागा बांधून संरक्षणाची हमी मागितली. यावेळी वातावरण भारावले होते. या कार्यक्रमास श्यामनगर, सहजानंद नगरमधील रहिवाशी व जिजामाता हायस्कूलचे मुख्याध्यापक, शिक्षक वर्गाने सहकार्य केले, असे किशोर पाटिल यांनी कळविले आहे.



## बालाजी विद्यालयात ‘हर घर तिरंगा’ मोहीम अंतर्गत रांगोळी स्पर्धा अन् तिरंगा रॅली

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, ११ ऑगस्ट**

येथील श्री बालाजी विद्या प्रबोधिनी मंडळ संचलित प्राथमिक विद्यालयात आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा मोहीम २ ते १५ ऑगस्ट पर्यंत रांगोळी काढणे, सैनिक व पोलीस कर्मचारी यांना राखी पाठवणे तसेच पोलीस व सैनिक यांना उत्कृष्ट कामाबद्दल पत्रलेखन करणे, तिरंगा रॅली इत्यादी स्पर्धा विद्यालयात आयोजित करण्यात आल्या.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यू.एच. करोडपती तर प्रमुख पाहुणे सचिव डॉ.सचिन बडगुजर, संचालक डॉ. चेतन करोडपती, राधिका बडगुजर, मुख्याध्यापक हेमंतकुमार पाटील, प्रदीप भावसार आदी उपस्थित होते. यावेळी इ.२ री ते ७ वीच्या विद्यार्थ्यांनी भारतीय तिरंगा ध्वज घेऊन तिरंगा रॅली काढण्यात आली.

विद्यार्थ्यांनी ‘हर घर तिरंगा,’ ‘वंदे मातरम्,’ ‘भारत माता की जय’ या घोषणांनी परिसर दुमदुमला, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती जागृत झाली व यानंतर रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. त्यात विद्यालयातील ७७ विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. यात प्रमुख आकर्षण विद्यार्थिनींनी अतिशय सुंदर ऑपरेशन सिंदूर, तिरंगा इ. विविध प्रकारची रांगोळी काढून विद्यार्थ्यांना व पालकांना आकर्षित केले. यात गटानुसार प्रथम, द्वितीय, तृतीय निवड करण्यात आली. त्यात इयत्ता ५ वी तून जिज्ञासा जैन, ईशा बोरसे, कल्याणी नेरपगार, लावण्या भावसार. इयत्ता ६ वी तून खुशी पाटील, सृष्टी चौधरी, प्रणाली म हाजन, भाविका माळी तर इयत्ता ७ वी तून स्नेहल बागड, अवनी साळी, माधुरी चौधरी, आरोही अमृतकर या विद्यार्थिनींनी यश संपादन केले. तसेच पोलीस व सैनिक यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना टपाल मार्फत मिळणाऱ्या पत्राद्वारे पत्र लेखन केले.

विविध स्पर्धेत विजयी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन संस्थापक अध्यक्ष यू.एच.करोडपती, सचिव डॉ.सचिन बडगुजर, संचालक डॉ. चेतन करोडपती व संचालक मंडळ व शिक्षक वृंद यांनी केले. समिती प्रमुख अर्चना भावसार, प्रमोदिनी शिंदे, योगेश पवार, प्राजक्त जोशी, प्रशांत घोडसे यांनी नियोजन केले यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंद यांनी परिश्रम घेतले.



## महत्त्वाचे

### पाळधी येथे सिद्धी महागणपती मंदिर आज दिवसभर खुले

**जळगाव** : मंगळवारी (१२ ऑगस्ट) अंगारिका चतुर्थी आहे. यानिमित्ताने पाळधी येथील सिद्धी महागणपती मंदिरात पहाटे अडीच वाजेच्या सुमारस महाभिषेक होईल. तसेच सर्व भाविकांसाठी दर्शन खुले केले जाईल. मंदिरावर रोषणाई करण्यात आली आहे. भाविकांची गर्दी लक्षात घेता देवस्थानाकडून विविध व्यवस्था उपलब्ध केल्या आहेत. दिवसभर अथर्वशीर्षाचे निरंतर पठण केले जाईल. अभिषेक, संकल्प आणि पूजेची व्यवस्था दिवसभर उपलब्ध असणार आहे. याशिवाय विविध स्टॉल्स लागणार आहेत. पिण्याच्या पाण्यासह पार्किंगची व्यवस्था केली आहे. भाविकांसाठी साबुदाणा खिचडीचा प्रसाद वाटप केला जाणार आहे, अशी माहिती श्री सिद्धी महागणपती मंदिर देवस्थान पाळधी यांनी दिली आहे.

### आयएमएतर्फे बुधवारी अवयवदात्यांचा गौरव

**जळगाव** : येथील आयएमए जळगावतर्फे बुधवार १३ रोजी दुपारी ३ वाजता व.वा. वाचनालयाजवळील आयएमए हॉल येथे जागतिक अवयवदान दिनानिमित्त अवयवदात्यांचा गौरव करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात सर्व धर्माचे धर्मगुरू एकाच व्यासपीठावर उपस्थित राहून अवयवदानाच्या पवित्र कार्यामुळे गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते याबद्दलचे महत्त्व सांगणार आहेत. अवयवदानाबद्दल जनजागृती व्हावी, सर्वसामान्य नागरिकांना यातून प्रेरणा मिळावी, समाजाला नवी दिशा मिळावी म्हणून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष डॉ. शशिकांत गाजरे, सचिव डॉ. भरत बोरोले यांनी दिली. सर्व नागरिकांसाठी हा कार्यक्रम विनामूल्य व प्रवेश खुला आहे. मोठ्या संख्येने उपस्थिती द्यावी असे आयएमए तर्फे आवाहन करण्यात आले आहे.

### मुलांना पतीच्या ताब्यात देत पत्नी बेपत्ता

**जळगाव** : पती सोबत नांदण्यासाठी समझोता करण्यासाठी २२ वर्षीय विवाहिता तिच्या दोन मुलांना सोबत घेत जळगाव येथे आली. दोन्ही मुलांना पतीच्या स्वाधीन करत मी पाणी पिण्यासाठी जावुन येते, असे सांगुन निघुन गेली. त्यानंतर बेपत्ता झाली. ही घटना रविवारी (३ ऑगस्ट) दुपारी एक वाजेच्या सुमरास शहरात एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. पतीने सर्वत्र शोध घेतला असता पत्नीचा तपास लागला नाही. या प्रकरणी तक्रारीनुसार रविवारी (१० ऑगस्ट) एमआयडीसी पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल करण्यात आली. हवालदार हेमंत जाधव तपास करीत आहेत.

### धावत्या रेल्वेखाली अनोळखीचा मृत्यू

**जळगाव** : धावत्या रेल्वेखाली ४० वर्षीय अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला.सोमवारी (११ ऑगस्ट) कोल्हे हिल्स परिसरात रेल्वे लाईनवर ही घटना घडली. तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविला. या प्रकरणी पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.



राष्ट्रपती नियुक्त खासदार अ‍ॅड. उज्ज्वल निकम यांचा गुष्पगुच्छ देवून सत्कार करताना जळगावचे 'पोलीस मित्र' अनिल वर्मा.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९

**अंकासाठी संपर्क**

'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९८३४७४५४२२
९६२३६०४७१२

# जळगावात उबाठाने काढली सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची मागणी : कलंकीत मंत्र्यांचे घ्या राजीनामे : पूर्तता न झाल्यास मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑगस्ट**

गेल्या २१ दिवसांपासून जिल्ह्यात पाऊस नाही. त्यामुळे खरीप हंगामातील पीके करपू लागली असून शेतकरी हतबल झाला आहे. मंत्री सभागृहात रमी खेळतात. सरकारला लाज नाही, असे म्हणत सोमवारी (११ ऑगस्ट) उद्धव ठाकरे बाळासाहेब शिवसेनेतर्फे येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महाराष्ट्र जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. शहरातून सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढुन निषेध केला. शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी आणि कलंकित मंत्र्यांनी राजीनामे द्यावेत, अशी जोरदार मागण्या शिवसैनिकांनी करत परिसर दणाणला.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा जी.एस. ग्राऊंड येथून दुपारी शिवसेनेच्या जनआक्रोश आंदोलनासाठी शिवसैनिक, महिला जमल्या. त्यानंतर आंदोलनास सुरुवात झाली. या आंदोलनाचे नेतृत्व शिवसेना संपर्कप्रमुख तथा उपनेते संजय सावंत यांनी केले.

माजी खासदार उन्मेष पाटील, जिल्हा संघटक करण पवार, संपर्क प्रमुख गुलाबराव वाघ, जिल्हाप्रमुख कुलभूषण पाटील, दीपक राजपूत, महानगर प्रमुख शरद तायडे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख महानंदा पाटील, महिला आघाडी महानगरप्रमुख मनिषा पाटील, उपमहानगरप्रमुख नेता सांगोळे, अल्पसंख्यांक आघाडी महानगरप्रमुख जहीर पठाण, उपजिल्हाप्रमुख भाऊसाहेब सोनवणे, उपमहानगरप्रमुख गणेश गायकवाड, मानसिंग सोनवणे, कुसुंबा उपसरपंच प्रमोद घुगे, धरणगाव माजी नगराध्यक्ष तथा जिल्हाप्रमुख नीलेश चौधरी, फिरोज पठाण, शोएब खाटीक, किरण भावसार, नीलेश ठाकरे, बाळा कंखरे, विजय बांदल, विजय राठोड, जैनुद्दीन शेख, लखन सांगळे, संजय सांगळे, शरीफ रंगरेज, कलीम खान, पप्पू तायडे, राकेश माळी, बिरजू शिरसाठ, शरद पाटील, गोलू पाराये, राहुल खवडे, भगवान धनगर, गुलाबराव कांबळे, सचिन चौधरी, छगन खडसे, योगेश पाटील, डॉ. रमाकांत कदम, लोटन सोनवणे, प्रभाकर कोळी, योगेश चौधरी, आबा कोळी, राकेश घुगे, विनायक धर्माधिकारी, राजू जगताप, भीमराव पांडव आदींसह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने सामील झाले होते.

शिवसैनिकांच्या जनआक्रोश आंदोलनात अग्रभागी ट्रॅक्टरच्या ट्रॉलीत प्रतिकात्मक स्वरुपात सरकारवर ताशेरे ओढले होते. यात कलंकित प्रतिकात्मक मंत्र्यांच्या गळ्यात नोटा, एकाच्या गळ्यात नोटांची बॅग, छमछम, जुगाराचा खेळ इत्यादी अवैध प्रकाराकडे लक्ष वेधले होते. त्यापाठोपाठ सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा होती. त्यानंतर त्यामागे शिवसैनिक घोषणा देत चालत होते.

**जुगाराचा डाव मांडत निषेध**

शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पत्त्यांचा डाव मांडत कृषी मंत्र्यांच्या सभागृहातील वर्तनाचा तीव्र निषेध केला.

**३८ लाख बहिणींचे अनुदान केले बंद- उन्मेष पाटील**

जेव्हा सरकारवर अकुंश राहत नाही, तेव्हा विरोधाची भूमिका घेतली पाहिजे, त्यानुसार शिवसेनेने आज विरोधात पाऊल उचलले. शेतकरी देशाचा कणा समजला जातो. मात्र कृषिमंत्री सभागृहात रमी खेळत असेल तर सरकारला लाज वाटली पाहिजे. वापरा आणि फेका, अशी या सरकारची निती आहे, असा आरोप करत माजी खासदार उन्मेष पाटील म्हणाले की, ३८ लाख बहिणींचे अनुदान बंद करण्याचे पाप या सरकारने केले आहे. जिल्ह्यात २१ दिवसांपासून पाऊस नाही. त्यामुळे उडीद, मूग, सोयाबीन, मका करपतो आहे. शेतकरी चिंतातूर आहे. जिल्ह्यात चार मंत्री मात्र कोणीच फिरकले नाहीत. शेतकऱ्यांसाठी आवाज उठवावा लागेल. स्वराज्य संस्था निवडणुकीत जिल्ह्यात दूध का दूध पाणी का पाणी होईल, ही भिती राज्यकर्त्यांना सतावतेय, असा चिमटादेखील त्यांनी काढला.

यावेळी करण पवार, जिल्हाप्रमुख कुलभूषण पाटील, दीपक राजपूत, उपनेते गुलाबराव वाघ आदिंनी मनोगते व्यक्त केली. उपमहानगरप्रमुख प्रशांत सुरळकर यांनी सूत्रसंचालन तर उमेश चौधरी यांनी आभार मानले.

**चोख बंदोबस्त**

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शिवाजी महाराज पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत ठिकठिकाणी बंदोबस्त तैनात केला होता. वाहतूक शाखेचे पोलीस अधिकारी, जिल्हापेठ इत्यादी कर्मचारी सहभागी होते. उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत हे परिस्थितीवर लक्ष ठेवून होते.



- छाया -
सुमित देशमुख

### ५० 'खोके' होऊ द्या 'मोके'

आंदोलनात शिवसैनिक सरकारच्या निषेधार्थ गगनभेदी घोषणा देत होते. त्यात '५० खोके ... होऊ द्या मोके...,' 'शेती विका.. रमी खेळा..,' 'कलंकित मंत्र्यांचा राजीनामा झालाच पाहिजे,' 'या सरकारचे करायचे काय... खाली डोके वरती पाय...,' 'शेती सोडा...रमी खेळा...' या घोषणांनी लक्ष वेधले. ट्रॅक्टरवर छम छम... अवैध धंदे, जुगार रमीचे बॅनर झळकविले होते.

### प्रतिकात्मक अंत्यविधीत गोंधळ

जिल्हाधिकारी कचेरीसमोर व्यासपीठ उभारण्यात आले होते. नेत्यांची भाषणे आटोपल्यानंतर सरकारच्या प्रतिकात्मक प्रेताला अग्निडाग देण्याची जोरदार तयारी शिवसैनिकांनी केली. त्यापूर्वी पोलिसांनी धाव घेत शिवसैनिकांना रोखण्याचा प्रयत्न केला. यावेळी अन्य अधिकाऱ्यांसह पोलीस व्यासपीठाकडे धावुन आले. शिवसैनिकही पुढे सरसावले. त्यानंतर गोंधळ झाला. पोलिसांना धक्काबुक्की झाली. या गोंधळातच अंत्यविधी आटोपण्यात आला.

### जळगावचा लौकीक घालवला -संजय सावंत

सुरेशदादा जैन यांनी जळगावचा नावलौकीक उच्चस्थानी नेला. आज मात्र लाज वाटते, असे प्रतिनिधी आम्ही निवडून दिले. उंचीवर नेलेल्या या शहराचा लौकीक या लोकप्रतिनिधींनी मातीत नेण्याचे काम केले, अशा शब्दात उपनेते संजय सावंत यांनी जिल्ह्यातील मंत्र्यांचा समाचार घेतला. ते म्हणाले, ''आम्ही सुरेशदादा यांचा वसा घेऊन वाटचाल करू. जिल्ह्यात ११ आमदार आहेत. परंतु जिल्ह्यात ४० हजार कोटींचा विकास दिसतो का? चार मंत्री, प्रत्येकाला ३० हजार कोटी निधी वापरण्याचा अधिकार, परंतु भ्रष्टाचाराची सुरुवात येथून केली. सीमा ओलांडली त्यांनी. संजय गांधी निराधार योजनेचे पैसे रोखले. रक्षा बंधनाचे खोटे लिफाफे वाटले, असा आरोप त्यांनी केला. भ्रष्ट मंत्र्यांनी राजीनामे दिले नाही तर शिवसेना रस्त्यावर उतरेल, असा इशाराही दिला.

# प्रतिभा शिंदेंचा काँग्रेस प्रदेश उपाध्यक्षपदाचा राजीनामा

## अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश करणार -शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑगस्ट**



विधानसभेच्या निवडणुकीतील दारूण पराभवानंतर डॅमेज कंट्रोलसाठी काँग्रेसने प्रदेश कार्यकारिणीवर जिल्ह्यातील सात जणांची नुकतीच नियुक्ती केली. यात दुसऱ्यांदा प्रदेश उपाध्यक्षपदाची संधी मिळालेल्या प्रतिभा शिंदे यांनी सोमवारी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा देऊन काँग्रेसला रामराम ठोकला आहे.

तापी-नर्मदा नद्यांच्या खोऱ्यात तसेच सातपुडा पर्वतरांगांमध्ये वास्तव्यास असलेल्या आदिवासी, दलित, बहुजन आणि अल्पसंख्यांकांच्या न्याय हक्कांसाठी गेली २५ वर्षे लोकसंघर्ष मोर्चाच्या माध्यमातून प्रतिभा शिंदे यांचा लढा सुरूच आहे. लढवय्या स्वभाव असलेल्या शिंदे महाविद्यालयीन जीवनापासूनच अनेक सामाजिक चळवळीशी जोडल्या गेलेल्या आदिवासींसह इतर वंचितांचे प्रश्न सोडविण्यासाठी दोन वर्षांपूर्वी प्रतिभा शिंदे यांनी राहुल गांधी यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. त्यांच्यातील नेतृत्व गुण लक्षात घेऊन काँग्रेसने नंतर त्यांच्याकडे प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारीसुद्धा सोपवली होती. पक्षाने दिलेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करून त्यांनी दरम्यानच्या काळात आलेल्या लोकसभेसह विधानसभेच्या निवडणुकांमध्ये केवळ काँग्रेसच नाही तर महाविकास आघाडीचे घटक पक्ष शरद पवार आणि ठाकरे गट यांच्याही उमेदवारांचा प्रचार केला. ठिकठिकाणी सभा गाजवून महायुतीवर जोरदार टीका केली. याची दखल घेत काँग्रेसने दुसऱ्यांदा त्यांना प्रदेशवर संधी दिली. मात्र अवघ्या आठच दिवसात प्रतिभा शिंदे यांनी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याने काँग्रेसमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

**महायुतीत सहभागी होणार**

पुरोगामी विचारांच्या असलेल्या प्रतिभा शिंदे ह्यांनी भाजपावर चांगलेच तोंडसुख घेतले आहे. लोकसभा व विधानसभा निवडणूक काळातदेखील त्यांनी महायुतीवर सडकून टीका केल्या. तसेच सोशल मीडियावरदेखील भाजपाविरोधात अनेकवेळा त्या भूमिका घेताना दिसतात. मात्र आता अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत त्या प्रवेश करणार असल्याच्या माहितीला त्यांनी दुजोरा दिला असून महायुतीत प्रतिभा शिंदे सहभागी होणार याविषयी जोरदार चर्चा होत आहे.

**राजीनाम्याबाबत माहिती नाही**

प्रतिभा शिंदे यांच्या राजीनाम्याबाबत कुठलीही माहिती नाही. प्रदेशकडून तसे काही कळविण्यात आले नाही. त्यामुळे अधिक माहिती नाही.
- प्रदीप पवार,
जिल्हाध्यक्ष काँग्रेस.

# गोदावरी लक्ष्मी को-ऑप बँकेतर्फे सभासदांना १० टक्के लाभांश

### २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व विषय मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑगस्ट**

येथील गोदावरी लक्ष्मी को-ऑप बँकेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन डॉ. उल्हास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या सभेत सभासदांना १० टक्के लाभांश देण्याची घोषणा डॉ. उल्हास पाटील यांनी केली.

गोदावरी लक्ष्मी को-ऑप बँक लि.,बँकेची पंचविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी १० रोजी सकाळी ९.३० वाजता सरदार वल्लभभाई पटेल लेवा भवन, पार पडली. अध्यक्षस्थानी बँकेचे चेअरमन डॉ. उल्हास पाटील हे होते. व्हा. चेअरमन श्री. सोनु गोमा भंगाळे व संचालक मंडळ सदस्य सुभाष पाटील, सुरेश झोपे, शालीग्राम चौधरी, सुनिल महाले, डॉ. चंद्रसिंग पवार, डॉ. संपत वानखेडे, हरिष फालक, राजेंद्र कुरकुरे, राजेंद्र महाजन, चंद्रकुमार चौधरी, लिलाधर चौधरी, यमुनाबाई महाजन व व्यवस्थापकीय संचालक अशोक महाजन उपस्थित होते. सभेत नऊ विषय सर्वानुमते मंजुर झाले. यंदाही बँकेचा एन.पी. ए शून्य टक्के आहे. त्यामुळे सभासदांना लाभांश जाहीर करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते बँकेच्या सभासदांच्या पाल्यांचा सत्कार करण्यात आला. जिल्हा सहकार बोर्डातर्फे सभासदांना प्रशिक्षण डी. आर. पाटील यांनी दिले. सूत्रसंचालन अशोक महाजन यांनी तर आभार सुरेश झोपे यांनी मानले.





# हनी ट्रॅपविरोधात राष्ट्रवादी शरद पवार गट आक्रमक

**जळगाव** : हनी ट्रॅपप्रकरणी सोमवारी (११ ऑगस्ट) आकाशवाणी चौकात राष्ट्रवादी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे तीव्र आंदोलन करण्यात आले. मंत्री गिरीश महाजन यांच्या व्यंगात्मक बॅनरवर जोडे मारुन कार्यकर्त्यांनी धिक्कार केला. हनी ट्रॅप प्रकरणात प्रफुल्ल लोढाची नार्कोटेस्ट झालीच पाहिजे, राष्ट्रवादी शरद पवार गटाने यावेळी अशी मागणी केली. मंत्री गिरीश महाजन यांच्या वरोधात हातात फलक घेऊन जोरदार विविध घोषणा दिल्या. याप्रसंगी या आंदोलनात अशोक लाडवंजारी, रामदास पाटील, सुनील माळी, राजू माळी, गणेश पाटील, किशोर गायकवाड, बबलू सापदारे, किरण राजपूत, नवीन खाटी, नंदू भाऊ हीरोळे, बापू ससाने, डॉ. अभिषेक ठाकूर, संदीप जावळे, प्रशांत भालशंकर, संजय कोळी, जाफर भाई शेख, सतीश पाटील, प्रदीप बडगुजर, अजय पाटील, जगदीश कोळी, अमित वाणी, रोहन महाजन,राजू मोरे, इब्राहिम तडवी, आकाश हिवाळे, चेतन पवार, एजाज खान, भिला तडवी, समाधान वाघ, संतोष मोरे, गणेश पाटील, रफिक पटेल आदींची उपस्थिती होती.



# शहरात श्वान निर्बिजीकरण केंद्राचा शुभारंभ

## भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरणासह लसीकरण होणार



**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑगस्ट**

शहरातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्याचे काम मुंबईच्या उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशनला देण्यात आले असून निर्बिजीकरण केंद्र व प्राणी रूग्णवाहिका सेवेचा आमदार सुरेश भोळे यांच्या हस्ते सोमवारी शुभारंभ करण्यात आला.

जळगाव शहर महानगरपालिका आणि उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशन (प्राणी कल्याण मोहीम) यांच्या संयुक्त विद्यमाने आज श्वान निर्बिजीकरण केंद्र तसेच प्राणी रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सुरेश भोळे आणि उत्कर्ष ग्लोबल फाऊंडेशनचे संस्थापक अ‍ॅड. दगडू लोंढे, आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त उदय पाटील उपस्थित होते. जुने टी. बी. हॉस्पिटल, मेहरूण रोड, आदर्श नगर येथे सुरू झालेल्या या केंद्रामुळे शहरातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण, लसीकरण आणि पुनर्वसनाची प्रक्रिया अधिक वेगाने होणार आहे. तसेच, नव्याने सुरू झालेल्या प्राणी रुग्णवाहिका सेवेमुळे जखमी, आजारी किंवा अपघातग्रस्त प्राण्यांना तातडीने वैद्यकीय मदत मिळणार आहे.

उद्घाटन प्रसंगी आमदार भोळे यांनी सांगितले की, ''श्वान निर्बिजीकरण केंद्र आणि प्राणी रुग्णवाहिका सेवा या उपक्रमांमुळे जळगावातील भटक्या प्राण्यांच्या समस्येवर मोठा परिणाम होईल आणि नागरिकांसोबतच प्राण्यांच्या सुरक्षिततेतही वाढ होईल. महापालिका आणि सामाजिक संस्थांच्या सहकार्याने अशा उपक्रमांना गती मिळावी असेही ते म्हणाले.

# पर्यावरण पूरक उत्सव फक्त हिंदूसाठीच का?

## गणेश महामंडळाचे अध्यक्ष सचिन नारळेंचा प्रशासनाला खडा सवाल



**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑगस्ट**

गणपती उत्सव आला की शहरातील अनेक पर्यावरण प्रेमी जागे होतात. वर्षभर याबाबत कुठलीही अंमलबजावणी होत नाही. सामाजिक भान जपत असताना पर्यावरण पूरक उत्सव फक्त हिंदूसाठीच का? असा खडा सवाल सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाचे अध्यक्ष सचिन नारळे यांनी मनपा प्रशासनाला एका बैठकीत उपस्थित केला. दरम्यान, विसर्जनासाठी कृत्रिम तलावाला कडाडून विरोध करीत बहिष्काराचाही इशारा अधिकाऱ्यांना दिला.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांची बैठक सोमवारी महापालिकेच्या सभागृहात पार पडली. या बैठकीला आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, अतिरिक्त आयुक्त निर्मला गायकवाड, उपायुक्त पंकज गोसावी, शहर अभियंता योगेश बोरोले, सार्वजनिक गणेश महामंडळाचे अध्यक्ष सचिन नारळे, नगररचना विभागाचे सहायक संचालक जितेंद्र महाले, प्रशासन अधिकारी खलील शेख उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक शहर अभियंता योगेश बोरोले यांनी केले. तसेच उपायुक्त पंकज गोसावी यांनी पीपीटीच्या माध्यमातून शहरात साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवासंबंधीच्या सूचना मांडल्या. त्यात पीओपीच्या मुर्त्यांवर पाठीमागे लाल वर्तुळ करणे बंधनकारक असून विक्रीचे रजीस्टर विक्रेत्याला ठेवावे लागणार असल्याचे सांगितले. तसेच गणेश मंडळांना आवश्यक असलेल्या परवानग्यांसाठी एक खिडकी योजना असे विषय मांडण्यात आले. बैठकीचे सूत्रसंचालन जान्हवी देसले यांनी केले. तर आभार पर्यावरण विभागाचे शाखा अभियंता प्रकाश पाटील यांनी मानले.

**मेहरूण तलावातील सांडपाण्याच्या प्रश्न ऐरणीवर**

मेहरूण तलावात सांडपाणी सोडले जात असल्याने गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मनपा प्रशासनाविरूध्द संताप व्यक्त केला. दरवर्षी केवळ तात्पुरती उपाययोजना करून ते काम सोडून दिले जाते. त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली.

**कलाशिक्षक शाळांमध्ये जाणार**

विद्यार्थ्यांना शाळांमध्ये गणपतीची मूर्ती तयार करण्यासाठी शहरातील विविध कलाशिक्षक शाळांमध्ये जाऊन कार्यशाळा घेणार आहेत.

### गणेश मंडळांना ठोकू नका

जळगावच्या सार्वजनिक गणेशोत्सवाची दखल राज्याने घेतली आहे. त्यामुळे मनपा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी या उत्सवाला उगाच पर्यावरण पूरकच्या नावाखाली बदनाम करू नये, असा इशारा देत उगाच शासकीय व्यासपीठावरून गणेश मंडळांना ठोकू नका, असे सचिन नारळे यांनी सांगितले. मूर्ती संकलन केंद्रासाठी गणेश महामंडळाचे कार्यकर्ते महापालिकेला सहकार्य करतील, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.



### गणेशोत्सवापूर्वी सर्व समस्या सोडविणार -आयुक्त

जळगाव शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवाचे मोठे नाव राहिले आहे. पहिल्या वर्षी जळगावात आलो तेव्हा तक्रारींचा भडीमार होता. यंदा काही तक्रारी आहेत. रस्त्यांवरील खड्डे, लोंबकळणाऱ्या विद्युत तारा आणि झाडांच्या फांद्या या सर्व समस्या गणेशोत्सवापूर्वीच सोडविणार असल्याची ग्वाही आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी दिली

### कृत्रिम तलावाला कडाडून विरोध

गतकाळात शहरात गणेश मूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम तलाव करण्यात आले होते. मात्र या तलावात मूर्तींचे विसर्जन न झाल्याने हा प्रयोग अयशस्वी ठरला होता. यंदाही पीपीटीच्या माध्यमातून कृत्रिम तलावाची संकल्पना मांडण्यात आली. मात्र त्यास सचिन नारळे यांनी कडाडून विरोध केला. अतिरिक्त आयुक्त निर्मला गायकवाड यांनीही हाच मुद्दा मांडत असताना सचिन नारळे यांनी 'मॅडम पुन्हा कृत्रिम तलावाचा मुद्दा काढू नका, अन्यथा आम्ही बहिष्कार टाकू' असा आक्रमक पावित्रा घेतला. त्यामुळे प्रशासनाने याबाबत एक पाऊल मागे घेत प्रभागनिहाय मूर्ती संकलन केंद्र उभारण्याचा निर्णय घेतला.

## थोडक्यात महत्त्वाचे....



### असोदा येथील विद्यालयात राख्यांचे प्रदर्शन

**जळगाव** : असोदा (ता. जळगाव) येथील सार्वजनिक विद्यालयात रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात झाला. यानिमित्त राख्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले. सर्वोदय एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अनिल महाजन अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी बनवून आणलेल्या राख्यांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे सचिव विलास चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी रिक्षाचालक प्रवीण बऱ्हाटे, युवराज सपकाळे, देवानंद भालेराव, शेतकरी किशोर नारखेडे, सफाई कर्मचारी गणेश म्हस्के यांना शाळेत आमंत्रित करून विद्यार्थिनींनी त्यांना राख्या बांधल्या, तसेच विद्यार्थिनींनी झाडांनाही राख्या बांधून झाडांच्या संरक्षणाची शपथ घेतली. कार्यक्रमाला संस्थेचे सचिव विलास चौधरी, मुख्याध्यापक डॉ. मिलिंद बागूल ज्येष्ठ शिक्षिका मंगला नारखेडे, पर्यावरणप्रमुख गोपाळ महाजन, शुभांगिनी महाजन, भावना चौधरी महाजन व शिक्षक उपस्थित होते. कविता भोळे यांनी सूत्रसंचालन केले. इंटरॅक्ट क्लबच्या अध्यक्षा मोहिनी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. मीनाक्षी कोल्हे यांनी आभार मानले.




### वृक्षांना राख्या बांधून संवर्धनासह एकात्मतेचा संदेश

**जळगाव** : येथील पवन चॅरिटेबल ट्रस्ट संस्थेतर्फे रक्षाबंधनानिमित्त वृक्षांचे रक्षण होण्यासाठी तसेच समाजात सलोख्याचे संबंध कसे राहतील, याबाबत समन्वय साधून राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रबोधन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. विलास नारखेडे यांनी, राष्ट्रीय एकात्मता कशी टिकून राहील, तसेच आपल्या देशाला एकता राहील, याबाबत प्रबोधन केले पाहिजे, असे मत व्यक्त केले. यावेळी विविध वृक्षांना राख्या बांधण्यात आल्या. सामाजिक वनीकरणाचे समाधान सोनवणे, अमोल ढोबळे, संभाजी पाटील यांनी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व विशद केले. सचिव रघुनाथ राणे यांनी राष्ट्रीय एकात्मता व रक्षाबंधनाच्या संबंधाविषयी अनेक बाबी सांगितल्या. उपक्रमात डॉ. विलास नारखेडे, लीलाधर नारखेडे, राजेश वाणी, पवन नारखेडे, संतोष पाटील, जगदीश कुमार, ॲड. सलीम शेख, विशाल सोनवणे आदी उपस्थित होते.

### गोमाता प्रवचन पायी पदयात्रा, रथ आज बांभोरी येथील मंदिरात येणार

**जळगाव** : श्री संत गजानन महाराज मंदिर बांभोरी येथे दि. १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता गोमाता प्रवचन पायी पदयात्रा व रथ येणार आहे. २१ वर्षांचे जगदीश गोपाल महाराज यांच्या प्रेरणेतून गो पर्यावरण जागरूकता पदयात्रा मंदिरावर येणार आहे. सर्व भक्तांनी गौमहिमा व गौकथा श्रवणाचा लाभ घ्यावा. आपल्या जीवनात गौमातेचे किती महत्त्व आहे व किती फायदे आहेत, हे आपल्याला गौकथेतून सांगणार आहेत. मुला-मुलींच्या विवाहाला अडथळे येतात. धनप्राप्तीचे उपाय, विविध रोगांवर उपचार, स्वर्गात श्रेष्ठ लोक किंवा मोक्षमुक्तीचे सगळ्यात सोपे साधन कोणते या मार्गावर उपाय सांगणार आहेत. गोमाता पायी दिंडी रथयात्रा सकाळी ११ वाजता बांभोरी गजानन महाराज मंदिरावर येई. सर्व भाविकांनी अवश्य लाभ घ्यावा, असे देवाचार्य हभप अण्णा महाराज पाटील यांनी कळविले आहे.



### सोहम् योगतर्फे ॲक्युप्रेशर क्रॅश कोर्स उपक्रम

**जळगाव** : मू. जे. महाविद्यालयाचे सोहम् डिपार्टमेंट ऑफ योग अँड नॅचरोपॅथी आणि श्री साई समर्थ एज्युकेशनल मेडिकल अँड रिसर्च सेंटरचे पराग कुलकर्णी ॲक्युप्रेशर ट्रिटमेंट सेंटर (नागपूर) यांच्यातर्फे ॲक्युप्रेशर क्रॅश कोर्स उपक्रम सोहम् योग विभागात ४ ते १० ऑगस्टदरम्यान घेण्यात आला. समारोपीय कार्यक्रम १० ऑगस्टला उत्साहात झाला. प्रमुख अतिथी केसीई सोसायटीच्या शैक्षणिक संचालक डॉ. मृणालिनी फडणवीस, डॉ. पराग कुळकर्णी, डॉ. देवानंद सोनार, भवतीक जोशी आदी उपस्थित होते. कोर्समध्ये ४० महिला- पुरुषांनी सहभाग नोंदविला. समारोपप्रसंगी सहभागींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. प्राचार्य संजय भारंबे, प्रा. मृणालिनी फडणवीस यांचे मार्गदर्शन व योगदान लाभले. प्रा. ज्योती वाघ यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. पंकज खाजबागे, प्रा. श्रद्धा व्यास, स्वप्नाली महाले, राहुल खरात, आयुष तोतला, एमए योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.




### मू. जे. महाविद्यालयात इंग्लिश क्लबचे उद्घाटन

**जळगाव** : खानदेश एज्युकेशन सोसायटीच्या मू. जे. (स्वायत्त) महाविद्यालयात इंग्लिश क्लब उपक्रमाचे उद्घाटन उत्साहात झाले. कार्यक्रमात इंग्रजी प्रमुख विषय म्हणून निवडलेल्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. इंग्रजी विभागप्रमुख व मानव विद्याशाखेचे प्रमुख प्रा. डॉ. भूपेंद्र केसूर अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे उद्घाटन एसएनडीटी महिला महाविद्यालयातील प्रा. डॉ. सोमनाथ लोकरे यांच्या हस्ते झाले. इंग्लिश क्लबचे उद्देश व महत्त्व यावर प्रा. डॉ. अनिल क्षीरसागर यांनी प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. सोमनाथ लोकरे यांनी इंग्रजी भाषेचे शैक्षणिक व व्यावसायिक महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमात इंग्रजी विषयात नेट जेआरफ परीक्षा उत्तीर्ण झालेली कोमल रायसिंघानी हिचा सत्कार करण्यात आला. प्रा. डॉ. पंडितराव चव्हाण, प्रा. डॉ. योगिनी राजपूत यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. प्रा. कमलाकर रुगे, प्रा. हर्षल साळुंखे यांचे तांत्रिक सहकार्य लाभले. प्रा. प्रज्ञा दुग्गड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. ज्योती लेकुळे यांनी आभार मानले. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी प्रासंगिक खेळ घेण्यात आले.

# स्वस्त धान्य योजनेचा गैरवापर

## शोध मोहिमेंतर्गत हजाराहून अधिक शिधापत्रिकाधारक अपात्र

**जळगाव, ११ ऑगस्ट**

शासनाच्या स्वस्त धान्य दुकानांतर्गत मिळणाऱ्या धान्य योजनेचा गैरवापर होत आहे. तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही चारचाकी वाहनधारक, उत्पन्न करपात्र, सरकारी नोकरदार व्यक्ती अंत्योदय वा प्राधान्य कुटुंब योजनेंतर्गत मिळणाऱ्या मोफत, अल्प दरात अन्नधान्याचा लाभ घेत आहेत. गरजू, पात्र कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळेल या उद्देशाने अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेत धान्य लाभ बंद करण्याची मोहीम पुरवठा विभागाकडून राबविली जात असून आतापर्यंत अकराशेहून अधिक शिधापत्रिका अपात्र असल्याचे आढळून आले आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या अन्न नागरी पुरवठा विभागांतर्गत अंत्योदय व प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजनेव्दारा अल्प उत्पन्न गट कुटुंबाना स्वस्त धान्य दुकानातून मोफत तसेच सवलतीच्या दरात अन्नधान्य दिले जात आहे. शासनाच्या मोफत अन्नधान्य योजने अंतर्गत दारासमोर चारचाकी वाहनधारक, आयकर पात्र वा कर भरणाऱ्या व्यक्ती, सरकारी नोकरदार असलेल्या अनेक व्यक्ती आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही अंत्योदय व केशरी शिधापत्रिकांवरील मोफत, सवलतीच्या दरात मिळणाऱ्या अन्नधान्य योजनेचा लाभ



घेत असल्याचे समोर आले आहे.

**अपात्र लाभार्थ्यांचे रेशन बंद होणार**

ज्यांच्या नावावर चारचाकी वाहन आहे, केंद्र किंवा राज्य सरकारच्या नोकरीत असलेले कर्मचारी आणि ज्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा अधिक असून जे नियमित आयकर भरतात, अशा अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेत अशा शिधापत्रिकाधारकांचा लाभ बंद करण्याची मोहीम पुरवठा विभागांतर्गत हाती घेण्यात आली आहे. या कारवाईमुळे केवळ गरजू आणि पात्र कुटुंबांनाच या योजनेचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा आहे.

**डाटा जुळविताना होतेय प्रचंड दमछाक**

केशरी वा अंत्योदय शिधापत्रिकाधारकांच्या कार्डवरील माहिती जुनी असून ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात आलेली नाही. त्यामुळे कुटुंबातील सदस्यांची संख्या किंवा उत्पन्न अचूक दिसत नाही. काही शिधापत्रिका आधार कार्डशी जोडलेले नाहीत, त्यामुळे विविध सरकारी विभागांच्या डेटाबेसमध्ये माहिती जुळवताना अडचणी येत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

> अपात्र शिधापत्रिकाधारकांचा धान्य लाभ बंद करण्याची प्रक्रिया वेळोवेळी अद्ययावत केली जात आहे. त्यामुळे अपात्र शिधापत्रिकाधारकांनी स्वतः हून पुढाकार घेत लाभ नाकारल्यास प्रशासनास मदत होईल.
> **- रुपेश विजेवार,**
> **जिल्हा पुरवठा अधिकारी.**

**जिल्ह्यात २७ लाख लाभार्थी सदस्य, अन्नधान्यासह या सुविधा**

जिल्ह्यात अंत्योदय, केशरी, प्राधान्य कुटुंब लाभासह सर्वच संवर्गातील २७ लाखांवर शिधापत्रिकांवर लाभधारक आहेत. शिधापत्रिकेवर प्रति सदस्य दरमहा ५ किलो धान्य (२ किलो गहू आणि ३ किलो तांदूळ) मोफत दिले जाते. तसेच पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना आणि इतर शासकीय योजनांचा लाभही मिळू शकतो. रेशन कार्डचा उपयोग अनेक सरकारी कामांसाठी ओळखपत्र म्हणून होतो. तसेच सनावळीसाठी विशेष लाभाच्या सुविधाही पुरविल्या जातात.

**गेल्या चार महिन्यांत अपात्र लाभार्थी सर्वेक्षण (तक्ता)**

| तालुका | अपात्र |
|---|---|
| जळगाव | ९४ |
| भुसावळ | ९७ |
| बोदवड | ६३ |
| यावल | ७६ |
| रावेर | ६६ |
| मुक्ताईनगर | ५७ |
| अमळनेर | ६५ |
| चोपडा | ८० |
| एरंडोल | ६९ |
| धरणगाव | ६४ |
| पारोळा | ६१ |
| चाळीसगाव | ७७ |
| जामनेर | ७२ |
| पाचोरा | ८९ |
| भडगाव | ६८ |
| एकूण | ११२८ |




# डॉ. बेंडाळे महाविद्यालयात 'सुंदर साजिरा श्रावण आला'

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑगस्ट**

येथील डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयात कला मंडळ, संगीत विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्यातर्फे 'सुंदर साजिरा श्रावण आला' कार्यक्रम उत्साहात झाला.

प्रारंभी कला मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. प्राचार्य डॉ. व्ही. जे. पाटील अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख अतिथी हास्यजत्रा फेम प्रा. हेमंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा नामविस्तार वर्धापन दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कार्याचा गौरव करून संगीत विभागाच्या प्रा. ऐश्वर्या परदेशी यांनी विद्यापीठ गीत सादर केले.

प्रा. हेमंत पाटील यांनी विद्यार्थिनींना कलेची जोपासना करण्याचा संदेश दिला. तसेच आपल्याला आवडेल ती कला जोपासा, असे सांगत, कला क्षेत्रातील अनुभव मुक्तपणे मांडले. प्राचार्य डॉ. व्ही. जे. पाटील यांनी कलेचे जीवनातील महत्त्व विशद केले.

प्राध्यापक बंधू-भगिनी आणि विद्यार्थिनींनी मराठी, हिंदी पाऊसगीते सादर केली. गीतांना रसिकांचा प्रतिसाद मिळाला. या वेळी उपप्राचार्य डॉ.पी. एन. तायडे, डॉ. सत्यजित साळवे, सुनीता पाटील आदींच्या उपस्थितीत कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखांतील सांस्कृतिक प्रतिनिधींची निवड करण्यात आली. कला मंडळप्रमुख डॉ.अनिता कोल्हे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. दीपक पवार व प्रा. ऐश्वर्या परदेशी यांनी सूत्रसंचालन केले.

# कापसाचे क्षेत्र घटले, सीसीआयकडून कापसाचे वाढीव दर जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑगस्ट**

गेल्या सात आठ वर्षात साडेपाच ते सहा लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रात कपाशी वाणाची लागवड होती. परंतु सलगच्या नैसर्गीक आपत्तीसह कापूस उत्पादनाला दर कमी असल्याने यंदा शेतकऱ्यांना खरीप हंगामांतर्गत मका वाणाची विक्रमी लागवड करीत कपाशी वाणाकडे पाठ फिरवली आहे. यंदा केवळ साडेचार लाख हेक्टरवर कपाशी वाणाची लागवड पहाता एक लाखापेक्षा अधिक हेक्टरची घट असल्याचे दिसून येत आहे. तर दुसरीकडे नेमके ऑगस्टच्या पहित्या सप्ताहातच सीसीआयकडून ८ हजार रूपये प्रति क्विंटल कापसाचे दर जाहीर केले आहेत.

जिल्ह्यात दरवर्षी कपाशी वाणाची लागवड सरासरी साडेपाच लाख हेक्टर होती. यावर्षी ५ लाख ४६ हजार ९३३ हेक्टरवर कपाशी वाणाचे लागवडीचा अंदाज कृषी विभागाने वर्तविला होता. परंतु ४ लाख ३३ हजार ३४२ हेक्टरवर



सरासरी ७९ टक्के कपाशी वाणाची लागवड झाली असून २१ टक्के कपाशीचे क्षेत्र कमी झाले आहे.

कापूस उत्पादनात अपेक्षीत भाववाढ झालेली नाही. आणि वेळोवेळी नैसर्गीक आपत्तीत होणाऱ्या नुकसानीमुळे यंदा शेतकऱ्यांनी कपाशी वाणाकडे पाठ फिरवली आहे. ९२ हजार ६५० हेक्टरवर मका वाणाची लागवड अपेक्षीत असताना तब्बल १ लाख ८६ हजार ८८७ हेक्टरवर अल्प पाणी, कमी श्रम आणि कमी वेळेत येणाऱ्या मका वाणाची लागवड केली आहे. परिणामी, जिल्ह्यात एकूण १ लाख १० हजार ९१९ हेक्टर क्षेत्रावर कपाशी वाणाच्या क्षेत्रात घट होऊन मका लागवडीत वाढ झालेली दिसून आली आहे.

कपाशी वाणाच्या लागवडीत जामनेर तालुक्यात तब्बल २४,२८६ हेक्टर, यावलमध्ये १०,६५१ हेक्टर, जळगावमध्ये ११,११५ हेक्टर आणि बोदवड तालुक्यात ७,०५३ हेक्टर क्षेत्रात सर्वाधिक कपाशी वाणाच्या लागवडीत घट झाली आहे.



# शिक्षणप्रवाह प्रवाहित करण्यासाठी प्रयत्न

## ॲड. प्रकाश पाटील : खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीची वार्षिक सभा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑगस्ट**

शिक्षण द्या, प्रोत्साहन द्या आणि प्रबोधन करा या उक्तीने शिक्षणप्रवाह प्रवाहित करण्यासाठी खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटी सातत्यपूर्ण प्रयत्न करत आहे. संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार बेंडाळे यांच्या मार्गदर्शनात आणि त्यांच्या शैक्षणिक भविष्याचा वेध घेत केसीई मार्गक्रमण करत आहे, असे प्रतिपादन संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. प्रकाश पाटील यांनी केले.

खानदेश कॉलेज एज्युकेशन सोसायटीची ८० वी वार्षिक सभा उत्साहात झाली, त्यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. याप्रसंगी सचिव ॲड. प्रमोद पाटील, सहसचिव ॲड. प्रवीणचंद्र जंगले, कोषाध्यक्ष डी. टी. पाटील, व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या शिल्पा बेंडाळे, प्राचार्य अशोक राणे, डॉ.हर्षवर्धन जावळे, भालचंद्र पाटील, रूपेश चिरमाडे, संजय प्रभुदेसाई, डॉ. भरत अमळकर, अनिल राव आणि शैक्षणिक संचालक प्रा. मृणालिनी फडणवीस आदी उपस्थित होते.

सुरुवातीला संस्थेचे माजी सचिव वसंतराव सरोदे यांचे नुकतेच निधन झाले. याबद्दल दुखवटा संदेश व्यक्त करण्यात आला. यानंतर संस्थेच्या विविध शाखांतील प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी यांच्या विशेष कामगिरी आणि शैक्षणिक यशाबद्दल कौतुक आणि सन्मान करण्यात आला. नुकत्याच रुजू झालेल्या शैक्षणिक संचालक मृणालिनी फडणवीस, प्राचार्य संजय भारंबे, उपप्राचार्य सुरेखा पालवे, डॉ. नितीन चौधरी, डॉ. रजनी सिन्हा, डॉ. कासीम आरसीवाला, डॉ. वासीम शेख, डॉ. मनोजकुमार चोपडा, डॉ. मनोज पांडे, डॉ. देवानंद सोनार, अमोल देशमुख, डॉ. अतुल इंगळे, डॉ. जयंत इंगळे, स्वप्नील धांडे, प्रा. प्रियंका खरारे, दीपाली किरंगे, डॉ. वैभव मावळे, डॉ. अनिलकुमार मार्थी, विवेक मोरे, रजनी गोजरेकर, सुषमा कंची, संजय सुगंधी, प्रा. हर्षा देशमुख, कोमल जैन, कल्पेश महाजन, प्रा. स्वाती बाविस्कर, प्रा. राहुल पटेल, डॉ. प्रसाद कुलकर्णी, प्रा. मनीष महाले, सचिन नाथ, डॉ. सुनील न्याती आणि रश्मी बहिर्गुणे आदींचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. मृणालिनी फडणवीस, सचिव ॲड. प्रमोद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य अशोक राणे यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार मानले.



# प्रभाकर कला अकादमीच्या विद्यार्थिनींचा कलाविष्कार

**जळगाव** : येथील प्रभाकर कला संगीत अकादमीतर्फे व. वा. जिल्हा वाचनालयाच्या सहकार्याने आयोजित ला. ना. विद्यालयाच्या गंधे सभागृहात 'अलख' या कथ्थक नृत्याच्या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी कलाविष्कार सादर करीत रसिकांना मंत्रमुग्ध केले.

याप्रसंगी अकादमीच्या संस्थापिका डॉ. अपर्णा भट-कासार, किरण कासार, वाचनालयाचे उपाध्यक्ष ॲड. सुशील अत्रे, कार्याध्यक्ष अनिलकुमार शाह यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी ॲड. अत्रे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात अनन्या कोष्टी, अनन्या यादव, युक्ता मोरदे, स्मरणिका देवळे, अनुष्का कासार, समृद्धी महेश पाटील, जुनीषा जेठवानी, त्रिवेणी घारगे, आनंदी याज्ञिक, स्वानंदी बोरसे, श्रेया अग्रवाल, समृद्धी दीपक पाटील, तेजस्विनी क्षीरसागर, मधुरा इंगळे, दीपिका घैसास, हिमानी पिले, ऋतुजा महाजन, कोमल चौहान या विद्यार्थिनींसह स्वतः संचालिका डॉ. अपर्णा भट-कासार यांनीही सहभाग घेत सादरीकरण केले.

प्रारंभी गुरुगीता या शंकराचार्यांच्या भज गोविंदम रचनांमधील काही श्लोकांद्वारे गुरुवंदना व शुद्ध नृत्ये सादर करण्यात आली. पारंपरिक होळी सणावर आधारित होरी आणि स्वर व तालांचा झंकार म्हणजे तराणाने समारोप करण्यात आला. ऋतुजा महाजन हिने आपल्या गुरू व अकादमीविषयी भावना व्यक्त केल्या. तृप्ती बाकरे यांनी निवेदन, तर डॉ. प्रीती पाटील यांनी सूत्रसंचालन केले. हिमानी पिले हिने आभार मानले.

# गट-गणाची निवडणूक २०१७ नुसारच

## आता लक्ष अंतिम रचना आराखड्याकडे

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ११ ऑगस्ट**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२२ पूर्वीच्या ओबीसी आरक्षणाच्या स्थितीनुसार अर्थात २०१७ नुसार घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने ६ ऑगस्ट रोजी दिला आहे. या निर्णयामुळे नागरिकांच्या मागास प्रवर्गातील (ओबीसी) उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला असून गट- गण हरकतींवर सुनावणीनंतर १८ ऑगस्टला जाहीर होणाऱ्या अंतिम रचनेकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे.

जिल्हा परिषद पंचायत समित्यांचा कार्यकाल २०२२ मध्ये संपूष्टात आला आहे. त्यापूर्वीच जानेवारी २०२२ मध्ये निवडणुका होणे अपेक्षीत असताना कोरोना संसर्ग प्रतिबंध व आरक्षण संदर्भात निर्णय प्रलंबित असल्याने निवडणुका लांबणीवर पडून जिल्हा परिषद पंचायत समित्यांवर प्रशासक नियुक्त आहेत.

सर्वोच्च न्यायालयाकडून २०२२ पूर्वीच्या आरक्षणानुसारच निवडणुका घेण्याचे आदेश दिल्याने आरक्षणाचा



तिढा सुटला आहे. त्यामुळे, जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांचाही मार्ग मोकळा झाला आहे.

**हरकतींवर झाली होती सुनावणी**

१४ जुलै रोजी जिल्हा परिषद व पंचायत समितीची प्रारूप गट-गण रचना प्रसिद्ध झाली. त्यावर प्रशासनाने हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार गत सप्ताहातच विभागीय आयुक्त यांच्यासमोर जिल्हा परिषदेच्या गट-गण प्रारूप रचना आराखड्यावर प्राप्त हरकतींची सुनावणी पार पडली. यात चोपडा व चाळीसगाव तालुक्यातील गट-गण रचना पूर्वीप्रमाणेच असा निर्णय दिला आहे.

**१८ ऑगस्टला अंतिम रचना**

त्यानुसार जिल्हा परिषदेचे अंतिम गट आणि गण रचना प्रशासनपातळीवर १८ ऑगस्टला जाहीर होऊन आरक्षण सोडत जाहीर होईल. व त्यानंतर सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी रंगत वाढणार आहे.

**गट-गण जैसे थे, मात्र सोडतीकडे लक्ष**

गट-गण रचनेत फारसे बदल होण्याची शक्यता नाही, त्यामुळे इच्छुकांकडून गट-गणातून जोरदार तयारी देखील सुरु आहे. केवळ आरक्षण सोडतीत काय जाहीर होणार? याकडे निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसह समर्थकांचे लक्ष लागले आहे.

**जिल्ह्यात ओबीसीसाठी गटातून १८ तर गणातून ३७ जागा**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णय आदेशानुसार २०१७ पूर्वीप्रमाणे जागा राहणार आहेत. त्यात २०१७ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्येही ओबीसींच्या १८ जागा होत्या. त्यानुसार जिल्हा परिषदेचे एकूण ६८ गटांसाठी सार्वत्रिक निवडणूक अपेक्षीत असून यात १८ जागा आता ओबीसी प्रवर्गासाठी राखीव राहणार आहेत. जिल्ह्यात पंचायत समितीच्या एकूण १३६ गणांमध्ये आता ओबीसींसाठी ३७ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत

**गटनिहाय स्थिती**

जिल्हा परिषदेच्या गटांसाठी एससी प्रवर्गात ६, एसटी प्रवर्ग १३ तर ओबीसी १८ आणि सर्वसाधारण ३१ असे एकूण ६८ गटात प्रवर्गनिहाय जागांची विभागणी राहणार असल्याची शक्यता आहे.

> **सोडतीनंतर आखाडा राजकारण तापणार**
> जिल्हा परिषदेचे अंतिम गट-गण रचना जाहीर झाल्यानंतर आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे, आरक्षण सोडतीनंतर गट-गणांचे चित्रदेखील स्पष्ट होईल. यात आरक्षण सोडतीनंतर खऱ्या अर्थाने जि.प., पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी राजकारणाचा आखाडा गटागटातून तापणार आहे.

# गावठी कट्टा कमरेला लावून दहशत माजविणारा गजाआड

**जळगाव** : गावठी कट्टा कमरेला लावून गावात दहशत माजविण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका संशयिताच्या रणगाव (ता. रावेर) येथे एलसीबीच्या पथकाने मुसक्या आवळल्या. किरण ब्रिजलाल कोळी (वय २४,रा. रणगाव) असे संशयिताचे नाव आहे. त्याच्याकडून ४० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा हस्तगत केला.



रणगाव येथे तरुण गावठी कट्टा बाळगुन गावात भिती निर्माण करत आहे, अशी गोपनीय माहिती एलसीबीचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना शनिवारी (९ ऑगस्ट) रोजी मिळाली. त्यानंतर त्यांनी तत्काळ येथून पथकाला रवाना केले. पथकाने रणगाव येथे सापळा लावून तपासाचे चक्र फिरविले. पथकाच्या तावडीत आलेल्या संशयिताची अंगझडती घेतली असता त्याच्या कब्जात एक गावठी कट्टा मिळुन आला. किरण कोळी याला ताब्यात घेत पथकाने सावदा पोलिसांच्या स्वाधीन केले.

पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक सोपान गोरे, हवालदार प्रितम पाटील, हवालदार नितीन बाविस्कर, पोलीस नाईक विकास सातदिवे, पोलीस कॉन्स्टेबल बबन पाटील, पोलीस कॉन्स्टेबल सचिन घुगे, पोलीस कॉन्स्टेबल प्रदीप सपकाळे, पोलीस कॉन्स्टेबल मयूर निकम, चालक हवालदार भारत पाटील यांच्या एलसीबी पथकाने ही कारवाई केली. या प्रकरणी सावदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# धक्का लागल्याच्या वादातून हाणामारी, आठ जणांवर गुन्हा

**जळगाव** : एकमेकांना धक्का लागल्याच्या कारणावरुन वाद झाला. हे भांडण सोडविण्यासाठी दोन्ही गटाकडून धावुन आलेल्यांना मारहाण करत तीक्ष्ण हत्याराने वार केला. शनिवारी रात्री साडे अकरा वाजेच्या सुमारास ही घटना पिंप्राळा हुडको, सिध्दार्थनगर परिसरात घडली. या प्रकरणी दोन्ही गटांनी दिलेल्या तक्रारीनुसार आठ जणांवर परस्परांविरोधात गुन्हा रामानंदनगर पोलीस ठाण्यात रविवारी (१० ऑगस्ट) दाखल करण्यात आला.

आनंद बाबूराव सपकाळे (वय ४०,रा. सिध्दार्थनगर) यांच्या तक्रारीनुसार त्यांचा भाचा याला विकी गोपाल कछुवा याचा धक्का लागल्याने वाद झाला. हे भांडण सोडविण्यासाठी गेलो असता चौघांनी आनंद यांच्यासह त्यांच्या पत्नी तसेच भाचा अशा तिघांना चापटाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली. एकाने हातातील धारदार शस्त्राने वार करुन दुखापत केली. त्यानुसार विकी रवी बाविस्कर, शुभम संजय पवार, आदीत्य दत्तु बिऱ्हाडे, चेतन रवींद्र बाविस्कर (रा.सर्व सिध्दार्थनगर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

दुसऱ्या गटाचे चेतन बाविस्कर (वय २८, रा.सिध्दार्थनगर) यांच्या तक्रारीनुसार, त्यांचा मावसभाऊ शुभम पवार यास विकी गोपाल कछुवा याचा धक्का लागल्याने वाद झाला. भांडण सोडविण्यासाठी ते गेले असता त्यांच्यासह कुटुंबातील पाच जणांना चापटाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली. एकाने धारदार शस्त्राने वार करत दुखापत केली. या प्रकरणी विकी कछुवा, आनंद सपकाळे, मुकेश सरदारे, निखील कछुवा (सर्व रा. सिध्दार्थनगर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार योगेश माळी हे तपास करीत आहेत.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### शिरपूरमधील इंग्रजी शाळेच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट

**शिरपूर :** शहरातील आर. सी. पटेल इंग्रजी प्राथमिक शाळेत पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट विविध ठिकाणी झाली. पहिलीच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यान, दुसरीच्या विद्यार्थ्यांची टपाल कार्यालय, तिसरीच्या विद्यार्थ्यांची शिरपूर-वरवाडे नगरपालिका आणि चौथीच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट बाजार समितीच्या धान्य मार्केटमध्ये नेण्यात आली. क्षेत्रभेटीमध्ये विद्यार्थ्यांना सार्वजनिक ठिकाणच्या विविध घडामोडींचा व जीवनातील प्रत्यक्ष व्यवहारातील नित्य अनुभव अनुभवण्यास मिळाला. शालेय अभ्यासक्रमात येणाऱ्या गोष्टींचा प्रत्यक्ष अभ्यास विद्यार्थ्यांनी या क्षेत्रभेटीदरम्यान केला. क्षेत्रभेटीसाठी मुख्याध्यापक हेमंतकुमार देवरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.




### निमझरी आश्रमशाळेत क्ष-किरण तपासणी शिबिर

**शिरपूर :** तालुक्यातील निमझरी येथील आर. सी. पटेल अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत टीबीमुक्त भारत अभियानांतर्गत धुळे जिल्हा क्षयरोग नियंत्रण विभागातर्फे क्ष-किरण (एक्स-रे) तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिरात पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांची क्ष-किरण तपासणी करण्यात आली. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सोनिया बागडे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्न कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. शिबिराचे नेतृत्व क्षयरोग पथकप्रमुख डॉ. विसपुते यांनी केले. त्यांच्यासोबत डॉ. विजय शिरसाळे, डॉ. धनराज पवार, डॉ. छत्रसिंग राजपूत, महेश सूर्यवंशी, पवन फुलपगारे आणि संदीप पाटील यांनी तपासणी केली. प्राचार्य पी. पी. चव्हाण, मुख्याध्यापक जी. एम. पाटील, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



### एसव्हीकेएम अभियांत्रिकीत माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन सत्र

**धुळे :** येथील एसव्हीकेएम अभियांत्रिकी महाविद्यालयात रिलायन्स इंडस्ट्रीज भरतीप्रक्रियेवर इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागात माजी विद्यार्थी सागर पाटील व तेजस सोनार यांच्याशी विद्यार्थ्यांचा परस्परसंवाद व मार्गदर्शन सत्र उत्साहात झाले. त्यात दोन्ही माजी विद्यार्थ्यांनी रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये त्यांच्या निवडीचा प्रवास उलगडत विद्यार्थ्यांना भरती प्रक्रियेविषयी माहिती दिली. डॉ. विशाल मोयाळ अध्यक्षस्थानी होते. टी. एम. शुभम यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.




### अहिल्यापूर येथील विद्यालयात आरोग्य तपासणी

**शिरपूर :** तालुक्यातील अहिल्यापूर येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. आरोग्याची काळजी कशी घ्यावी, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. एस. व्ही. नेरकर, डॉ. आर. आर. कांबळे, सहयोगी मयूर भिलाने, सविता पावरा यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली. मुख्याध्यापक आर. एफ. शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्व, आहार याविषयी मार्गदर्शन केले. शिक्षक एस. डी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना आपले आरोग्य उत्तम राहिले तरच आपण चांगला अभ्यास करू शकतो. त्यांनी उत्तम आरोग्यासाठी आहार, खेळ व योगाभ्यास या विषयावर मार्गदर्शन केले. उमेश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.



### झेंडेअंजन विद्यालयात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**शिरपूर :** तालुक्यातील झेंडेअंजन येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात सोमवारी (११ ऑगस्ट) विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. पाचवी ते दहावीच्या २७० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वकवाड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षवर्धन सोनवणे, पर्यवेक्षिका अर्चना झोडपे यांनी केली. कार्यक्रमात डॉ. हर्षवर्धन सोनवणे यांनी गोवर रुबेला आजाराविषयी माहिती दिली, तसेच शारीरिक आरोग्य व वैयक्तिक स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले. काही विद्यार्थ्यांना गरजेनुसार मोफत औषधोपचार करण्यात आला. मुख्याध्यापक पी. एन. गोसावी यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याच्या उत्तम सवयी, व्यायाम, योगासने यांबद्दल माहिती दिली. आर. एफ. बागूल यांनी सूत्रसंचालन केले. डी. बी. तडवी यांनी आभार मानले.



### आमदार भदाणेंचा आदिवासी दिनी शोभायात्रांमध्ये सहभाग

**धुळे :** तालुक्यातील प्रत्येक गावात आदिवासी दिन व क्रांती दिन उत्साहात साजरा झाला. आदिवासी परंपरेनुसार विविधांगी शोभायात्रा काढण्यात आल्या. मोराणे उपनगर, नकाणे, सोनेवाडी, अनकवाडी आदी गावांमधील विविधांगी कार्यक्रमांमध्ये आमदार राम भदाणे व प्रा. अरविंद जाधव सहभागी झाले होते. त्यांच्या हस्ते वीर एकलव्य यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्येही ते सहभागी झाले. आमदार भदाणे म्हणाले की, आदिवासी हे मूलनिवासी आहेत. पर्यावरण संरक्षणासाठी आदिवासींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. शोभायात्रेत आदिवासींच्या पारंपारिक वेशभूषेतील नृत्याने व सांस्कृतिक कार्यक्रमांनी लक्ष वेधून घेतले होते.

### वाघाडी सीबीएसई स्कूलमध्ये रक्षाबंधन उत्साहात

**शिरपूर :** वाघाडी येथील जयश्रीबेन अमरिशभाई पटेल सीबीएसई स्कूलमध्ये



रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात झाला. कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्रीकृष्ण व द्रौपदी यांच्या प्रसंगावर आधारित नाटिकेने झाली. विद्यार्थ्यांच्या प्रभावी अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी परस्परांना राखी बांधली. सुचिता जैन यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थिनी जोगेश्वरी, राजनंदिनी यांनी रक्षाबंधन का साजरा करतो या विषयावर भाषण केले. मुख्याध्यापिका मेघा मुंगसे यांनी बंधू-भगिनीच्या नात्याचे महत्त्व अधोरेखित केले.

# शिरपूर तालुक्याच्या पश्चिम भागात दुष्काळाची छाया!

## विजेच्या लपंडावाने शेतकरी हैराण; आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**शिरपूर, ११ ऑगस्ट**

तालुक्याच्या पश्चिम भागात जूनमध्ये फक्त एक ते दोन वेळा पावसाच्या सरी कोसळल्या. जुलैत रिमझिम असाच पाऊस बरसला. ऑगस्ट महिना म्हणजेच श्रावण महिना सुरू होऊनही तालुक्याच्या पश्चिम भागात जोरदार असा चांगला पाऊस झालाच नाही. परिसरातील पिकांची वाढ खुंटली आहे. शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसले आहेत. सुदैवाने नैसर्गिकरीत्या तालुक्याच्या पश्चिम भागात भूजल पातळीचे प्रमाण ठीक असल्याने कूपनलिकांना पाणी बऱ्यापैकी आहे. त्यामुळे शेतकरी पिके वाचविण्यासाठी



कूपनलिकेचे पाणी देऊन पिकांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत; पण शेतकऱ्यांच्या या प्रयत्नांना महाराष्ट्र राज्य वीज वितरणकडून योग्य ते सहकार्य मिळत नाही. वरूळ, जवखेडा परिसरात वीज वितरणकडून पहाटे पाच ते दुपारी एकपर्यंत वीजपुरवठ्याचे वेळापत्रक आहे. मात्र, गेल्या आठ ते दहा दिवसापासून शेतकरी पहाटे पाचच्या सुमारास फावडे घेऊन पाणी भरण्यासाठी शेतात जातात. मात्र, पहाटे पाचला येणारी वीज कधीच वेळेवर आलीच नाही. वीजपुरवठा सकाळी दहा ते साडेदहाच्या सुमारास होतो. पुन्हा एक-दोन तासांनी वीजपुरवठा खंडित केला जातो. त्यानंतर पुरवठा सुरूच होत नाही.

सलग आठ तास वीज मिळाली तर शेतकरी शेती ओलित करू शकतो. वीज वितरणच्या या लपंडावाच्या खेळात दिवसभरात फक्त आठ-दहा चाऱ्या पाण्याने भिजविता येतात व हाताश होऊन डोळ्यात अश्रू आणून फक्त हात चोळत राहतो. प्रा. पी. एस. अंतुर्लीकर हेसुद्धा शेतकरी आहेत. त्यांनी शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी वीज पूर्ण आठ तास मिळावी यासाठी उपअभियंत्यांना भेटून पश्चिमेकडील परिसरात विशेषतः वरूळ परिसरातर्फे त्यांना विनंती केली. मात्र, काही उपयोग झाला नाही. कारण, जे लाइनमन आहेत, ते शिरपूरला राहून आपले कर्तव्य बजावतात. त्यामुळे त्यांच्याकडे एकच उत्तर असते, 'लाइनमध्ये फॉल्ट आहे' किंवा 'लाइन दोंडाईचा येथून गेली आहे'. यासंबंधी शेतकऱ्यांनी त्यांची भेट घेऊनही काही उपयोग होत नाही.

निसर्गाने तालुक्याच्या पश्चिम भागातील शेतकऱ्यांची पुरेशा पावसाअभावी हलाखीची परिस्थिती निर्माण करण्याचा घाट रचला आहे.

> आम्ही शेतकरी वीज वितरणच्या अधिकाऱ्यांकडून त्यांनी कमविलेल्या पैशांतून काही धन, धान्य किंवा पैसा मागत नसून, शेतकऱ्यांना तुम्ही ठरवून दिलेल्या आठ तासप्रमाणे नियमित वीजपुरवठा द्यावा, एवढीच माफक अपेक्षा आहे. पण त्यांच्याकडून कोणताही उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत नाही. म्हणून शेवटी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल. त्याची तारीख व वेळ लवकरच संबंधितांना नोटिसा देऊन कळविण्यात येईल.
>
> **- प्रा. पी. एस. अंतुर्लीकर**
> **(माजी उपसभापती, पंचायत समिती, शिरपूर)**

यावर निसर्गाला आपण काही शिक्षा करू शकत नाही. पण वीज वितरणचे अधिकारी शेतकऱ्यांना नियमित आठ तास वीज देण्याचे त्यांचे कर्तव्य असूनही तेसुद्धा शेतकऱ्यांच्या उरावर बसले आहेत. अशा परिस्थितीत काय करावे? या विवंचनेत शेतकरी दिसत आहेत. जर नियमितपणे वीज उपलब्ध झाली तर बहुतांश शेतकरी आपली पिके वाचवू शकतील. नाहीतर शिरपूर तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील व विशेषतः वरूळ परिसरातील शेतकरी आंदोलन करतील. त्या आंदोलनात दुर्दैवाने काही विध्वंसक परिस्थिती घडली, तर त्याची जबाबदारी पूर्णतः वीज वितरणवर राहील.

# शिरपूर येथे 'रानभाजी महोत्सव' उत्साहात

## पारंपरिक रानभाज्यांना व्यासपीठ; महिलांचा भरघोस सहभाग

**शिरपूर :** श्री विलेपार्ले केळवणी मंडळ कृषी महाविद्यालय (तरडी, ता. शिरपूर), स्कूल ऑफ फार्मसी ॲण्ड टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट, मुकेश पटेल स्कूल ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट, एनएमआयएमएस (शिरपूर), तसेच कृषी विभाग, एमएसआरएलएम आणि आत्मा (धुळे) यांच्यातर्फे शिरपूर येथे 'रानभाजी महोत्सव २०२५' भव्य स्वरूपात झाला.

महोत्सव एसव्हीकेएम अध्यक्ष, माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल यांच्या प्रेरणेने झाला. स्थानिक स्तरावरील आदिवासी परंपरा, रानभाज्यांचे पोषणमूल्य, औषधी महत्त्व आणि स्वयंपूर्ण आरोग्य दृष्टिकोन अधोरेखित करणारा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला.

महोत्सवाचे उद्‌घाटन आमदार काशिराम पावरा यांच्या हस्ते झाले. या वेळी प्रांताधिकारी डॉ. शरद मंडलिक, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील



गोसावी, तहसीलदार महेंद्र माळी, गटविकास अधिकारी प्रदीप पवार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सूरज जगताप, एसव्हीकेएम व्यवस्थापन समितीचे सदस्य राजगोपाल भंडारी, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, कृषी उपसंचालक प्रज्ञा पवार, तालुका कृषी अधिकारी संजय पवार, शिरपूर एसव्हीकेएम कॅम्पस प्रभारी रिटा पटेल, शिरपूर कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुनीता पाटील, नैलेश पटेल उपस्थित होते.

कार्यक्रमात आदिवासी भगिनी, महिलांचे बचत गट, कृषी सखी, बँक सखी आणि स्वयंसहाय्यता गटांनी पारंपरिक रानभाज्यांचे स्टॉल्स, पाककृती सादरीकरण आणि माहितीपूर्ण सादरीकरण करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. रानभाज्यांचे संग्रह, विक्री, औषधी उपयोग व चव चाचणीही घेण्यात आली.

कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. इंदरचंद चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. शिरपूर तालुका कृषी अधिकारी संजय पवार व डॉ. सौरभ मारू यांनी 'रानभाज्यांचे पोषणमूल्य व आरोग्यदृष्टीने महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन केले.

समारोपप्रसंगी विजेता व सहभागी महिलांना आमदार पावरा, डॉ. सुनीता पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. डॉ. नितीन मिसाळ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आशिष बनकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. वरुण शेंडे, डॉ. मल्लिकार्जुन धोत्रे, डॉ. रजप शिव कुमार, डॉ. महेश चौधरी, डॉ. कृष्ण चैतन्य, डॉ. विजय माहोरे, डॉ. निथीन के. एन, डॉ. फैसल अन्सारी, विनोद राठोड, संजय वायचळ, इम्रान खाटीक, महेश सूर्यवंशी, तेजस चौधरी, अनिल भोई यांनी प्रयत्न केले. महोत्सवात शिरपूरकरांनी हजेरी लावून रानभाज्यांबद्दल माहिती व चव घेतली.

# बाजारपेठेसह कृषी समस्यांवर मंत्री भरणे यांच्याशी चर्चामंथन

## शहादा बाजार समितीचे सभापती पाटील यांनी दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**शहादा, ११ ऑगस्ट**

येथील बाजार समितीचे सभापती अभिजित पाटील यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेतली. भेटीत त्यांनी जिल्ह्यातील कृषी क्षेत्रातील विविध समस्यांवर चर्चा करून प्रलंबित मागण्यांचे निवेदन दिले.

जिल्ह्यात केळी, पपई, मिरची यांसारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. राज्यात सर्वाधिक पपईचे उत्पादन याच जिल्ह्यात होत असूनही शेतकऱ्यांना अनेकदा बाजारपेठेच्या समस्यांना तोंड द्यावे लागते. या आणि इतर पिकांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी सभापती पाटील यांनी कृषिमंत्री भरणे यांची इंदापूर तालुक्यातील भरणेवाडी येथील निवासस्थानी भेट घेतली. या वेळी बारामती येथील छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाइस चेअरमन अमोल पाटील आणि त्यांचे



सहकारी उपस्थित होते.

**अमृत महोत्सवाचे निमंत्रण**

शहादा बाजार समितीला स्थापनेची ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने आयोजित अमृत महोत्सवासाठी कृषिमंत्री भरणे यांना निमंत्रणही देण्यात आले. कार्यक्रमात होणाऱ्या शेतकरी मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आमंत्रण पाटील यांनी दिले. जिल्ह्यातील प्रलंबित कृषी प्रश्न लवकरच सोडवण्याचे आश्वासन कृषिमंत्र्यांनी सभापती पाटील यांना दिले.

# शिरधानेत १०० अश्वशक्तीची दोन वीज रोहित्रे

**धुळे :** तालुक्यातील शिरधाने प्र. नेर शिवारात कमी दाबाचा वीजपुरवठा व्हायचा. कमी-अधिक पुरवठ्यामुळे वीजपंप जळण्याचे प्रमाणही अधिक होते. पिकांना वेळेवर पाणी देणे कठीण झाले होते. शेतकऱ्यांनी ही समस्या आमदार राघवेंद्र भदाणे यांच्याजवळ मांडली. त्यांनी वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या, पाठपुरावा केला. आता या शिवारात १०० अश्वशक्तीची दोन वीज रोहित्रे बसविण्यात आली. त्यामुळे या शिवारातील वीजप्रश्न मार्गी लागण्यास मोठी मदत झाली असल्याच्या भावना व्यक्त झाल्या.

या वेळी रतिलाल भदाणे, बाबूलाल भदाणे, अनिल भदाणे, सोपान भदाणे, ज्ञानेश्वर भदाणे, समाधान भदाणे, गोरख भदाणे,



मच्छिंद्र भिल, अजित पठाण, दादा पठाण, निंबा बागूल, भय्या सोनवणे, पावबा भदाणे, रतिलाल भदाणे, सुरेश सावळे, भगवान भदाणे, सतीश बागूल, अर्जुन गायकवाड, मनोज निकम, राम सोनवणे, सोनू अहिरे, रमेश अहिरे, मच्छिंद्र शेलार, कालू भदाणे आदी शेतकरी उपस्थित होते. आमदार भदाणे यांनी सांगितले की, धुळे तालुका शिवारातील वीजप्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे. वीज समस्या संबंधित अधिकाऱ्यांनाही लक्षात आणून द्याव्यात. त्यातून योग्य मार्ग काढण्यासाठी बांधिल आहोत.




# पाटील महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांसाठी उद्योजकीय क्षेत्रभेट

**शहादा :** येथील (कै.) सौ. जी. एफ. पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र आणि सहकार विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी उद्योजकीय क्षेत्रभेट घडवून आणण्यात आली. प्राचार्या सुरेखा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लांबोळा येथील अमुल डेअरी उद्योग, नांदरखेडा येथील वनश्री जिनिंग मिल व मत्स्यशेती येथे ही भेट घडवून आणण्यात आली.

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, त्यांना प्रत्यक्ष उद्योगांची माहिती, प्रक्रिया, व्यवस्थापन आणि उत्पादन पद्धती यांचा अनुभव मिळावा, या उद्देशाने बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ही क्षेत्रभेट काढण्यात आली होती. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना दुग्ध उत्पादन प्रक्रिया, दूधसंकलन, शीतकरण, पॅकिंग, तसेच जिनिंग मिलमधील कापूस प्रक्रियेपासून निर्यातीपर्यंतचे टप्पे समजण्यास मदत झाली. भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय विचारसरणी आणि आत्मनिर्भरतेची भावना वाढीस लागण्यास मदत झाली, तसेच त्यांना उद्योगाचे व्यावहारिक ज्ञान मिळाले.

क्षेत्रभेटीदरम्यान लांबोळा येथील अमूल डेअरीचे जितेंद्र गोसावी आणि फूड मॅनेजर अभिलाष यांनी विद्यार्थ्यांना डेअरीची माहिती दिली. नांदरखेडा येथील वनश्री जिनिंग मिलच्या संदर्भातील माहिती तेथील अधिकारी जयेश पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिली. उद्योजकीय क्षेत्रभेटीत ८१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. मनीषा पाटील, प्रा. काकासाहेब अनपट, सहकार विभागाच्या प्रा. रंजना पाटील, प्रा. विश्वनाथ चौधरी यांनी प्रयत्न केले. प्रा. एच. एस. चव्हाण, प्रा. पद्मा पाटील आणि कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू-भगिनींनी सहकार्य केले.




# वाघाडी आश्रमशाळेत आदिवासी कर्मचाऱ्यांचा सत्कार

**शिरपूर :** तालुक्यातील वाघाडी येथील आर. सी. पटेल अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेत जागतिक आदिवासी गौरव दिवस व क्रांती दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आदिवासी कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

मान्यवर व उपस्थित आदिवासी महिला पालक, मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी यांच्या हस्ते स्वातंत्र्यलढ्यात सहभागी आदिवासी क्रांतिकारकांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. शाळेतील आदिवासी बंधू-भगिनी कर्मचाऱ्यांचा आदिवासी गौरव दिनानिमित्त सत्कार करण्यात आला. आठवी ते दहावीच्या दहा विद्यार्थ्यांनी बिरसा मुंडा, तंट्या मामा भिल, खाज्या नाईक आदी आदिवासी क्रांतिकारकांच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले. पहिली ते नववीपर्यंतच्या मुलींच्या गटांनी प्रत्येक वर्गानुसार एकेक आदिवासी नृत्य सादर केले. प्राचार्य के. जे. राजपूत, मुख्याध्यापक बी. बी. सोनवणे, माध्यमिक शिक्षक एस. एम. भलकार उपस्थित होते. शिक्षक भूषण पेंढारकर, एस. के. चौधरी, श्रीमती एम. जे. गावित यांनी सूत्रसंचालन केले.

# गरताड विद्यालयात आदिवासी गौरव दिन उत्साहात

**शिरपूर :** तालुक्यातील गरताड येथील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात ९ ऑगस्ट क्रांती दिन व आदिवासी गौरव दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक के. बी. चौधरी यांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन केले. देशभक्तिपर गीतगायन स्पर्धेत ४८ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. शिक्षक ए. जे. पाटील यांनी प्रास्ताविक केले. मुख्याध्यापक के. बी. चौधरी यांनी माहिती दिली. स्पर्धेचे परीक्षक जे. डी. पाटील व जी. डी. पाटील होते. स्पर्धेत लहान गटात तन्मय अशोक



पाटील प्रथम, देवयानी ईश्वर पाटील व जान्हवी सुनील पाटील द्वितीय, शोयब शरीफ पिंजारी व राकेश मुकेश पावरा तृतीय, मोठ्या गटात सानिया शरीफ पिंजारी प्रथम, कुणाल प्रवीण कोळी द्वितीय, वैष्णवी अशोक सोनवणे व पियू सुनील कोळी तृतीय बक्षिसाचे मानकरी ठरले. ए. जे. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. एस. बी. पाटील यांनी आभार मानले.



# क्रांतिवीर माळी विद्यालयात क्रांती दिनी गणवेश वाटप

**शिरपूर :** क्रांती दिनाचे औचित्य साधून वरवाडे येथील स्वा. सै. शंकर पांडू माळी प्रतिष्ठानतर्फे किसान विद्या. प्रसारक संस्था संचलित शिरपूर येथील क्रांतिवीर शंकर पांडू माळी विद्यालयात ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी शंकर पांडू माळी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गरजू विद्यार्थ्यांना १०० शालेय गणवेश वाटप करण्यात आले, तसेच पी. जी. पेट्रोलियमचे संचालक जितेंद्र शांताराम गिरासे यांनी वडील दादासाहेब शांताराम दौलत गिरासे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ५० गणवेश दिले.

सुरुवातीस आदिवासी विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. माजी उपनगराध्यक्ष वासुदेव शंकर देवरे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी किसान विद्या प्रसारकचे सचिव तथा सिनेट सदस्य निशांत रंधे, माजी नगरसेविका वैशाली वासुदेव देवरे, माजी नगरसेवक संतोष माळी, जितेंद्र गिरासे, सामाजिक कार्यकर्ते भरत रोकडे, पोलिसपाटील संघटनेचे तालुकाध्यक्ष विनय माळी (कळमसरे), दिनेश माळी, डॉ. रेणुका बाविस्कर, डॉ. रुचिता देवरे, संस्थेचे व्यवस्थापक ए. ए. पाटील, बी. आर. माळी, मुख्याध्यापिका श्रीमती के. एस. ईशी, पर्यवेक्षक के. डी. बच्छाव तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मुख्याध्यापिका श्रीमती के. एस. ईशी यांनी प्रास्ताविक केले. वासुदेव देवरे यांनी मनोगत व्यक्त केले. बी. एस. अहिरे यांनी सूत्रसंचालन केले. एस. एम. पाटील यांनी आभार मानले.



# पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आदिवासी गौरव दिनी कार्यक्रम

**शिरपूर :** आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयात जागतिक आदिवासी गौरव दिन व क्रांती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध कार्यक्रम झाले.

प्राचार्य डॉ. दीपक बाविस्कर अध्यक्षस्थानी होते. जे. एल. चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. उषा पावरा व मंगला पावरा यांनी स्वागतगीत सादर केले. विद्यार्थ्यांनी आदिवासी भाषेत आदिवासी संस्कृतीविषयी माहिती सादर केली. दिनेश तिवारी यांनी क्रांती दिनाविषयी विचार मांडले. विद्यार्थिनी मंगला पावरा, निकिता पावरा, सोनाली पावरा, सुशीला पावरा, रोशनी पावरा व उषा पावरा यांनी आदिवासी नृत्य सादर केले. विद्यार्थिनी व आदिवासी गायिका उषा पावरा यांचा व तिच्या पालकांचा प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुदाम पावरा व मंगला पावरा यांनी पावरा भाषेत सूत्रसंचालन केले. डॉ. गजानन खेकाडे यांनी प्रास्ताविक केले. जया बाविस्कर यांनी आभार मानले.

# सोनवल विद्यालयात आदिवासी गौरव दिन

**शिरपूर :** सोनवल तर्फे बोरद येथील प्रेरणा शिक्षण संस्थेंतर्गत माध्यमिक विद्यालयात जागतिक आदिवासी गौरव दिवस साजरा करण्यात आला. माजी सरपंच सखाराम भिल अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा शिवदे, मुख्याध्यापक सुधीर सोनवणे उपस्थित होते. मनीषा शिवदे यांनी आदिवासी संस्कृतीचा वारसा व महत्त्व पटवले. मुख्याध्यापक सुधीर सोनवणे यांनी आदिवासी समाजातून थोर पुरुष बिरसा मुंडा, भगवान एकलव्य यांच्याविषयी जीवनपट उलगडला. आदिवासी विद्यार्थ्यांनी त्यांच्या पोशाखात येत वेगवेगळ्या प्रकारचे नृत्य व भाषण केले. कार्यक्रमाला संजय बच्छाव, हेमंत महाजन, प्रवीण भामरे, गौतम महिरे, हेमंत पवार, सूर्यकांत भामरे, लिपिक प्रमिला माळी, दिनेश पाटील, सतीश वाडिले, शिक्षक शिक्षकेतर व विद्यार्थी उपस्थित होते.

# 'तरुण भारत'च्या वर्धापन दिनी फुलला स्नेहीजनांचा मेळा

